# आधुनिक भारताचा इतिहास

## इयत्ता आठवी





स्टुटगार्ट परिषदेत ध्वज फडकवताना मादाम कामा

## इतिहास इयत्ता आठवी : अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

१. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात व समाज सुधारणा चळवळीत सर्व थरांतील स्त्री-पुरुषांनी केलेल्या योगदानाविषयी जाणीव विकसित करणे.

२. ऐतिहासिक संदर्भात भारतीय समाजाच्या समकालीन समस्यांचा भूतकाळातील घटनांशी योग्य मेळ घालण्याची क्षमता निर्माण करणे.

३. भारताची एकता व अखंडता यांबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात आदराची भावना निर्माण करणे.

४. अनिष्ट रूढी, परंपरा व अंधश्रद्धा यांचा त्याग करण्याची वृत्ती वाढवणे.

५. राष्ट्रीय ऐक्य व लोकशाही वृत्ती जोपासणे.

६. विश्वबंधुत्व व आंतरराष्ट्रीय सामंजस्याचे महत्त्व ठसवणे.

७. 'समृद्ध वारशाचे जतन, पण हीन असेल त्याचा त्याग', ही दृष्टी विकसित करणे.

८. ऐतिहासिक माहिती मिळवण्यासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास प्रवृत्त करणे.

शिक्षणाच्या नव्या राष्ट्रीय आराखड्यात जीवनाभिमुख व संस्कृतिसापेक्ष शिक्षण देणे अभिप्रेत आहे. विद्यार्थी ज्ञाननिर्माता (Constructor of Knowledge) व्हावा आणि त्याला पोषक अशी भूमिका (Facilitator) शिक्षकाने वठवावी, यांवर भर दिला आहे. सामाजिकशास्त्रांमध्ये विषयनिष्ठ दृष्टिकोन (Thematic Approach) महत्त्वाचा मानलेला आहे. याची दखल अभ्यासक्रम रचनेत घेतलेली आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानाच्या वाटा स्वतः शोधण्यास शिक्षकाने उत्तेजन द्यावे अशी अपेक्षा आहे. इतिहासाद्वारे केवळ भूतकालीन घडामोडींची माहिती देणे अभिप्रेत नाही. त्या माहितीचा तात्त्विक बोध होणे, त्या आधारावर वर्तमानाचे अधिक चांगले आकलन होणे व भविष्याला योग्य आकार मिळणे गरजेचे आहे. इतिहास ही आपल्या सामाजिक, सांस्कृतिक व्यक्तिमत्त्वाची ओळख असते. ही ओळख विद्यार्थ्याला व्हावी, त्याला वर्तमानाचे यथार्थ आकलन व्हावे आणि भविष्यकाळासाठी प्रेरणा मिळावी या उद्देशाने अभ्यासक्रमाची आखणी केलेली आहे.

इतिहासातील नवे प्रवाह आणि शिक्षणाची राष्ट्रीय गाभातत्त्वे यांचा मेळ घालून या पाठ्यपुस्तकाचे लेखन केलेले आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा आविष्कार कसा होत गेला, हे सदर पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासातून स्पष्ट होऊ शकेल.

शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक

प्राशिसं/२००८-२००९/मंजुरी-१/५०५(२)/७६०३ दिनांक २४.११.२००८

# आधुनिक भारताचा इतिहास

## इयत्ता आठवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

| | |
|---|---|
| प्रथमावृत्ती : २००९<br>पुनर्मुद्रण : जुलै २०१५ | |



© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.



| | |
|---|---|
| संपादक मंडळ : | डॉ. राजा दीक्षित<br>श्री. बापूसाहेब शिंदे<br>श्री. विजयचंद्र थत्ते<br>प्रा. अनिल गौतम<br>प्रा. लहू गायकवाड<br>श्री. आबासाहेब शिंदे<br>श्री. लक्ष्मण भोये<br>श्री. मोगल जाधव, समन्वयक |
| लेखक : | प्रा. जास्वंदी वांबुरकर-उटगीकर<br>डॉ. दत्तात्रय वाघ |
| संयोजक : | श्री. मोगल जाधव<br>विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र |
| मुखपृष्ठ : | श्री. शरद प्रभुदेसाई |
| सजावट : | श्री. सचिन जोशी |
| नकाशाकार : | श्री. सदाशिव गायकवाड |
| निर्मिती : | श्री. प्रभाकर परब, निर्मिती अधिकारी<br>श्री. शशांक कणिकदळे, निर्मिती साहाय्यक |
| अक्षरजुळणी : | पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| कागद : | ७० जी.एस.एम. क्रीमवोव्ह |
| मुद्रणादेश : | N/PB/2015-16/QTY. - 0.50 |
| मुद्रक : | M/s. SAHIL PRINT ARTS, THANE |
| प्रकाशक : | श्री. विवेक गोसावी, नियंत्रक<br>पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५. |

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० आणि २००५' अनुसार एन. सी. ई. आर. टी. ने शालेय अभ्यासक्रम बदलला. महाराष्ट्र राज्यातही 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४' अन्वये शालेय अभ्यासक्रम तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २००६-२००७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे.

वरील शासनमान्य अभ्यासक्रमानुसार मंडळाने इतिहास विषयाचे इयत्ता आठवीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया विद्यार्थिकेंद्रित असावी, स्वयंअध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'विहित क्षमता' प्राप्त कराव्या, अध्ययन व अध्यापन प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. 'स्वयंअध्ययन' सुलभ व्हावे, म्हणून पुस्तकात प्रत्येक पाठावर स्वाध्याय दिले आहेत. इतिहासातील नवे प्रवाह आणि शिक्षणाची राष्ट्रीय गाभातत्त्वे यांचा मेळ घालून या पाठ्यपुस्तकाचे लेखन केलेले आहे. आधुनिक भारताच्या इतिहासात स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा आविष्कार कसा होत गेला, हे सदरच्या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासातून स्पष्ट होऊ शकेल. अध्यापन करताना शिक्षकांनी इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे व जीवन-कौशल्ये यांची सांगड घालणे अपेक्षित आहे.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे, या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. संपादक मंडळ, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने आणि परिश्रमपूर्वक हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मन:पूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(एस. एन. पवार)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : ४ डिसेंबर २००८

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रबोधनयुग | १ |
| २. | क्रांतियुग | ८ |
| ३. | भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना आणि विस्तार | १८ |
| ४. | ब्रिटिश सत्तेचा भारतावरील परिणाम | २४ |
| ५. | १८५७ चा स्वातंत्र्यलढा | ३२ |
| ६. | भारतीय प्रबोधन | ४३ |
| ७. | स्वातंत्र्य चळवळीची पायाभरणी | ५२ |
| ८. | स्वराज्याचा लढा | ५९ |
| ९. | असहकार पर्व | ६८ |
| १०. | सविनय कायदेभंग | ७७ |
| ११. | छोडो भारत पर्व | ८६ |
| १२. | सशस्त्र क्रांतिकारी चळवळ | ९४ |
| १३. | आझाद हिंद सेना | १०४ |
| १४. | समतेचा लढा | ११० |
| १५. | स्वातंत्र्यप्राप्ती | १२० |
| १६. | स्वातंत्र्यलढ्याची परिपूर्ती | १२८ |


- **मुखपृष्ठ : १८५७ चा स्वातंत्र्यलढा – एक दृश्य, दांडीयात्रा**
- **मलपृष्ठ : संचलन, प्रजासत्ताक दिन, नवी दिल्ली**

# १. प्रबोधनयुग

मागील वर्षी आपण मध्ययुगीन काळातील भारताच्या इतिहासाचा अभ्यास केला. या वर्षी आपण आधुनिक भारताच्या इतिहासाचा अभ्यास करणार आहोत. जगाच्या इतिहासातील काही महत्त्वपूर्ण घडामोडींचा आधुनिक भारताच्या जडणघडणीत महत्त्वाचा वाटा आहे. अशा काही घटनांची आपण ओळख करून घेऊया.

**प्रबोधनयुग :** युरोपमध्ये मध्ययुगाच्या अखेरच्या टप्प्यात (इ.स.१३ वे शतक ते १६ वे शतक) प्रबोधन, भौगोलिक शोध व धर्मसुधारणेची चळवळ या घटनांमुळे आधुनिक युगाचा पाया घातला गेला. या काळाला 'प्रबोधनयुग' असे म्हणतात.

या काळात कला, स्थापत्य, तत्त्वज्ञान इत्यादी क्षेत्रांमध्ये प्राचीन ग्रीक व रोमन परंपरांचे पुनरुज्जीवन घडून आले, मात्र प्रबोधन म्हणजे केवळ प्राचीन परंपरांचे पुनरुज्जीवन नव्हते. प्रबोधनाने सर्वांगीण प्रगतीला चालना दिली आणि जगाच्या इतिहासात नवयुग आणले.

**प्रबोधनाची सुरुवात :** मध्ययुगीन युरोपवर धर्माचा जबरदस्त पगडा होता. तेराव्या शतकापासून सर्व क्षेत्रांमध्ये बदल जाणवायला लागले. इटली हा देश या बदलाचा केंद्रबिंदू होता. इटलीतील दर्यावर्दी आशिया आणि युरोपातील देशांशी व्यापार करू लागले. या व्यापारामुळे इटलीमध्ये समृद्ध नगरे विकसित झाली, तसेच व्यापारी वर्ग उदयाला आला. या वर्गाने कलांना आश्रय दिला.

**प्रबोधनाचे स्वरूप :** प्रबोधनाचे सर्वांत महत्त्वाचे मूल्य म्हणजे मानवतावाद. या काळात माणसाचा माणसाकडे बघण्याचा दृष्टिकोन

बदलला. माणूस हा सर्वांत बुद्धिमान प्राणी आहे; बरे-वाईट, योग्य-अयोग्य याचा न्यायनिवाडा करणारी विवेकबुद्धी त्याच्याकडे असते; माणसाला भावभावना, इच्छा असणे हे स्वाभाविक आहे; माणूस स्वतः आपल्या जीवनाचा शिल्पकार असतो, असा माणसाबद्दलचा नवा विश्वास निर्माण झाला. माणूस हा सर्व विचारांचा केंद्रबिंदू बनला.

प्रबोधन ही जीवनाच्या सर्व क्षेत्रांना व्यापून टाकणारी एक व्यापक चळवळ होती. तत्त्वज्ञान, साहित्य, विज्ञान, संगीत, शिल्प, चित्रकला, स्थापत्य इत्यादी क्षेत्रांमध्ये तिचा आविष्कार झाला. या सर्व क्षेत्रांमध्ये नव्या कलाकृती निर्माण झाल्या. नव्या शैली विकसित झाल्या. प्रबोधनकाळात कला आणि साहित्यातून मानवी भावभावना, सुखदुःख, आनंद यांचे चित्रण होऊ लागले. लोकांना समजेल अशा प्रादेशिक भाषांमधून साहित्य निर्माण होऊ लागले. पूर्वी पुस्तके हस्तलिखित असत. इ. स. १४५० च्या सुमारास छपाईयंत्राचा शोध लागला. त्यामुळे नवे विचार, नव्या संकल्पना व ज्ञान समाजात सर्वांपर्यंत नेणे शक्य झाले.

प्रबोधनकालीन प्रगतीची कल्पना लिओनार्डो-द-व्हिन्सीच्या उदाहरणावरून येऊ शकते. अनेक कला व शास्त्रे लिओनार्डोला अवगत होती. तो चित्रकार होता, तसेच तो शिल्पकार, स्थापत्यकार व अभियंता होता. त्याला संगीताची उत्तम जाण होती. तो गणितज्ञ होता. खगोलशास्त्रज्ञही होता. माणसाच्या बौद्धिक आवाक्याला व आविष्काराला मर्यादा नाहीत, असे लिओनार्डोच्या चरित्रावरून जाणवते. शेक्सपिअरसारखा थोर नाटककार आणि कोपर्निकस, गॅलिलिओ यांसारखे थोर शास्त्रज्ञ प्रबोधनयुगात होऊन गेले.

**नव्या विज्ञानाची पहाट :** परंपरागत ज्ञान, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा इत्यादींना प्रबोधनकाळात आव्हान दिले जाऊ लागले. ज्ञानाच्या

निर्मितीसाठी माणूस आता ज्ञानेंद्रियांचा अधिक जाणीवपूर्वक उपयोग करू लागला. निरीक्षणशक्ती आणि प्रयोगशीलता यांच्या आधारे निसर्गातील गूढ ज्ञानाची उकल वैज्ञानिक करू लागले. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, खगोलशास्त्र इत्यादी ज्ञानशाखा विकसित झाल्या.

**धर्मसुधारणा चळवळ :** स्वतंत्र बुद्धीने विचार करणाऱ्या विचारवंतांनी जुन्या धार्मिक कल्पनांवरही हल्ला चढवला. लोकांच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन धर्मगुरू कर्मकांडाचे स्तोम माजवत. धर्माच्या नावावर त्यांना लुबाडत असत. याविरुद्ध युरोपात जी चळवळ झाली, तिला 'धर्मसुधारणा चळवळ' असे म्हणतात.

धर्मसंस्थेतील अनिष्ट प्रवृत्ती, धर्मगुरूंचे दांभिक वर्तन यांवर विक्लिफ, इरॅस्मस, केल्व्हिन इत्यादी विचारवंतांनी जोरदार टीका केली. 'बायबल' हा ख्रिस्ती धर्मग्रंथ लॅटिन भाषेत होता. ती भाषा सर्वसामान्य लोकांना समजत नसे. धर्मसुधारणा चळवळीच्या काळात 'बायबल'ची भाषांतरे इंग्रजी, फ्रेंच अशा लोकभाषांमध्ये केली गेली. बायबलमधील शिकवण आणि रोमन कॅथलिक चर्चची शिकवण यांमध्ये लोकांना खूपच तफावत आढळली. कॅथलिक चर्चमधील प्रचलित दोषांचा मार्टिन ल्यूथरने निषेध (प्रोटेस्ट) केला, म्हणून त्याच्या अनुयायांना 'प्रोटेस्टंट' असे नाव पडले. मूळच्या रोमन कॅथलिक पंथाच्या जोडीला प्रोटेस्टंट हा नवा ख्रिस्ती धर्मपंथ उदयाला आला.




मार्टिन ल्यूथर

धर्मसुधारणा चळवळ युरोपातील अनेक देशांमध्ये पसरली. नवोदित मध्यमवर्गाने धर्मसुधारणा चळवळीला पाठिंबा दिला. या चळवळीमुळे धार्मिक क्षेत्रात माणसाचे स्वातंत्र्य व बुद्धिप्रामाण्य या तत्त्वांना महत्त्व प्राप्त झाले.

**भौगोलिक शोध :** इसवी सनाच्या पंधराव्या शतकापर्यंत युरोपीय लोक पूर्वेकडील देशांमधून आयात केलेले मसाल्याचे पदार्थ, साखर, रेशीम, कापड, मौल्यवान वस्तू वापरत असत, मात्र त्यामध्ये अडथळा निर्माण झाला, कारण इ. स. १४५३ मध्ये ऑटोमन तुर्कांनी कॉन्स्टॅन्टिनोपल (इस्तंबूल) जिंकून घेतले. हे शहर म्हणजे बायझन्टाइन साम्राज्याची (पूर्वेकडील रोमन साम्राज्याची) राजधानी होती. तुर्कांनी त्यांच्या साम्राज्यातून जाणारे खुष्कीचे मार्ग म्हणजेच भूमार्ग रोखून धरले. त्यामुळे पूर्वेकडील देशांकडे जाण्यासाठी युरोपला आता नवे मार्ग शोधणे आवश्यक झाले.

बार्थोलोम्यू डायस हा पोर्तुगीज खलाशी भारताच्या शोधात आफ्रिकेच्या दक्षिण टोकापर्यंत पोहोचला. या टोकाला 'आशेचे भूशिर' (Cape of Good Hope) हे नाव मिळाले. भारताच्या शोधात निघालेला कोलंबस एका किनाऱ्याजवळ जाऊन पोहोचला. आपण भारतात उतरलो आहोत, असा त्याचा गैरसमज झाला. पुढे इटालियन खलाशी अमेरिगो व्हेस्पुसी हा कोलंबसच्या मार्गानेच त्या किनाऱ्यावर पोहोचला. हा भारताचा किनारा नाही, हे त्याच्यामुळे लक्षात आले. या अज्ञात प्रदेशाला अमेरिगोच्या नावावरून 'अमेरिका' हे नाव प्राप्त झाले. वास्को-द-गामा या पोर्तुगीज खलाश्याने १४९८ मध्ये भारताकडे येण्याचा सागरी मार्ग शोधला.

१५१९ साली फर्डिनांड मॅगेलन हा पोर्तुगीज खलाशी पृथ्वी प्रदक्षिणा करण्याच्या ईर्षेने सागरी सफरीवर निघाला. ही प्रदक्षिणा पूर्ण




The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright 2009.

होण्याच्या आधी तो चकमकीत मारला गेला, तरी त्याच्या सहकाऱ्यांनी ही पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण केली. जगाच्या इतिहासातील ही पहिली सागरी पृथ्वी प्रदक्षिणा होय.

**भौगोलिक शोधांचे परिणाम :** युरोपातून पूर्वेकडे जाणाऱ्या नव्या मार्गांमुळे युरोपचा आशिया व आफ्रिका खंडांशी असलेला व्यापार भरभराटीला आला. सुरुवातीला पोर्तुगाल व स्पेन हे देश या व्यापारात आघाडीवर होते. पुढे इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड इत्यादी युरोपीय देशांमध्ये व्यापारी स्पर्धा सुरू झाली. आपले राष्ट्र सधन व्हायचे असेल, तर राजसत्तेने आपल्या देशातील व्यापाराला व उद्योगांना संरक्षण दिले पाहिजे, अशी धारणा त्या काळात बळकट होऊ लागली. या आर्थिक धोरणाला 'व्यापारवाद' असे म्हटले जाते. युरोपीय व्यापारी त्यांचा नफा नव्या उद्योगांमध्ये गुंतवू लागले. व्यापारासाठी लागणारे भांडवल एकत्रितपणे उभारू लागले. यातून व्यापारी कंपन्यांची स्थापना होऊ लागली. भारतात आलेली ईस्ट इंडिया कंपनी ही अशीच व्यापारी कंपनी होती. व्यापारवाढीचा परिणाम म्हणून पतपेढीवाले, दलाल, दुकानदार, लिपिक, हिशेबनीस यांचा एक नवा वर्ग उदयाला आला. हा 'मध्यमवर्ग' म्हणून ओळखला गेला.

युरोपातील राष्ट्रांनी अमेरिका, आशिया, आफ्रिका व ऑस्ट्रेलिया खंडांतील देशांमध्ये आपल्या वसाहती स्थापन केल्या. युरोपीय व्यापारी वसाहतींमधून कमी किमतीला माल खरेदी करत. तो माल ते युरोपमध्ये जास्त किमतीला विकत असत. वसाहतींचे अधिक पद्धतशीरपणे आर्थिक शोषण करता यावे, म्हणून तेथे त्यांनी सत्ता बळकावली. या धोरणाला 'वसाहतवाद' असे म्हणतात.

प्रबोधन, धर्मसुधारणा चळवळ आणि भौगोलिक शोध यांमुळे

आधुनिक युगाची पार्श्वभूमी तयार झाली. आधुनिक युगाची खरी सुरुवात मात्र क्रांतियुगामुळे घडून आली. त्याचा अभ्यास आपण पुढील पाठात करूया.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) छपाईयंत्राचा शोध ······· च्या सुमारास लागला.
(१४५०, १५५०, १६५०)

(आ) 'बायबल' हा ख्रिस्ती धर्मग्रंथ ······· भाषेत होता.
(इंग्रजी, लॅटिन, फ्रेंच)

(इ) पोर्तुगीज खलाशी ······· याने १४९८ मध्ये भारताकडे येण्याचा मार्ग शोधला.
(बार्थोलोम्यू डायस, वास्को-द-गामा, फर्डिनांड मॅगेलन)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) लिओनार्डो-द-व्हिन्सी | (१) पृथ्वी प्रदक्षिणेची सफर |
| (आ) विक्लिफ | (२) चित्रकार |
| (इ) फर्डिनांड मॅगेलन | (३) धर्मगुरूंच्या दांभिक वर्तनावर टीका |
| | (४) अमेरिकेचा शोध |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्रबोधनाचे सर्वांत महत्त्वाचे मूल्य कोणते होते?

(आ) युरोपीय लोक पूर्वेकडील देशांमधून कोणत्या वस्तूंची आयात करत असत?

(इ) मार्टिन ल्यूथरच्या अनुयायांना 'प्रोटेस्टंट' असे नाव का पडले?

**उपक्रम**

फर्डिनांड मॅगेलन याच्या पृथ्वी प्रदक्षिणेच्या सागरी सफरीची माहिती मिळवा.

❑❑❑

# २. क्रांतियुग

मानवी जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या घटनेस 'क्रांती' असे म्हणतात. अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांती आणि औद्योगिक क्रांती या असे बदल घडवून आणणाऱ्या घटना होत्या. त्यांचा कालखंड म्हणजे अठरावे शतक हे क्रांतियुग म्हणून ओळखले जाते. या पाठात आपण या तीन घटनांचा परिचय करून घेऊया.


## अमेरिकेचे स्वातंत्र्ययुद्ध

अमेरिका खंडाच्या शोधानंतर युरोपातील अनेक लोक तेथे येऊन स्थायिक झाले. १६०७ ते १७३३ या काळात इंग्रजांनी उत्तर अमेरिकेत तेरा वसाहती स्थापन केल्या.

**वसाहतींसंबंधी इंग्लंडचे धोरण :** इंग्लंडमधील सरकारने उत्तर अमेरिकेतील या वसाहतींवर प्रशासन करायला सुरुवात केली. वसाहतींनी धान्य, तंबाखू , साखर इत्यादी माल इंग्लंडला विकावा, अशी इंग्लंडच्या राज्यकर्त्यांची धारणा होती. इंग्लंडने आपल्या मालाशी स्पर्धा करेल असा माल तेथे तयार करण्यावर बंदी घातली. इंग्लंडने वसाहतींतील चहा, साखर इत्यादी मालावर कर बसवले.

**इंग्लंडविषयी वसाहतींमध्ये तीव्र असंतोष :** इंग्लंडच्या जाचक बंधनातून मुक्त होणे आवश्यक आहे, असे वसाहतींना वाटू लागले. जॉर्ज वॉशिंग्टन, थॉमस जेफरसन यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन त्यांनी इंग्लंडविरुद्ध बंड पुकारले.

**बोस्टन टी पार्टी :** वसाहतींवरील निर्बंध इंग्लंडने रद्द करावे, वसाहतींना त्यांचा राज्यकारभार करू द्यावा, अशी मागणी तेथील नागरिक करू लागले. इंग्लंडने याला नकार देताच वसाहतींनी इंग्लंडच्या



**बोस्टन टी पार्टी**


मालावर बहिष्कार टाकला. १७७३ साली अमेरिकेतील बोस्टन बंदरात उभ्या असलेल्या इंग्लिश जहाजांवरील चहाच्या पेट्या काही नागरिकांनी समुद्रात फेकून दिल्या. यालाच 'बोस्टन टी पार्टी' असे म्हणतात.

**ना प्रतिनिधी, ना कर :** इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये वसाहतींचे प्रतिनिधी नव्हते. त्यामुळे वसाहतींसंबंधी कायदे करण्याचा व कर लादण्याचा अधिकार इंग्लंडच्या पार्लमेंटला नाही, अशी स्पष्ट भूमिका वसाहतींनी घेतली. 'ना प्रतिनिधी, ना कर' अशी घोषणा त्यांनी केली. इंग्लंडच्या सरकारने वसाहतींच्या मागण्या धुडकावून लावल्या. त्याचे पर्यवसान इंग्लंड व वसाहती यांच्या युद्धामध्ये झाले. वसाहतींच्या सैन्याचे नेतृत्व जॉर्ज वॉशिंग्टनकडे होते.



**जॉर्ज वॉशिंग्टन**

**स्वातंत्र्याचा जाहीरनामा :** ४ जुलै १७७६ रोजी वसाहतींनी आपल्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा घोषित केला. तो तयार करण्यात थॉमस जेफरसन याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. 'सर्व मानव समान आहेत; जीवित, स्वातंत्र्य व सुखाचा शोध घेणे हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत; या हक्कांची पायमल्ली करणारे सरकार बदलण्याचा अगर उलथून टाकण्याचा अधिकार लोकांना आहे,' असे या जाहीरनाम्यात घोषित करण्यात आले.



थॉमस जेफरसन

वसाहतींना स्वातंत्र्ययुद्धात विजय मिळाला आणि १७८३ मध्ये इंग्लंडने त्यांचे स्वातंत्र्य मान्य केले. जॉर्ज वॉशिंग्टन हे अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष झाले. तेरा वसाहतींनी १७८९ साली अमेरिकेचे संघराज्य स्थापन केले. 'अमेरिकेची संयुक्त संस्थाने' (U. S. A.) या नावाने हा देश ओळखला जाऊ लागला. अमेरिका हे पहिले लोकशाही, प्रजासत्ताक संघराज्य ठरले. जगात प्रथमच लिखित राज्यघटनेचा प्रयोग करण्यात आला.

अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धाने फ्रान्समधील क्रांतिकारकांना प्रेरणा मिळाली. तसेच एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत वसाहतवादविरोधी लढ्यांसाठी हे स्वातंत्र्ययुद्ध स्फूर्तिदायी ठरले.

## फ्रेंच राज्यक्रांती

फ्रान्समध्ये अनियंत्रित राजेशाही होती. तेथील लोकांनी एकत्र येऊन अनियंत्रित राजेशाही व सामंतशाहीचा पाडाव केला. लोकशक्तीचा असा

आविष्कार जगाच्या इतिहासात पहिल्यांदाच झाला. आज जगभर अनेक राष्ट्रांनी जी लोकशाही शासनपद्‌धती स्वीकारलेली दिसते, तिचा प्रसार या राज्यक्रांतीपासून झाला, म्हणूनच फ्रेंच राज्यक्रांतीपासून आधुनिक जगाच्या इतिहासाची सुरुवात झाली, असे मानले जाते.

फ्रान्समधील राज्यकर्ते विलासी बनले होते. बाहेरच्या जगातील घडामोडींकडे त्यांचे लक्ष नव्हते. प्रजेच्या कल्याणासाठी ते काहीही करत नव्हते. आर्थिक दिवाळखोरी माजली होती. त्यामुळे जनतेची राजाविषयीची निष्ठा कमी होऊ लागली.

**सामाजिक विषमता :** या काळात फ्रान्समध्ये सामाजिक विषमता तीव्र झाली होती. फ्रेंच समाजात तीन वर्ग होते. पहिला वर्ग वरिष्ठ धर्मगुरूंचा व दुसरा वर्ग अमीर-उमरावांचा होता. या दोन वर्गांचे संख्याबळ फ्रान्सच्या लोकसंख्येत नगण्य होते, पण देशाच्या जमिनीपैकी सुमारे ऐंशी टक्के जमीन त्यांच्या मालकीची होती. याशिवाय त्यांना अनेक सवलती असत. हे वर्ग ऐषारामी जीवन जगत होते. तिसऱ्या वर्गात व्यापारी, वकील, डॉक्टर, शिक्षक, शेतकरी-कामकरी, भूदास इत्यादींचा समावेश होता. त्या वर्गातील लोकांचे उत्पन्न कमी असूनही कराचा सर्व बोजा त्यांच्यावरच होता. वरिष्ठ वर्ग व सामान्य लोक यांच्यात मोठी सामाजिक व आर्थिक विषमता निर्माण झाली होती. या विषमतेला सुरुंग लावण्याचे काम तिसऱ्या वर्गाने केले.

फ्रान्समध्ये मॉंटेस्क्यू, व्हॉल्टेअर व रूसो या विचारवंतांनी नवे विचार मांडले. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ आणि न्यायमंडळ हे शासनयंत्रणेचे घटक एकमेकांपासून स्वतंत्र असावेत, हा सत्ताविभाजनाचा सिद्‌धान्त मॉंटेस्क्यूने मांडला. व्हॉल्टेअरने सामाजिक विषमतेवर टीकेची झोड उठवली. रूसोने ‘सामाजिक करार’ या ग्रंथातून जनतेच्या



व्हॉल्टेअर




रूसो

सार्वभौमत्वाचा सिद्धान्त मांडला. 'मानव हा जन्मतः स्वतंत्र असतो. समाजाचा गाडा सुरळीत चालावा, म्हणून जनता स्वतःवर काही बंधने लादून घेते. त्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्यव्यवस्था निर्माण करते. ती ईश्वरदत्त नसून एका सामाजिक करारातून निर्माण झालेली असते. जर राज्यसंस्थेने कराराचा भंग केला, तर ती राज्यव्यवस्था उलथून टाकण्याचा नैसर्गिक व नैतिक अधिकार समाजाला असतो.' त्याच्या या विचारांमुळे रूसो हा फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्गाता मानला जातो.

फ्रान्समधील विचारवंतांनी व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व दिले. अंधश्रद्धांना विरोध केला. नव्या उद्योगधंद्यांचा विकास त्यांना आवश्यक वाटू लागला. फ्रान्समध्ये नव्या विचारांचे वारे वाहू लागले. त्यामुळे फ्रेंच राज्यक्रांतीला चालना मिळाली.

**बॅस्टिलचा पाडाव :** फ्रान्समधील जनतेच्या हालअपेष्टा वाढत गेल्या. त्यामुळे जनतेतील असंतोष पराकोटीला गेला आणि क्रांतीचा भडका उडाला. संतप्त जमावाने १४ जुलै १७८९ रोजी बॅस्टिल तुरुंगावर हल्ला केला. हा तुरुंग अनियंत्रित राजेशाही व अन्यायाचे प्रतीक होता.




**बॅस्टिलचा पाडाव**

बॅस्टिलच्या तुरुंगावरील हल्ला म्हणजे सामान्य जनतेने अनियंत्रित सत्ताधीशांवर केलेला प्रहार होता.

**मानवी हक्कांचा जाहीरनामा :** क्रांतिकारकांनी मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रकाशित केला. या जाहीरनाम्यात स्वातंत्र्य, मालमत्ता व जीविताची सुरक्षितता, अन्यायाचा प्रतिकार हे मानवाचे मूलभूत अधिकार आहेत, असे नमूद करण्यात आले होते. संतप्त जनतेने फ्रान्समधील सामंतशाही उलथून टाकली. राजा सोळावा लुई याचा शिरच्छेद करून जनतेने राज्य स्थापन केले. फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता व बंधुता ही बहुमोल तत्त्वे जगाला दिली. जनतेच्या सार्वभौमत्वाचे तत्त्व प्रस्थापित केले. जगातील अनियंत्रित राजेशाहीविरुद्धच्या व पारतंत्र्यातील देशांच्या लढ्यांना ही क्रांती प्रेरणादायी ठरली, म्हणून मानवी इतिहासामध्ये फ्रेंच राज्यक्रांतीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

## औद्योगिक क्रांती

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून युरोपमध्ये औद्योगिक क्षेत्रात क्रांतिकारी बदल घडून येऊ लागले. बाष्पशक्तीवर चालणाऱ्या यंत्रांच्या साहाय्याने उत्पादन होऊ लागले. पुढे विद्युतशक्तीचा वापर सुरू झाला.



स्टीफन्सनने तयार केलेले इंजिन

घरगुती उद्योगांची जागा कारखान्यांनी घेतली. हातमागाऐवजी यंत्रमागाचा वापर सुरू झाला. आगगाडी आणि आगबोटीसारखी वाहतुकीची नवी साधने आली. यंत्रयुग अवतरले. ही क्रांती इंग्लंडमध्ये सुरू झाली आणि नंतर टप्प्याटप्प्याने पाश्चात्त्य जगात पसरत गेली. इंग्लंडची औद्योगिक भरभराट तर इतकी मोठी होती, की इंग्लंडचे वर्णन 'जगाचा कारखाना' असे केले जाऊ लागले.

## औद्योगिक क्रांतीचे परिणाम

औद्योगिक क्रांतीमुळे युरोपच्या आर्थिक प्रगतीस वेग आला. विविध प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन वाढले. अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला. वाहतुकीच्या व दळणवळणाच्या साधनांतील प्रगतीमुळे व्यापारात चांगली वाढ होऊ शकली. कारखानदारीमुळे वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. रोजगारात बरीच वाढ झालेली होती. त्यामुळे वस्तू विकत घेण्याची सामान्य जनतेची क्षमता वाढली. विविध वस्तू व स्वस्त भाव यांमुळे सर्वसामान्य जनतेचे राहणीमान सुधारण्यास मदत झाली.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात नव्या बाजारपेठांची गरज प्रकर्षाने भासू

लागली. अतिरिक्त भांडवल, आधुनिक यंत्रसामग्री व सुसज्ज सैन्य यांच्या बळावर युरोपीय राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडांत साम्राज्य विस्तार करण्यास सुरुवात केली. त्यामुळे अविकसित राष्ट्रांचे स्वातंत्र्य नष्ट झाले. ती साम्राज्यवादी राष्ट्रांना कच्चा माल पुरवणारी हुकमी बाजारपेठ बनली. भारतसुद्धा या प्रक्रियेचा बळी ठरला.

औद्योगिक क्रांतीमुळे शहरांची वाढ झाली. तेथे सुशिक्षित समाजाची वाढ झाली. त्याला आपल्या हक्कांची जाणीव होऊ लागली. त्यामुळे इंग्लंड व फ्रान्ससारख्या देशांत लोकशाहीचा विकास होण्यास मदत झाली. युरोपात नवी शहरे उदयास आली. पारंपरिक उद्योगधंदे नष्ट झाले. खेडी ओस पडू लागली. औद्योगिक शहरांमध्ये लोकांचे लोंढे येऊ लागले. असंख्य कामगार गलिच्छ वस्त्यांमधून राहू लागले. सार्वजनिक स्वच्छतेच्या अभावी रोगराई पसरू लागली. कामगार हलाखीचे जीवन जगू लागले.

आर्थिक विषमतेमुळे येणाऱ्या राजकीय व सामाजिक विषमतेविरुद्ध औद्योगिक राष्ट्रांमध्ये चळवळी उभ्या राहू लागल्या. उद्योगपती व कामगार संघटना यांच्यामध्ये संघर्ष वाढू लागला. समान हक्कांसाठी कामगार चळवळी, त्याचप्रमाणे स्त्रियांच्या चळवळी युरोपीय राष्ट्रांमध्ये सुरू झाल्या. या चळवळींचे फलित म्हणून युरोपमध्ये कल्याणकारी राज्याची कल्पना दृढ झाली. सर्वसामान्य माणसाचे जीवनमान सुधारले.

सांस्कृतिक क्षेत्रामध्ये सामान्य माणसाच्या जीवनाचे पडसाद उमटले. लघुकथा व कादंबरी हे नवे वाङ्मयप्रकार उदयास आले. चित्रकलेत सामान्य माणसाचे जीवन चितारले जाऊ लागले. पुढे विसाव्या शतकात तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे चित्रपट कलेचाही विकास झाला.

अविभक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास सुरू झाला. परंपरावाद,

अंधश्रद्धा यांचा प्रभाव कमी होऊ लागला. बुद्धिप्रामाण्यवादाचा प्रसार होण्यास मदत झाली; परंतु त्याचबरोबर पैसा हे मानवी यशाचे मोजमाप बनले. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी भोगवादी बनू लागली. मानवी जीवनात यांत्रिकपणा आला.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) १६०७ ते १७३३ या काळात इंग्रजांनी उत्तर अमेरिकेत ....... वसाहती स्थापन केल्या.
(तीन, नऊ, तेरा)

(आ) फ्रेंच राज्यक्रांतीचा ....... हा उद्गाता मानला जातो.
(रूसो, व्हॉल्टेअर, माँटेस्क्यू)

(इ) औद्योगिक क्रांती ....... सुरू झाली आणि नंतर टप्प्याटप्प्याने पाश्चात्त्य जगात पसरत गेली.
(फ्रान्समध्ये, इंग्लंडमध्ये, जर्मनीमध्ये)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) जॉर्ज वॉशिंग्टन | (१) वसाहतींच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा |
| (आ) थॉमस जेफरसन | (२) सत्ताविभाजनाचा सिद्धान्त |
| (इ) माँटेस्क्यू | (३) वसाहतींच्या सैन्याचे नेतृत्व |
| | (४) फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्गाता |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) अमेरिकेतील वसाहतींच्या कोणत्या मालावर इंग्लंडने कर बसवले ?

(आ) फ्रान्समध्ये तिसऱ्या वर्गात कोणाचा समावेश होता ?

(इ) फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला कोणती तत्त्वे दिली ?

**४. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) वसाहतींनी 'ना प्रतिनिधी, ना कर' अशी घोषणा का केली ?

(आ) माँटेस्क्यूने सत्ताविभाजनाच्या सिद्धान्तात कोणता विचार मांडला ?

(इ) मानवी हक्कांच्या जाहीरनाम्यात कोणते मूलभूत अधिकार आहेत ?

**५. कारणे लिहा.**

(अ) इंग्लंडच्या मालावर वसाहतींनी बहिष्कार टाकला.


(आ) फ्रान्समधील संतप्त जमावाने बॅस्टिलच्या तुरुंगावर हल्ला केला.

**उपक्रम**

(अ) अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा मिळवून त्याचे वर्गात वाचन करा.

(आ) मानवी हक्कांचा जाहीरनामा मिळवून वर्गातील भिंतीवर लावा.

❑❑❑




**इंग्लंडमधील आगगाडी (१८३०)**

# ३. भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना आणि विस्तार

वास्को-द-गामा भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत येथे येऊन पोहोचला. त्यानंतर सोळाव्या शतकाच्या सुरुवातीस पोर्तुगिजांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आपली सत्ता स्थिर केली. सतराव्या शतकात डच, इंग्रज व फ्रेंच व्यापारी भारतात आले. त्या वेळी भारतात मुघलांची प्रबळ सत्ता अस्तित्वात होती. या पार्श्वभूमीवर भारतातील इंग्रजी सत्तेची स्थापना आणि विस्तार यांची माहिती आपण घेऊया.

**युरोपीय व्यापाऱ्यांच्या प्रारंभिक हालचाली :** सुरुवातीस युरोपीय व्यापारी मुघल सम्राटाकडून परवाने मिळवून शांततेने व्यापार करत असत. व्यापाराच्या सोईसाठी पोर्तुगीज, डच, इंग्लिश व फ्रेंच व्यापारी कंपन्यांनी भारतात आपली व्यापारी ठाणी स्थापन केली. अशा ठाण्यास 'वखार' म्हणतात. औरंगजेब बादशाहाच्या मृत्यूनंतर मुघल सत्तेला



इंग्रजांची वखार - सुरत

उतरती कळा लागली. मुघल साम्राज्याचे सुभेदार स्वतंत्रपणे वागू लागले. देशात राजकीय अस्थिरता निर्माण झाली. त्याचा फायदा युरोपीय व्यापाऱ्यांनी घेतला.

**इंग्रज-फ्रेंच संघर्ष :** भारतात व्यापारी मक्तेदारी मिळवण्यासाठी परकीय सत्तांमध्ये अटीतटीची स्पर्धा होती. अठराव्या शतकात कर्नाटकच्या नवाबपदासाठी भारतीय सत्ताधीशांमध्ये तंटा सुरू झाला. कर्नाटकच्या राजकारणात चंचुप्रवेश करण्याची ही सुवर्णसंधी असल्याचे फ्रेंचांनी व इंग्रजांनी ओळखले. नवाबपद मिळवण्यासाठी उत्सुक असलेल्या एका स्पर्धकाला फ्रेंचांनी, तर त्याच्या विरोधकाला इंग्रजांनी लष्करी मदत दिली. या स्पर्धेमुळे इंग्रज व फ्रेंच यांच्यात तीन युद्धे झाली. ती 'कर्नाटक युद्धे' म्हणून ओळखली जातात. तिसऱ्या युद्धात इंग्रजांनी फ्रेंचांचा पराभव केला. त्यामुळे इंग्रजांना भारतात प्रबळ युरोपीय स्पर्धक उरला नाही.

**बंगालमधील राजकीय घडामोडी :** बंगालमध्ये इंग्रज व फ्रेंच व्यापारी त्यांना मिळालेल्या व्यापारी सवलतींचा गैरवापर करू लागले. सिराज उद्दौला या बंगालच्या नवाबाची परवानगी न घेता इंग्रजांनी आपल्या वखारींभोवती तटबंदी उभारली. यातूनच सिराज उद्दौला व इंग्रज यांच्यात संघर्ष सुरू झाला. १७५७ मध्ये प्लासी येथे लढाई झाली. मीर जाफर या सेनापतीला नवाबपदाचे आमिष दाखवून इंग्रजांनी आपल्याकडे वळवून घेतले. त्याच्या नेतृत्वाखालील नवाबाचे लष्कर युद्धात उतरलेच नाही. नवाबाला नाइलाजाने माघार घ्यावी लागली. अशा प्रकारे शस्त्रबळाचा वापर न करता इंग्रजांनी फंदफितुरीने प्लासीची लढाई जिंकली.

इंग्रजांच्या पाठिंब्याने मीर जाफर बंगालचा नवाब बनला, पण पुढे

त्याने विरोध करताच इंग्रजांनी त्याचा जावई मीर कासीम याला नवाब बनवले. इंग्रजांच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा घालण्याचा प्रयत्न मीर कासीमने केला, तेव्हा इंग्रजांनी मीर जाफरला पुन्हा नवाबपद दिले.

बंगालमधील इंग्रजांच्या कारवायांना लगाम घालण्यासाठी अयोध्येचा नवाब शुजा उद्दौला, मीर कासीम व मुघल बादशाह शाहआलम यांनी एकत्र मोहीम काढली. १७६४ साली बिहारमधील बक्सार येथे युद्ध झाले. त्यात इंग्रजांना विजय मिळाला. या लढाईनंतर अलाहाबादचा तह झाला. या तहान्वये बंगालच्या सुभ्यात महसूल गोळा करण्याचा अधिकार इंग्रजांनी मिळवला. याला 'दिवाणी अधिकार' असे म्हणतात. अशा प्रकारे भारतातील इंग्रजी सत्तेचा पाया बंगालमध्ये घातला गेला.

**इंग्रज-म्हैसूर संघर्ष :** म्हैसूरचे शासक व इंग्रज यांच्यात चार युद्धे झाली. म्हैसूरच्या हैदरअलीच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र टिपू सुलतान याने इंग्रजांविरुद्धची मोहीम नेटाने चालू ठेवली. १७९९ मध्ये श्रीरंगपट्टणच्या लढाईत टिपू धारातीर्थी पडला. त्यामुळे म्हैसूरचे राज्य इंग्रजांच्या वर्चस्वाखाली आले.



**टिपू सुलतान**

**इंग्रज व मराठे :** मुंबई हे इंग्रजांचे पश्चिम भारतातील प्रमुख केंद्र होते. त्याच्या जवळपासचा प्रदेश मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न होता; परंतु या प्रदेशावर मराठ्यांची घट्ट पकड होती. माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर रघुनाथरावाने पेशवेपदाच्या लालसेपोटी इंग्रजांची मदत मागितली. त्यामुळे मराठ्यांच्या राजकारणात इंग्रजांचा शिरकाव झाला.

१७७४ ते १८१८ या दरम्यान मराठे व इंग्रज यांच्यात तीन युद्धे झाली. पहिल्या युद्धात मराठा सरदारांनी एकजुटीने इंग्रजांना तोंड दिले. त्यामुळे मराठ्यांची सरशी झाली. १७८२ साली सालबाईचा तह होऊन पहिले इंग्रज-मराठा युद्ध संपले.

**तैनाती फौज :** १७९८ मध्ये लॉर्ड वेलस्ली गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आला. सर्व भारतावर इंग्रजांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे त्याचे धोरण होते. त्यासाठी त्याने अनेक भारतीय सत्ताधीशांशी तैनाती फौजेचे करार केले. या करारांन्वये भारतीय सत्ताधीशांना इंग्रजांच्या लष्करी मदतीचे आश्वासन देण्यात आले, मात्र त्यासाठी काही अटी घातल्या. भारतीय राज्यकर्त्यांनी त्यांच्या राज्यात इंग्रजांचे लष्कर ठेवावे, त्या लष्कराच्या खर्चासाठी रोख रक्कम किंवा तेवढ्या उत्पन्नाचा प्रदेश कंपनीला तोडून द्यावा, त्यांनी इतर सत्ताधीशांशी इंग्रजांच्या मध्यस्थीनेच संबंध ठेवावे, आपल्या दरबारी इंग्रजांचा रेसिडेंट (प्रतिनिधी) ठेवावा अशा त्या अटी होत्या. भारतातील काही सत्ताधीशांनी ही पद्धत स्वीकारली व आपले स्वातंत्र्य गमावले.

१८०२ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्याने इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केला. हा करार वसईचा तह म्हणून प्रसिद्ध आहे; परंतु हा तह काही मराठा सरदारांना मान्य नव्हता. त्यामुळे दुसरे इंग्रज-मराठा युद्ध झाले. त्यातील विजयानंतर इंग्रजांचा मराठी राज्यातील हस्तक्षेप वाढू लागला. तो असह्य होऊन दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारले. या युद्धात त्याचा पराभव झाला. १८१८ मध्ये त्याने शरणागती पत्करली.

**सिंधवर इंग्रजांचा ताबा :** भारतातील आपली सत्ता सुरक्षित करण्यासाठी इंग्रज वायव्य सरहद्दीकडे वळले. रशिया भारतावर अफगाणिस्तानातून आक्रमण करेल अशी त्यांना भीती होती, म्हणून

इंग्रजांनी अफगाणिस्तानवर आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचे ठरवले. अफगाणिस्तानकडे जाणारे मार्ग सिंधमधून जात होते. यामुळे सिंधचे महत्त्व इंग्रजांच्या ध्यानात आले आणि १८४३ साली त्यांनी सिंध गिळंकृत केला.

**शीख सत्तेचा पाडाव :** एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी पंजाबमधील शीख राज्याची सत्ता रणजितसिंहाच्या हाती होती. रणजितसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा अल्पवयीन मुलगा दलीपसिंग गादीवर बसला. त्याच्या वतीने त्याची आई राणी जिंदन राज्याचा कारभार पाहू लागली, मात्र सरदारांवर तिचा अंकुश राहिला नाही. ही संधी साधून इंग्रजांनी काही शीख सरदारांना फितूर केले. इंग्रज पंजाबवर आक्रमण करणार, असा शिखांचा समज झाल्यामुळे त्यांनी इंग्रजांवर हल्ला केला. या पहिल्या शीख-इंग्रज युद्धात शिखांचा पराभव झाला.


रणजितसिंह

दलीपसिंगाला इंग्रजांनी गादीवर कायम ठेवले. पंजाबवरील इंग्रजांचा वाढता प्रभाव काही स्वातंत्र्यप्रिय शिखांना जाचू लागला. मुलतानचा अधिकारी मूलराज याने इंग्रजांविरुद्‌ध बंड केले. हजारो शीख सैनिक इंग्रजांविरुद्‌ध युद्‌धात उतरले. या दुसऱ्या युद्‌धातही शीख पराभूत झाले. १८४९ मध्ये इंग्रजांनी पंजाबचा प्रदेश आपल्या राज्याला जोडला.

अशा प्रकारे देशी सत्तांना निष्प्रभ करून इंग्रजांनी भारतात आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) इंग्रजांच्या बेकायदेशीर व्यापाराला आळा घालण्याचा प्रयत्न ······· याने केला.
(सिराज उद्दौला, मीर जाफर, मीर कासीम)

(आ) १८०२ मध्ये ······· या पेशव्याने इंग्रजांशी तैनाती फौजेचा करार केला.
(माधवराव, रघुनाथराव, दुसरा बाजीराव)

(इ) इंग्रजांविरुद्ध ······· अधिकारी मूलराज याने बंड केले.
(मुलतानचा, बंगालचा, कर्नाटकचा)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सिराज उद्दौला व इंग्रज यांच्यात संघर्ष का सुरू झाला ?

(आ) मराठ्यांच्या राजकारणात इंग्रजांचा शिरकाव का झाला ?

(इ) इंग्रजांनी अफगाणिस्तानवर प्रभाव प्रस्थापित करण्याचे का ठरवले ?

**३. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) इंग्रज व फ्रेंच यांच्यात युद्धे का झाली ?

(आ) तैनाती फौजेच्या अटी कोणत्या होत्या ?

**४. कारणे लिहा.**

(अ) इंग्रजांनी मीर जाफरला पुन्हा नवाबपद दिले.

(आ) दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांविरुद्ध युद्ध पुकारले.

### उपक्रम

भारताच्या नकाशात खालील ठिकाणे दाखवा.
प्लासी, बक्सार, श्रीरंगपट्टण, अलाहाबाद, वसई.

❑❑❑

# ४. ब्रिटिश सत्तेचा भारतावरील परिणाम

इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीने १७५७ ते १८५६ या कालावधीत जवळजवळ संपूर्ण भारत हस्तगत केला. आपली सत्ता दृढ करण्यासाठी इंग्रजांनी येथे नवी राज्यव्यवस्था उभारली. त्याची माहिती या पाठात पाहूया.

**दुहेरी राज्यव्यवस्था :** रॉबर्ट क्लाइव्हने १७६५ साली बंगालमध्ये दुहेरी राज्यव्यवस्था अस्तित्वात आणली. महसूल गोळा करण्याचे काम कंपनीने हाती घेतले, तर शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम बंगालच्या नवाबाकडे ठेवले. यालाच 'दुहेरी राज्यव्यवस्था' असे म्हणतात.

दुहेरी राज्यव्यवस्थेचे दुष्परिणाम कालांतराने दिसू लागले. सामान्य जनतेकडून कररूपाने वसूल केलेले पैसे कंपनीतील अधिकाऱ्यांनी स्वतःच्या खिशात घातले. भारतातील व्यापाराचा मक्ता फक्त ईस्ट इंडिया कंपनीला दिल्यामुळे इंग्लंडमधील अनेक व्यापाऱ्यांना कंपनीचा हेवा वाटत होता. कंपनीच्या भारतातील कारभारावर इंग्लंडमध्ये टीका होऊ लागली, तेव्हा कंपनीच्या कारभारावर नियंत्रण घालण्यासाठी इंग्लंडच्या पार्लमेंटने काही महत्त्वाचे कायदे केले.

**पार्लमेंटने केलेले कायदे :** १७७३ च्या रेग्युलेटिंग ॲक्टनुसार बंगालच्या गव्हर्नरला 'गव्हर्नर जनरल' असा हुद्दा देण्यात आला. मुंबई व मद्रास इलाख्यांच्या धोरणावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार त्याला मिळाला. त्याच्या मदतीला चार सदस्यांची समिती नेमण्यात आली.

१७८४ मध्ये पिटचा भारतविषयक कायदा मंजूर झाला. कंपनीच्या भारतातील राज्यकारभारावर पार्लमेंटचे नियंत्रण ठेवण्यासाठी एक कायम स्वरूपाचे नियामक मंडळ स्थापन करण्यात आले. कंपनीला भारतातील

राज्यकारभाराविषयी आदेश देण्याचा अधिकार या मंडळाला देण्यात आला. १८१३, १८३३ व १८५३ मध्ये कंपनीच्या कारभारात फेरबदल करणारे कायदे पार्लमेंटने केले. अशा प्रकारे कंपनीच्या भारतातील प्रशासनावर ब्रिटिश सरकारचे अप्रत्यक्ष नियंत्रण अस्तित्वात आले.

इंग्रज सत्तेच्या आगमनापाठोपाठ नवी प्रशासकीय पद्धत भारतात रूढ झाली. मुलकी नोकरशाही, लष्कर, पोलीस दल व न्यायसंस्था हे इंग्रजांच्या भारतातील प्रशासनाचे प्रमुख आधारस्तंभ होते.

**मुलकी नोकरशाही :** भारतात इंग्रजांची सत्ता दृढ करण्यासाठी इंग्रजांना नोकरशाहीची गरज होती. लॉर्ड कॉर्नवालिस याने नोकरशाहीची निर्मिती केली. मुलकी नोकरशाही हा इंग्रजी शासनाचा महत्त्वाचा घटक बनला. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी खासगी व्यापार करू नये, असा नियम त्याने घालून दिला. त्यासाठी त्याने अधिकाऱ्यांचे पगार वाढवले.

प्रशासनाच्या सोईसाठी इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेशांची जिल्हावार विभागणी करण्यात आली. जिल्हाधिकारी हा जिल्हा शासनाचा प्रमुख असे. महसूल गोळा करणे, न्याय देणे, शांतता व सुव्यवस्था राखणे ही त्याची जबाबदारी असे. अधिकाऱ्यांची भरती इंडियन सिव्हिल सर्व्हिसेस (आय. सी. एस.) या स्पर्धात्मक परीक्षेद्वारे केली जाऊ लागली.

**लष्कर व पोलीस दल :** भारतातील इंग्रजांच्या ताब्यातील प्रदेशांचे संरक्षण करणे, नवे प्रदेश हस्तगत करणे व भारतातील इंग्रजांविरोधी उठाव मोडून काढणे ही लष्कराची कामे होती. देशात कायदा व सुव्यवस्था राखणे हे पोलीस दलाचे काम असे.

**न्यायव्यवस्था :** इंग्लंडमधील न्यायव्यवस्थेच्या धर्तीवर इंग्रजांनी भारतात नवी न्यायव्यवस्था स्थापन केली. प्रत्येक जिल्ह्यात मुलकी

खटल्यासाठी दिवाणी न्यायालय व फौजदारी खटल्यासाठी फौजदारी न्यायालय स्थापन केले. त्यांच्या निर्णयांच्या फेरविचारासाठी उच्च न्यायालये स्थापन केली.

**कायद्यापुढील समानता :** भारतामध्ये पूर्वी ठिकठिकाणी वेगवेगळे कायदे होते. न्यायदानात जातींनुसार भेदभाव केला जाई. लॉर्ड मेकॉलेच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या विधिसमितीने कायद्याची संहिता तयार केली. सर्व भारतात एकच कायदा लागू केला. कायद्यापुढे सर्व समान आहेत, हे तत्त्व इंग्रजांनी रूढ केले.

या पद्धतीतसुद्धा काही दोष होते. युरोपीय लोकांवरील खटले चालवण्यासाठी स्वतंत्र न्यायालये व वेगळे कायदे अस्तित्वात होते. नवे कायदे सामान्य लोकांना समजत नसत. न्याय ही सामान्य लोकांसाठी खूपच खर्चीक बाब होती. खटले वर्षानुवर्षे चालत.

**इंग्रजांची आर्थिक धोरणे :** प्राचीन काळापासून भारतावर आक्रमणे होत राहिली. अनेक आक्रमक भारतामध्ये स्थायिक झाले. ते भारतीय संस्कृतीशी समरस झाले. त्यांनी जरी येथे राज्य केले, तरी भारताच्या अर्थव्यवस्थेत मूलभूत बदल केले नाहीत. इंग्रजांचे मात्र असे नव्हते.

इंग्लंड हे आधुनिक राष्ट्र होते. औद्योगिक क्रांतीमुळे तेथे भांडवलशाही अर्थव्यवस्था रूढ झाली होती. या व्यवस्थेला पोषक अशी अर्थव्यवस्था त्यांनी भारतात रुजवली. त्यामुळे इंग्लंडचे आर्थिक लाभ झाले; परंतु भारतीयांचे मात्र आर्थिक शोषण होऊ लागले.

**जमीन महसूलविषयक धोरण :** इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वी खेड्यातील अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण होती. शेती व इतर उद्योग यांच्याद्वारे गावाच्या गरजा गावातच भागत असत. जमीन महसूल हे

राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. इंग्रजपूर्व काळात पिकानुरूप शेतसारा आकारला जात असे. पीक चांगले आले नाही, तर शेतसाऱ्यात सूट मिळे. महसूल प्रामुख्याने धान्यरूपाने घेतला जाई. शेतसारा भरण्यास उशीर झाला, तरी शेतकऱ्यांकडून जमीन काढून घेतली जात नसे.

उत्पन्न वाढवण्यासाठी इंग्रजांनी महसूल पद्धतीत महत्त्वाचे बदल केले. इंग्रजांनी जमिनीची मोजणी करून जमिनीच्या क्षेत्रानुसार शेतसाऱ्याची आकारणी निश्चित केली. रोख रकमेत व ठरावीक वेळेत शेतसारा भरावा अशी सक्ती केली. शेतसारा वेळेत न भरल्यास शेतकऱ्यांची जमीन जप्त केली जाईल, असा नियम केला. महसूल गोळा करण्याची इंग्रजांची पद्धत भारताच्या वेगवेगळ्या भागांत वेगवेगळी होती. सर्वत्र शेतकऱ्यांचे शोषण होत असे.

**नव्या जमीन महसूलव्यवस्थेचे परिणाम :** नव्या जमीन महसूलव्यवस्थेचे अनिष्ट परिणाम ग्रामीण जीवनावर झाले. शेतसारा भरण्यासाठी येईल त्या किमतीला शेतकरी पीक विकू लागले. व्यापारी व दलाल वाजवीपेक्षा कमी दराने त्यांचा माल खरेदी करू लागले. प्रसंगी शेतकऱ्यांना सारा भरण्यासाठी सावकाराकडे जमीन गहाण टाकून कर्ज घ्यावे लागे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले. कर्जफेड झाली नाही तर त्यांना आपल्या जमिनी विकाव्या लागत. सरकार, जमीनदार, सावकार, व्यापारी हे सर्व शेतकऱ्यांचे शोषण करत असत.

**शेतीचे व्यापारीकरण :** पूर्वी शेतकरी प्रामुख्याने अन्नधान्य पिकवत असत. हे अन्नधान्य त्यांना घरच्या वापरासाठी व गावाची गरज भागवण्यासाठी उपयोगी पडत असे. कापूस, नीळ, तंबाखू, चहा इत्यादी नगदी पिकांना इंग्रज सरकार उत्तेजन देऊ लागले. अन्नधान्याच्या लागवडीपेक्षा नफा मिळवून देणारी व्यापारी पिके घेण्यावर जो भर दिला जाऊ लागला, त्या प्रक्रियेला 'शेतीचे व्यापारीकरण' असे म्हणतात.

**दुष्काळ :** १८६० ते १९०० या काळात भारतात मोठे दुष्काळ पडले; परंतु इंग्रज राज्यकर्त्यांनी दुष्काळ निवारणासाठी पुरेसे प्रयत्न केले नाहीत. तसेच पाणीपुरवठ्याच्या योजनांवर फारसा खर्चही केला नाही.

**वाहतूक व दळणवळण व्यवस्थेत सुधारणा :** इंग्रजांनी व्यापारवृद्धी आणि प्रशासनाची सोय यांसाठी भारतात वाहतूक व दळणवळण यांच्या आधुनिक सोईसुविधा निर्माण केल्या. कोलकता व दिल्ली यांना जोडणारा महामार्ग त्यांनी बांधला. १८५३ साली मुंबई-ठाणे मार्गावर आगगाडी धावू लागली. त्याच वर्षी तारायंत्राद्वारे संदेश



मुंबई-ठाणे रेल्वे - १८५३


पाठवण्याची यंत्रणा इंग्रजांनी भारतात सुरू केली. या यंत्रणेने भारतातील प्रमुख शहरे आणि लष्करी ठाणी एकमेकांना जोडली गेली. त्याचप्रमाणे इंग्रजांनी डाकव्यवस्थाही सुरू केली.

या सर्व सुधारणांमुळे भारतीय समाजजीवनावर दूरगामी परिणाम झाले. देशाच्या विविध भागांमधील लोकांचा परस्परांशी संपर्क वाढला. त्यामुळे त्यांच्यातील एकतेची भावना वाढण्यास हातभार लागला.

**भारतातील जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास :** भारतातून इंग्लंडला

जाणाऱ्या मालावर इंग्रज सरकार जबरदस्त कर आकारत असे. उलट इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या मालावर अतिशय कमी कर आकारण्यात येई. तसेच इंग्लंडमधून येणारा माल हा यंत्रावर तयार झालेला असे. त्यामुळे त्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणात व कमी खर्चात होई. अशा स्वस्त मालाशी स्पर्धा करणे भारतीय कारागिरांना कठीण झाले. परिणामी भारतातील काही उद्योगधंदे बंद पडले व अनेक कारागीर बेकार झाले.

**भारतात नव्या उद्योगधंद्यांचा विकास :** इंग्रज सरकारचा पाठिंबा, व्यवस्थापनाचा अनुभव व भांडवल इत्यादी गोष्टींच्या अभावामुळे भारतीय उद्योजक मोठ्या संख्येने पुढे येऊ शकले नाहीत; परंतु अशा अडचणींवर मात करून काही भारतीयांनी उद्योगांची उभारणी केली.



**जमशेदजी टाटा**

१८५३ मध्ये कावासजी नानाभॉय यांनी मुंबईत पहिली कापड गिरणी सुरू केली. १८५५ मध्ये बंगालमधील रिश्रा येथे तागाची पहिली गिरणी सुरू झाली. १९०७ साली जमशेदजी टाटा यांनी जमशेदपूर येथे टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचा पोलाद निर्मितीचा कारखाना स्थापन केला.

भारतामध्ये कोळसा, धातू, साखर, सिमेंट व रासायनिक द्रव्ये या उद्योगांनाही सुरुवात झाली.

**सामाजिक व सांस्कृतिक परिणाम :** एकोणिसाव्या शतकात युरोपमध्ये मानवतावाद, बुद्धिवाद, लोकशाही, राष्ट्रवाद, उदारमतवाद या मूल्यांवर आधारित नवे युग साकारले होते. पाश्चिमात्य जगातील या

परिवर्तनाचे पडसाद भारतातसुद्‌धा उमटणे स्वाभाविक होते. इंग्रजांना प्रशासन चालवण्यासाठी भारतातील समाजाची ओळख करून घ्यायची होती. त्यासाठी त्यांनी येथील परंपरा, इतिहास, साहित्य, कला, तसेच येथील संगीत, प्राणी-पक्षी यांचाही अभ्यास करण्यास सुरुवात केली. १७८४ साली विल्यम जोन्स या इंग्रज अधिकाऱ्याने कोलकता येथे एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल ही संस्था स्थापन केली. मॅक्सम्युलर हा जर्मन विचारवंत भारतीय धर्म, भाषा, इतिहास यांचा गाढा अभ्यासक होता. या उदाहरणांमुळे आपणही आपला धर्म, इतिहास, परंपरा यांचा अभ्यास करायला हवा, अशी जाणीव नवशिक्षित भारतीयांमध्ये होऊ लागली.

इंग्रजांनी भारतात अनेक कायदे केले. १८२९ मध्ये लॉर्ड बेंटिंकने सतीबंदीचा कायदा केला. १८५६ मध्ये लॉर्ड डलहौसीने विधवा पुनर्विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. हे कायदे समाजसुधारणेस पूरक ठरले.


**लॉर्ड बेंटिंक**

प्रशासन चालवण्यासाठी ब्रिटिशांना इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांची गरज होती. लॉर्ड मेकॉलेच्या शिफारशीनुसार १८३५ मध्ये भारतात पाश्चात्त्य शिक्षण सुरू करण्यात आले. नव्या शिक्षणाद्‌वारे नवे पाश्चात्त्य विचार, आधुनिक सुधारणा, विज्ञान व तंत्रज्ञान यांची भारतीयांना ओळख करून देण्यात आली. १८५७ साली मुंबई, मद्रास (चेन्नई) व कोलकता येथे विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गाने भारतातील सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीचे नेतृत्व केले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) रॉबर्ट क्लाइव्हने १७६५ साली ....... दुहेरी राज्यव्यवस्था अस्तित्वात आणली.
(महाराष्ट्रामध्ये, बंगालमध्ये, पंजाबमध्ये)

(आ) १८५३ मध्ये कावासजी नानाभॉय यांनी ....... येथे पहिली कापड गिरणी सुरू केली.
(मुंबई, कोलकता, अहमदाबाद)

(इ) विधवा पुनर्विवाहाला मान्यता देणारा कायदा ....... याने केला.
(लॉर्ड डलहौसी, लॉर्ड बेंटिंक, लॉर्ड रिपन)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) इंग्रजांच्या भारतातील प्रशासनाचे प्रमुख आधारस्तंभ कोणते होते ?
(आ) इंग्रजांनी शेतसाऱ्यासाठी कोणती सक्ती केली ?
(इ) जमशेदजी टाटा यांनी जमशेदपूर येथे कोणता कारखाना सुरू केला ?

**३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) दुहेरी राजव्यवस्था म्हणजे काय ?
(आ) 'शेतीचे व्यापारीकरण' म्हणजे काय ?
(इ) भारतातील उद्योगधंदे बंद का पडले ?

**४. पुढील तक्ता पूर्ण करा.**

| व्यक्ती | सुधारणा |
|---|---|
| (अ) लॉर्ड कॉर्नवालिस | ----- |
| (आ) लॉर्ड बेंटिंक | ----- |
| (इ) लॉर्ड डलहौसी | ----- |

### उपक्रम

(अ) तुमच्या पालकांशी चर्चा करून आपल्याला कोणते कर भरावे लागतात, त्यांची यादी तयार करा.

(आ) वाहतूक व दळणवळण यांमधील सुधारणांमुळे भारतीय समाजजीवनावर कोणते परिणाम झाले, याबद्दल वर्गात चर्चा करा.

❑❑❑

# ५. १८५७ चा स्वातंत्र्यलढा

१८५७ साली इंग्रज सत्तेला हादरवून टाकणारा मोठा लढा भारतात झाला. हा लढा काही अचानक उद्भवला नाही. त्यापूर्वीही भारतात इंग्रजांविरुद्ध अनेक लढे झाले होते. मात्र १८५७ च्या लढ्याची व्याप्ती आणि त्यामागची भूमिका लक्षात घेऊन त्याला 'स्वातंत्र्यसमर' हे नाव स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी दिले. सावरकरांनी ज्या पुस्तकातून ही मांडणी केली त्या '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या पुस्तकाने अनेक क्रांतिकारकांना ब्रिटिशांविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली.

**१८५७ पूर्वीचे लढे :** भारतात ज्या ज्या भागात इंग्रजांची सत्ता स्थापन झाली, तेथील लोकांना इंग्रज शासनाचे दुष्परिणाम भोगावे लागले. त्यामुळे त्यांनी इंग्रजांच्या विरोधात लढे दिले. शेतकरी, कारागीर, आदिवासी, फकीर, सैनिक अशा विविध गटांनी हे लढे दिले.

कंपनी सरकारच्या काळात शेतकऱ्यांचे शोषण झाले. त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला. सन १७६३ ते १८५७ या काळात बंगालमध्ये प्रथम संन्याशांच्या व त्यानंतर फकिरांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी लढे दिले. असेच लढे गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र व दक्षिण भारतातही झाले.

भारतातील आदिवासी व वन्य जमातींनीही इंग्रज सत्तेला आव्हान दिले. जंगल संपत्तीवर उदरनिर्वाह करण्याच्या त्यांच्या हक्कांवर ब्रिटिशांच्या कायद्यांनी गदा आणली. छोटा नागपूर परिसरातील कोलाम, उडीसातील गोंड, महाराष्ट्रातील कोळी, भिल्ल, रामोशी यांनी इंग्रजांविरुद्ध लढे दिले. बिहारमध्ये संथाळांनी फार मोठ्या प्रमाणावर लढा दिला. हा लढा दडपण्यासाठी इंग्रजांना अनेक वर्षे लष्करी मोहिमा

कराव्या लागल्या. महाराष्ट्रात उमाजी नाईक यांनी केलेला लढाही असाच उग्र होता. उमाजींनी आपल्या रामोशी बांधवांना व स्थानिक युवकांना संघटित करून इंग्रजांविरुद्‌ध बंड केले. त्यांनी एक जाहीरनामा काढून इंग्रजांविरुद्‌ध लढा देण्याचे व इंग्रजी सत्ता झुगारून देण्याचे आवाहन केले. १८३२ साली त्यांना फाशी देण्यात आले.

कोल्हापूर परिसरात गडकऱ्यांनी व कोकणात फोंड-सावंतांनी इंग्रजांविरुद्‌ध लढे दिले. इंग्रजांच्या दडपशाहीविरुद्‌ध १८५७ सालापूर्वी देशाच्या निरनिराळ्या भागांत काही जमीनदार आणि राजेरजवाड्यांनीही लढे दिले.

इंग्रजांच्या लष्करातील हिंदी शिपायांनीदेखील आपल्या अधिकाऱ्यांविरुद्‌ध वेळोवेळी लढे दिले होते. त्यांपैकी १८०६ सालचा वेल्लोर येथील तसेच १८२४ सालचा बराकपूर येथील लढा, असे दोन्ही लढे विशेष उग्र स्वरूपाचे होते.

इंग्रजांच्या विरोधी झालेले हे सर्व लढे स्थानिक स्वरूपाचे व एकाकी असल्यामुळे इंग्रजांनी ते मोडून काढले हे खरे; परंतु त्यामुळे लोकांमधील असंतोष फक्त दडपला गेला. तो नाहीसा झाला नाही, मात्र जनतेतील असंतोषाचा वणवा १८५७ मध्ये भडकला. दारूच्या कोठारावर ठिणगी पडावी तसे १८५७ साली घडले आणि भारतातील भिन्न वर्गांमध्ये साचत गेलेल्या इंग्रजविरोधी असंतोषाचा उद्रेक अभूतपूर्व अशा लढ्याने झाला.

**१८५७ च्या लढ्याची कारणे :** इंग्रजपूर्व काळात भारतात राजवट बदलली तरी गावगाडा पूर्वीसारखा चालू राही. इंग्रजांनी मात्र प्रचलित व्यवस्था मोडून नवीन व्यवस्था अस्तित्वात आणली. त्यामुळे भारतीयांच्या मनात अस्थिरतेची व असुरक्षिततेची भावना निर्माण झाली व वाढत गेली.

**आर्थिक कारणे :** इंग्रजांनी सुरू केलेल्या नव्या महसूल पद्धतीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती खालावली. इंग्रजांच्या व्यापारी धोरणामुळे भारतातील उद्योगधंद्यांचा ऱ्हास झाला. त्यामुळे अनेक कारागीर बेकार झाले. त्यांच्या मनात इंग्रजविरोधी भावना बळावली. तसेच जी संस्थाने इंग्रजांनी ताब्यात घेतली, तेथील सैनिक बेकार झाले व तेही इंग्रजांचे विरोधक बनले.

**सामाजिक कारणे :** भारतीय समाजातील अनेक परंपरागत चालीरीती व रूढी यांत इंग्रज शासकांनी हस्तक्षेप केला. त्यांनी सतीबंदीचा कायदा, विधवा विवाहविषयक कायदा असे कायदे केले. असे कायदे करून परकीय सरकार आपली जीवनपद्धती मोडू पाहत आहे, असा लोकांचा समज झाला. त्यामुळे ते असंतुष्ट बनले.

**राजकीय कारणे :** १७५७ सालापासून इंग्रजांनी अनेक भारतीय राज्ये नष्ट केली होती. सन १८४८ ते १८५६ या दरम्यान लॉर्ड डलहौसी याने अनेक संस्थाने खालसा केली. गैरकारभाराची सबब पुढे करून त्याने अयोध्येच्या नवाबाला पदच्युत केले. त्याचे संस्थान ताब्यात घेतले. सातारा, झाशी, नागपूर इत्यादी काही संस्थाने तेथील राजांच्या दत्तकपुत्रांचा वारसाहक्क नामंजूर करून खालसा केली. काही पदच्युत राजांच्या वारसदारांचे तनखे रद्द केले. त्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला.

**हिंदी सैनिकांतील असंतोष :** हिंदी सैनिकांना इंग्रज अधिकारी तुच्छतेने वागवत. सैन्यात सुभेदारपदापेक्षा वरचे पद त्यांना दिले जात नसे. गोऱ्या सैनिकांपेक्षा त्यांचा पगार कमी असे. त्यांना सुरुवातीला दिले जाणारे भत्तेही इंग्रजांनी हळूहळू कमी केले. अशा अनेक कारणांमुळे हिंदी सैनिकांत असंतोष साचत गेला.

**तात्कालिक कारण :** इंग्रजांनी १८५६ साली हिंदी सैनिकांच्या हाती लांब पल्ल्याच्या एन्फिल्ड बंदुका दिल्या. त्यात वापरण्यासाठी नवी काडतुसे दिली. त्या काडतुसांवरील आवरण दातांनी तोडावे लागे. काडतुसांवरील आवरणाला गाईची किंवा डुकराची चरबी लावलेली असते, अशी बातमी पसरली. त्यामुळे हिंदू-मुस्लिमांच्या धार्मिक भावना दुखावल्या आणि सैनिकांमध्ये असंतोष पसरला.


मंगल पांडे

**वणवा पेटला :** २९ मार्च १८५७ रोजी पहिला भडका बराकपूर येथील लष्करी छावणीत उडाला. काडतुसे वापरण्याची सक्ती करणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यावर मंगल पांडे यांनी गोळी झाडली. त्यांना अटक करून फाशी दिले गेले. ही बातमी देशातील इतर लष्करी छावण्यांमध्ये वणव्यासारखी पसरली. १० मे १८५७ रोजी मेरठ छावणीतील हिंदी सैनिकांची पूर्ण पलटणच बंड करून उठली. सैनिकांनी दिल्लीकडे कूच केले. वाटेत हजारो सामान्य नागरिक त्यांना सामील झाले. दिल्लीला पोचताच तेथील इंग्रजांच्या छावणीतील हिंदी शिपाई त्यांना येऊन मिळाले. त्यांनी मुघल बादशहा बहादुरशाहा जफर यांच्याकडे लढ्याचे नेतृत्व दिले. भारताचा सम्राट म्हणून त्यांच्या नावाने दवाही फिरवण्यात आली.

**लढ्याची व्याप्ती :** पाहता पाहता लढ्याचे लोण उत्तर भारतभर पसरले. बिहारपासून राजपुतान्यापर्यंतच्या इंग्रज छावण्यांतील हिंदी सैनिकांनी बंडाचे निशाण उभारले. त्यांना अनेक लोक येऊन मिळाले. मे महिन्यात लढ्याला सुरुवात झाल्यानंतरच्या तीन-चार महिन्यांत पूर्व




The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright 2009.

पंजाब, दिल्लीचा परिसर, रोहिलखंड, बुंदेलखंड, अलाहाबाद, अयोध्या, पश्चिम बिहार या प्रदेशांमध्ये हा वणवा पसरला. त्याचे लोण दक्षिण भारतातही पोहोचले. सातारा छत्रपतींचे वारसदार शहाजी प्रताप व कारभारी रंगो बापूजी, कोल्हापूरचे चिमासाहेब, नरगुंदकर भावे, अहमदनगर

जिल्ह्यातील संगमनेरजवळील भागोजी नाईक इत्यादी या लढ्यात अग्रभागी होते. नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाण्याच्या राणीसारख्या स्त्रियाही त्यात सामील झाल्या.

१८५७ साली खानदेशात कजारसिंग यांच्या नेतृत्वाखाली झालेले भिल्लांचे लढे व सातपुडा भागात शंकरशाहांच्या नेतृत्वाखालील स्थानिक लढे इंग्रजांनी चिरडून टाकले. खानदेशातील लढ्यात सुमारे ४०० भिल्ल स्त्रिया सहभागी झाल्या होत्या.

**लढ्याचे नेतृत्व :** मुघल साम्राज्य दुबळे झाल्यानंतर नादिरशाह, अब्दालीसारख्या परकीयांनी हिंदुस्थानवर आक्रमण करावयास सुरुवात



तात्या टोपे



नानासाहेब पेशवे

केली. मुघल साम्राज्य त्यांना प्रतिकार करू शकत नाही हे लक्षात आल्यानंतर मराठ्यांनी परकीय आक्रमणापासून हिंदुस्थानच्या रक्षणाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली. त्याच भूमिकेतून मराठे अब्दाली विरुद्ध पानिपतावर लढले. १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात दुबळ्या मुघल साम्राज्याचा वारसदार बहादुरशाहा इंग्रजांविरुद्ध लढण्यास असमर्थ आहे. हे लक्षात आल्यानंतर बहादुरशाहाचे नेतृत्व मान्य करून नानासाहेब पेशवे,

झाशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे यांनी १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्याची सूत्रे आपल्या हातात घेतली. याचाच परिणाम या स्वातंत्र्यलढ्यात हिंदू-मुस्लीम बांधवांचे ऐक्य झाल्याचे दिसून येते.

कुंवरसिंह व मुघल सेनापती बख्तखान या नेत्यांची कामगिरी महत्त्वाची आहे. दिल्ली, कानपूर, लखनौ, झाशी येथील व पश्चिम बिहारच्या भागातील लढ्याचे स्वरूप विशेष उग्र होते. दिल्लीच्या रक्षणाची जबाबदारी बख्तखान याने आपल्या शिरावर घेतली. दिल्ली हस्तगत करण्यासाठी इंग्रजांनी आपली सर्व शक्ती पणाला लावली.



राणी लक्ष्मीबाई



बेगम हजरत महल



कुंवरसिंह



बहादुरशाहा

सप्टेंबर १८५७ मध्ये इंग्रजांनी दिल्लीचा ताबा घेतला. बहादुरशाहा यांना कैद केले व त्यांच्या मुलांची हत्या केली.

पश्चिम बिहारमध्ये जगदीशपूरचे जमीनदार कुंवरसिंह हे लढ्यात उतरले. रोहिलखंडात मौलवी अहमदउल्ला यांनी लोकांना इंग्रजांविरुद्‌ध लढण्यास प्रेरणा दिली.

**बीमोड :** स्वातंत्र्य योद्‌धे व त्यांचे नेते प्राणांची पर्वा न करता इंग्रजांविरुद्‌ध लढले; परंतु अचानक सुरू झालेल्या लढ्याच्या पहिल्या धक्क्यातून इंग्रज लवकरच सावरले. पुढील सहा महिन्यांतच संघर्षाचे स्वरूप पालटले. हातून गेलेली सर्व महत्त्वाची ठिकाणे इंग्रजांनी परत मिळवली. राणी लक्ष्मीबाई, कुंवरसिंह, अहमदउल्ला हे धारातीर्थी पडले. बहादुरशाहांना रंगून येथे बंदिवासात ठेवण्यात आले. नानासाहेब व बेगम हजरत महल यांनी नेपाळमध्ये आश्रय घेतला. तात्या टोपे मात्र सुमारे दहा महिने इंग्रजांविरुद्‌ध लढत राहिले; परंतु फितुरीमुळे ते इंग्रजांच्या हाती पडले. त्यांना इंग्रजांनी फासावर चढवले. अशा रीतीने सन १८५८ च्या अखेरीपर्यंत इंग्रजांनी हा लढा कठोरपणे दडपून टाकला.

**लढ्याचे स्वरूप :** १८५७ च्या या लढ्याची सुरुवात हिंदी सैनिकांमधील असंतोषाच्या उद्रेकाने झाली. पुढे त्यात शेतकरी, कारागीर वगैरे सामान्य लोकही सामील झाले. तसेच काही जमीनदार व राजेरजवाडेही त्यात सहभागी झाले. इंग्रजांच्या जाचक वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी भारतीयांनी केलेला हा सशस्त्र संग्राम होता. या लढ्यात हिंदू व मुसलमान, भिन्न जातीजमाती, अमीर-उमराव व सामान्य लोक यांचा सहभाग होता. इंग्रजांचे भारतातून उच्चाटन करणे हे त्यांचे समान ध्येय होते. त्यामुळे या लढ्याला व्यापक राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले.

**अपयश का आले ? :** १८५७ चा लढा मोठ्या प्रमाणावर

झाला; परंतु इंग्रजी सत्ता नष्ट झाली नाही, कारण लढ्यामध्ये एकसूत्रता नव्हती. एककेंद्री नेतृत्व नव्हते. तसेच लढणाऱ्यांजवळ पुरेशी शस्त्रास्त्रे नव्हती. सुशिक्षित भारतीय व बहुसंख्य संस्थानिक लढ्यापासून अलिप्त राहिले. याउलट इंग्रजांजवळ एककेंद्री नेतृत्व होते. शिस्तबद्ध सैन्य होते. अद्ययावत शस्त्रास्त्रे होती. अनुभवी सेनानी होते. दळणवळणाचे नियंत्रण त्यांच्या हाती होते. त्यामुळे त्यांच्यापुढे भारतीयांचा निभाव लागला नाही.

१८५७ चा लढा अयशस्वी ठरला असला, तरी त्यांच्यातील हुतात्म्यांचे हौतात्म्य वाया गेले नाही. हा लढा भारतीयांना पुढे प्रेरणादायी ठरला. या लढ्यामुळे इंग्रज सत्ता हादरली.

**परिणाम :** १८५७ च्या लढ्याचे फार दूरगामी परिणाम झाले. इंग्रजी सत्तेविरुद्ध भारतीयांमध्ये असलेल्या असंतोषामुळे हा लढा झाला याची जाणीव इंग्लंडच्या राज्यकर्त्यांना झाली. भारतातील इंग्रजी सत्ता कंपनीच्या हाती सुरक्षित नाही, अशी त्यांची पक्की धारणा झाली, म्हणून त्यांनी १८५८ साली एक कायदा करून ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील सत्ता संपुष्टात आणली. भारताचा कारभार ब्रिटिश पार्लमेंटने आपल्या हाती घेतला.

**राणीचा जाहीरनामा :** इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिने भारतीयांना उद्देशून नोव्हेंबर १८५८ मध्ये एक जाहीरनामा काढला. सर्व भारतीय आपले प्रजाजन आहेत. वंश, धर्म, जात किंवा जन्मस्थान यांवरून प्रजाजनांत भेदभाव केला जाणार नाही, शासकीय नोकऱ्या देताना गुणवत्ता हाच निकष राहील असे राणीने जाहीर केले. भारतीयांच्या धार्मिक बाबतींत सरकार हस्तक्षेप करणार नाही असेही आश्वासन दिले. भारतीय संस्थानिकांशी इंग्रजांनी केलेले करार पाळले जातील, कोणतेही संस्थान यापुढे खालसा केले जाणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही राणीच्या जाहीरनाम्याने दिली.

**लष्कराची पुनर्रचना :** भारतातील इंग्रज लष्कराची पुनर्रचना करण्यात आली. युरोपीय सैनिक आणि अधिकारी यांच्या संख्येत वाढ करण्यात आली. भारतीय सैनिकांच्या पलटणी जातीनिहाय करण्यात आल्या. तोफखाना हा पूर्णपणे इंग्रज अधिकाऱ्यांच्या ताब्यात ठेवण्यात आला. हे सर्व करण्यामागे भारतीय सैनिक एकत्र येऊ नयेत व त्यांनी पुन्हा असा लढा उभारू नये, हा इंग्रजांचा हेतू होता.

**धोरणात्मक बदल :** १८५७ नंतर ब्रिटिशांनी आपल्या अंतर्गत धोरणातही बदल केले. भारताच्या सामाजिक बाबतींत ढवळाढवळ करायची नाही, असे धोरण त्यांनी स्वीकारले. त्याचबरोबर भारतीयांची सामाजिक एकजूट होऊ नये म्हणून ब्रिटिश शासन प्रयत्नशील राहिले. 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा वापर करून भारतातील साम्राज्य जास्तीत जास्त दृढ करण्यावर त्यांनी भर दिला.

भारतीयांवरही या लढ्याचा खोलवर परिणाम झाला. प्रादेशिक निष्ठांच्या जागी राष्ट्रीय भावनेचा उदय होऊ लागला. ब्रिटिशांशी लढा देण्यासाठी वापरलेले मार्ग निरुपयोगी ठरल्यामुळे नवे मार्ग शोधण्याची गरज भारतीयांना जाणवू लागली. १८५७ चा स्वातंत्र्यलढा हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचे प्रेरणास्रोत ठरला.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) मंगल पांडे यांनी .......... येथील छावणीतील इंग्रज अधिकाऱ्यावर गोळी झाडली.
(बराकपूर, कानपूर, मेरठ)

(आ) सन १८४८ ते १८५६ या दरम्यान .......... याने अनेक राज्ये खालसा केली.
(लॉर्ड डलहौसी, लॉर्ड कॉर्नवालिस, लॉर्ड बेंटिंक)

(इ) भारताचा सम्राट म्हणून .......... यांच्या नावाने द्वाही फिरवण्यात आली.
(बहादुरशाहा जफर, अहमदउल्ला, बख्तखान)

२. ‘अ’ गट व ‘ब’ गट यांच्या योग्य जोड्या लावा.

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| (अ) राणी लक्ष्मीबाई | (१) कानपूर |
| (आ) नानासाहेब पेशवे | (२) मेरठ |
| (इ) कुंवरसिंह | (३) झाशी |
| (ई) मौलवी अहमदउल्ला | (४) जगदीशपूर |
| | (५) रोहिलखंड |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) उमाजी नाईक यांनी लोकांना कोणते आवाहन केले?

(आ) हिंदी सैनिकांमध्ये कोणत्या बातमीमुळे असंतोष निर्माण झाला?

(इ) लॉर्ड डलहौसी याने अयोध्येच्या नवाबास पदच्युत का केले?

४. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) १८५७ च्या लढ्याचे कोणते परिणाम झाले?

(आ) १८५७ च्या लढ्यानंतर इंग्रजांनी भारतातील लष्कराची पुनर्रचना का केली?

उपक्रम :


(अ) १८५७ च्या लढ्यातील नेत्यांची चित्रे मिळवून ती वहीत चिकटवा व त्याखाली त्यांची थोडक्यात माहिती लिहा.

(आ) भारताच्या नकाशात १८५७ च्या लढ्याची महत्त्वाची ठिकाणे दाखवा.

❑❑❑



झाशीच्या राणीची मुद्रा



Proclamation by the Queen in Council,
TO THE PRINCES, CHIEFS, AND PEOPLE OF INDIA.

Victoria,

BY THE GRACE OF GOD, OF THE UNITED KINGDOM OF GREAT BRITAIN AND IRELAND, AND OF THE COLONIES AND DEPENDENCIES THEREOF IN EUROPE, ASIA, AFRICA, AMERICA, AND AUSTRALASIA,

Queen, Defender of the Faith.

Whereas, for divers weighty reasons, We have resolved, by and with the advice and consent of the Lords Spiritual and Temporal, and Commons, in Parliament assembled, to take upon Ourselves the Government of the Territories in India heretofore administered in trust for Us by the Honorable East India Company:

Now, therefore, We do by these Presents notify and declare that, by the advice and consent aforesaid, We have taken upon Ourselves the said Government; and We hereby call upon all Our Subjects within the said Territories to be faithful, and to bear true Allegiance to Us, Our Heirs and Successors, and to submit themselves to the authority of those whom We may hereafter, from time to time, see fit to appoint to administer the Government of Our said Territories, in Our name and on Our behalf:

व्हिक्टोरिया राणीचा जाहीरनामा

# ६. भारतीय प्रबोधन

एकोणिसाव्या शतकात भारतामध्ये प्रबोधनयुगास सुरुवात झाली. भारताला मध्ययुगाकडून आधुनिकतेकडे नेणारी प्रबोधन ही एक व्यापक चळवळ होती. सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये प्रबोधनाचा आविष्कार झाला. त्याचा अभ्यास आपण या पाठामध्ये करणार आहोत.

**भारतीय प्रबोधन :** भारतीय समाजातील कर्मकांडाचे स्तोम, अंधश्रद्धा, रूढिप्रियता, जातिभेद, उच्चनीचता, चौकस व चिकित्सक वृत्तीचा अभाव इत्यादी गोष्टींमुळे समाजाची प्रगती कुंठित झाली आहे, याची जाणीव सुशिक्षित भारतीयांना होऊ लागली. समाज मागासलेला असल्यामुळे देशाचे स्वातंत्र्य नष्ट झाले, हे त्यांच्या लक्षात आले. देशाची उन्नती साधण्यासाठी भारतीय समाजातील दोष व अनिष्ट प्रवृत्ती कशा दूर करता येतील याचा विचार ते करू लागले. समाजाच्या व देशाच्या उन्नतीचा मार्ग ते शोधू लागले. भारत आधुनिक कसा होईल यासंबंधी विचार मांडले जाऊ लागले. तत्कालीन भारतात सुरू झालेल्या या वैचारिक जागृतीला 'भारतीय प्रबोधन' असे म्हणतात. असे वैचारिक परिवर्तन पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या मध्यम वर्गात प्रथम सुरू झाले. पाश्चात्त्य ज्ञानातून मिळणारे नवे विचार, नवी मूल्ये या वर्गाने आत्मसात केली.

**स्त्रीविषयक सुधारणा :** एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी स्त्रियांची स्थिती दयनीय होती. त्यांना समानतेची वागणूक दिली जात नव्हती. त्यांना शिक्षण नाकारण्यात आलेले होते. स्त्रियांना आर्थिक व सामाजिक अधिकार नव्हते. बालिकाहत्या, बालविवाह, जरठ-कुमारी विवाह, हुंडापद्धती, सती, केशवपन, विधवाविवाहबंदी अशा दुष्ट प्रथांच्या त्या

बळी ठरल्या होत्या. स्त्रीविषयक सुधारणा चळवळीने या प्रश्नांना हात घातला. सतीच्या निर्घृण चालीविरुद्ध राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या आंदोलनामुळे सतीबंदीचा कायदा झाला.


राजा राममोहन रॉय

गोपाळ हरि देशमुख (लोकहितवादी) यांनी हिंदू समाजव्यवस्थेतील स्त्रीविषयक अनिष्ट रूढींवर कडाडून टीका केली. 'ईश्वराने स्त्री व पुरुष सारखेच निर्माण केले आहेत, म्हणून त्यांचे अधिकारही समान आहेत,' अशा शब्दांत त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला.



महात्मा फुले

महात्मा जोतीराव फुले यांनी १८४८ साली पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. समाजाचा रोष पत्करूनसुद्धा त्यांच्या पत्नी सावित्रीबाई या शाळेत शिकवत असत. जगन्नाथ शंकरशेट, ईश्वरचंद्र विद्यासागर, पंडिता रमाबाई इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षणाच्या कामी मोठे योगदान दिले.

महात्मा फुले यांनी स्वतःच्या घरात एक बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. केशवपनाची चाल बंद व्हावी, म्हणून त्यांनी मुंबईत नाभिकांचा एक संप घडवून आणला. स्त्रियांच्या संदर्भातील विविध समस्या सोडवण्यापुरते महात्मा फुले यांचे प्रयत्न मर्यादित नव्हते. स्त्रियांना दुय्यम लेखणारी पुरुषी मनोवृत्ती बदलण्याचा त्यांचा प्रयत्न


सावित्रीबाई फुले

होता. त्यांच्या प्रयत्नांचेच एक फळ म्हणजे ताराबाई शिंदे यांचा 'स्त्री-पुरुषतुलना' (१८८२) हा ग्रंथ होय. बुलढाणा परिसरातील एका मराठमोळ्या कुटुंबातील या स्त्रीने अत्यंत जहाल भाषेत स्त्रियांच्या हक्कांचा पुरस्कार केला.


**वीरेशलिंगम पंतलु**

विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता मिळवून देण्यासाठी ईश्वरचंद्र विद्यासागर, विष्णुशास्त्री पंडित व वीरेशलिंगम पंतलु यांनी विशेष प्रयत्न केले. चूल आणि मूल या क्षेत्रापुरते स्त्रीला मर्यादित ठेवण्याच्या वृत्तीस गोपाळ गणेश आगरकर यांनी कडाडून विरोध केला. मुलामुलींना एकसारखेच शिक्षण दिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. सार्वजनिक क्षेत्रात स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने वावरू शकली पाहिजे, हा विचार त्यांनी ठासून सांगितला.

महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी विधवांच्या शिक्षणासाठी अनाथ बालिकाश्रम स्थापन केला. त्यांच्या प्रयत्नांतूनच विसाव्या शतकात पहिले महिला विद्यापीठ उभे राहिले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी बहुजन समाजातील स्त्रियांसाठी सुधारणेची चळवळ उभारली. त्यांनी मुंबई येथे देवदासी प्रथेविरुद्ध परिषद भरवली. पेरियार रामस्वामी नायकर यांनी दक्षिण भारतातील देवदासी प्रथेला कडाडून विरोध केला, तसेच स्त्रीला दुय्यम लेखणाऱ्या खर्चीक विवाहपद्धतीचा त्यांनी धिक्कार केला.


**महर्षी धोंडो केशव कर्वे**

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला


डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या लेखनातून वाचा फोडली. त्यांच्या चळवळीत अनेक स्त्रिया सहभागी होऊ लागल्या. या चळवळीमुळे स्त्रीसुधारणा समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचू लागली.

स्त्रीसुधारणा चळवळीमुळे अनेक अन्यायकारक प्रथा बंद झाल्या. स्त्रियांना समानतेने वागवले पाहिजे, ही दृष्टी वाढू लागली. जीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये स्त्रियांचे कर्तृत्व फुलून येऊ लागले.

**जातिभेद निर्मूलनाची चळवळ :** भारतीय समाजात जातिव्यवस्था प्रचलित होती. विषमता, शोषण, अन्याय यांवर जातिव्यवस्था आधारलेली होती. भारताची प्रगती साधायची असेल, तर जातिभेदाचा अडसर दूर व्हायला हवा हे समाजसुधारकांनी ओळखले. लोकहितवादी, महात्मा फुले, गोपाळ गणेश आगरकर, स्वामी दयानंद सरस्वती, नारायण गुरू, वीरेशलिंगम पंतलु यांसारख्या सुधारकांनी जातिव्यवस्थेतील दोषांवर कडाडून हल्ला केला. महात्मा फुले यांनी दलितांसाठी शाळा काढल्या. आपल्या लेखनाद्वारे त्यांनी दलितांमध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. शिक्षणाच्या संधी फक्त उच्चवर्णीय पुरुषांपुरत्या मर्यादित न



गोपाळ गणेश आगरकर



नारायण गुरू

ठेवता, दलित वर्ग व स्त्रिया यांना शिक्षणाच्या सर्व संधी मिळाल्या पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. आपल्या चळवळीद्‌वारे त्यांनी सामाजिक समता व न्याय ही मूल्ये समाजात रुजवण्याचा प्रयत्न केला.

नारायण गुरू यांनी सामाजिक विषमता दूर करण्यासाठी केरळमध्ये सुधारणा चळवळ उभारली. त्यांनी आंतरजातीय विवाहाच्या मार्गाने जातिभेद नष्ट करण्याला महत्त्व दिले.

दलित चळवळीचा विचार पुढे आपण स्वतंत्रपणे करणार आहोत.

**धर्मसुधारणा चळवळ :** भारतात काही सुधारणावादी संस्था स्थापन झाल्या. त्यांनी समाजसुधारणा व धर्मसुधारणा यांना चालना दिली.

राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये 'ब्राह्मो समाजा'ची स्थापना केली. ब्राम्हो समाजाचे अनुयायी 'ईश्वर एकच आहे', असे मानत असत. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी 'परमहंस सभा' स्थापन केली. जातिसंस्थेला विरोध हे या संस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. आत्माराम पांडुरंग तर्खडकर यांनी मुंबईत 'प्रार्थना समाजा'ची स्थापना केली. न्यायमूर्ती म. गो. रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर आणि न्यायमूर्ती कृ. त्र्यं. तेलंग हे प्रार्थना समाजाचे नेते होते. प्रार्थना समाजाने वारकरी संप्रदायाची शिकवण आधारभूत मानली. कर्मकांडांऐवजी भजन व प्रार्थना हा ईश्वरपूजेचा मार्ग



न्यायमूर्ती रानडे




**स्वामी विवेकानंद**

सांगितला. स्वामी दयानंद सरस्वतींनी मुंबईत 'आर्य समाज' स्थापन केला. स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. त्यांनी मानवाची सेवा हाच खरा धर्म आहे, ही शिकवण दिली. या संस्थांनी समाजातील अंधश्रद्धा, जातिव्यवस्था इत्यादी दोषांवर टीका केली. धर्मग्रंथांवर अंधविश्वास ठेवण्याऐवजी सदसद्विवेकबुद्धीवर विश्वास ठेवण्याची शिकवण या संस्थांनी दिली. 'रामकृष्ण मिशन', 'आर्य समाज' आणि 'थिऑसॉफिकल सोसायटी' या संस्थांनी जगाला भारतीय संस्कृतीची थोरवी सांगितली.

शिखांमधील धर्मसुधारणेसाठी अमृतसर येथे 'सिंगसभा' स्थापन झाली. शीख समाजात या संस्थेने शिक्षणप्रसार व आधुनिकीकरण घडवून आणण्याचे काम केले. पुढे 'अकाली चळवळी'ने शीख समाजातील सुधारणावादाची परंपरा चालू ठेवली.

अब्दुल लतीफ यांनी मुस्लिम समाजातील समाजसुधारणेला प्रारंभ केला. त्यांनी बंगालमध्ये 'द मोहमेडन लिटररी सोसायटी' या संस्थेची स्थापना केली. सर सय्यद अहमद खान यांनी 'मोहमेडन अँग्लो-ओरिएंटल कॉलेज' स्थापन केले. पुढे याचेच अलिगढ मुस्लिम विद्यापीठात रूपांतर झाले. मुस्लिम समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी यांना त्यांनी



**सर सय्यद अहमद खान**

विरोध केला. पाश्चात्त्य शिक्षण आणि विज्ञान यांचा अंगीकार मुस्लिम समाजाने केल्याशिवाय त्याची प्रगती होणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते.

**प्रबोधनाचे इतर क्षेत्रांमधील आविष्कार :** सुधारणेच्या चळवळींप्रमाणेच प्रबोधनकाळात साहित्य, कला, विज्ञान यांसारख्या क्षेत्रांमध्ये घडून आलेली प्रगती महत्त्वाची होती. साहित्याच्या क्षेत्रात गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांना, तर विज्ञानाच्या क्षेत्रात सी. व्ही. रामन यांना नोबेल पारितोषिक मिळाले. त्यावरून भारताच्या प्रगतीची कल्पना येते. अशा प्रगतीमुळे आधुनिक भारताची जडणघडण झाली.

या काळात साहित्य व कलेच्या क्षेत्रात खूप बदल घडून आले. कादंबरीसारखा नवा साहित्यप्रकार उदयास आला. सामान्य स्त्री-पुरुषांच्या जीवनाचे चित्रण साहित्यातून घडू लागले. विचारांना चालना देणारे निबंध लिहिले जाऊ लागले. निसर्गसौंदर्य, राष्ट्रप्रेम, मानवी भावना यांचा आविष्कार प्रादेशिक भाषांमधून होऊ लागला. कथा-कादंबऱ्यांमधून स्वातंत्र्याची प्रेरणा मिळू लागली. समाजसुधारणेचा विचारही व्यक्त होऊ लागला.

या काळात स्त्रिया लेखन करू लागल्या. या लेखनातून स्त्री-मन प्रभावीपणे व्यक्त होऊ लागले. नवी वृत्तपत्रे व मासिके ही समाजसुधारणा व राजकीय जागृतीची वाहक ठरली.

साहित्याच्या क्षेत्राप्रमाणे कलेच्या क्षेत्रातही या काळात प्रगती झाली. संगीत अधिक लोकाभिमुख होऊ लागले. राष्ट्रीय चळवळीतसुद्धा संगीतकलेचा वापर केला गेला. मराठीत संगीत नाटके सादर केली जाऊ लागली.

भारतीय शैली आणि पाश्चात्त्य तंत्रे यांचा मेळ घालून नवी चित्रकला पुढे आली. अजिंठा शैली, मुघल व पहाडी लघुचित्रशैली यांचे

या काळात पुनरुज्जीवन झाले. स्थापत्यावर पाश्चात्त्य शैलीचा प्रभाव पडून नव्या संमिश्र शैलीचा उदय झाला.

विज्ञानाविषयी अनेक ग्रंथ लिहिले जाऊ लागले. प्रयोगशीलता व वैज्ञानिक दृष्टीचे भारताच्या प्रगतीसाठी असणारे महत्त्व लोकांना उमगू लागले.

आधुनिक भारताच्या इतिहासात प्रबोधनाचा हा आविष्कारही महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्य, समता, राष्ट्रवाद या कल्पनांनी भारलेल्या सुधारकांनी राजकीय क्षेत्रात राष्ट्रव्यापी चळवळ उभी केली. तिचा अभ्यास आपण पुढील पाठात करणार आहोत.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) 'स्त्रीपुरुषतुलना' हा ग्रंथ ....... यांनी लिहिला.
(सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे)

(आ) विधवांच्या शिक्षणासाठी ....... यांनी अनाथ बालिकाश्रम स्थापन केला.
(पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे, पेरियार रामस्वामी)

(इ) मोहमेडन अँग्लो-ओरिएंटल कॉलेज ....... यांनी स्थापन केले.
(सर सय्यद अहमद खान, बद्रुद्दीन तय्यबजी, अब्दुल लतीफ)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) महात्मा फुले | (१) परमहंस सभा |
| (आ) राजा राममोहन रॉय | (२) सत्यशोधक समाज |
| (इ) दादोबा पांडुरंग तर्खडकर | (३) ब्राम्हो समाज |
| (ई) स्वामी विवेकानंद | (४) प्रार्थना समाज |
| | (५) रामकृष्ण मिशन |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) महात्मा फुले यांनी मुंबईत नाभिकांचा संप का घडवून आणला ?

(आ) नारायण गुरू यांनी जातिभेद नष्ट करण्यासाठी कोणता मार्ग सांगितला ?

(इ) प्रार्थना समाजाने ईश्वरपूजेचा कोणता मार्ग सांगितला ?

(ई) स्वामी विवेकानंदांनी कोणती शिकवण दिली ?


## उपक्रम

(अ) समाजसुधारकांची जन्मतिथी व पुण्यतिथी त्या त्या दिवशी शिक्षकांच्या मदतीने आयोजित करा. त्यांनी केलेल्या कार्याची वर्गात चर्चा करा.

(आ) खालील तक्ता पूर्ण करा.

| समाजसुधारकाचे नाव | | कार्य |
|---|---|---|
| (अ) | महात्मा फुले | ............... |
| (आ) | पेरियार रामस्वामी नायकर | ............... |
| (इ) | ईश्वरचंद्र विद्यासागर | ............... |
| (ई) | स्वामी विवेकानंद | ............... |

❑❑❑




**स्वातंत्र्य, समता, बंधुतेचा लढा...**

# ७. स्वातंत्र्य चळवळीची पायाभरणी

एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनामुळे भारतात राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेचे बीजारोपण झाले. या प्रक्रियेस नवी शिक्षणपद्धती व वृत्तपत्रांची वाढ यांच्यामुळे चालना मिळाली. ऐक्याची भावना, देशप्रेम, सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरांचा अभिमान, अन्यायाची चीड यांतून भारतात राष्ट्रवादाची जाणीव विकसित होऊ लागली. राष्ट्रीय सभेची स्थापना हा राष्ट्रवादाचाच एक आविष्कार होता. राष्ट्रवाद हे केवळ राजकीय तत्त्वज्ञान नव्हते. ब्रिटिश करत असलेल्या आर्थिक शोषणाविरुद्धची जागृती हासुद्धा राष्ट्रवादाचा आविष्कार होता.

**ब्रिटिश राजवटीतील प्रशासकीय केंद्रीकरण :** ब्रिटिशांनी भारतात एकछत्री शासन प्रस्थापित केले. देशात सर्वत्र समान धोरणे लागू केली. सर्वांना कायद्यासमोर समान दर्जा असावा, असे तत्त्व घालून दिले. ब्रिटिश सत्ताधीशांनी रेल्वे, रस्ते यांसारख्या दळणवळणाच्या सोई भारतात आणल्या. त्यांचाही भारतीयांना फायदा झाला. या पार्श्वभूमीवर प्रांतोप्रांतीच्या भारतीयांचा परस्परांशी अधिक संबंध येऊन राष्ट्रीयत्वाची भावना विकसित झाली.

**भारताचे आर्थिक शोषण :** इंग्लंडच्या साम्राज्यवादी धोरणामुळे भारताचे आर्थिक शोषण होऊ लागले. अनेक मार्गांनी भारताची संपत्ती इंग्लंडकडे जात होती. मध्यम वर्गाला नवनव्या करांचा भार सोसावा लागत होता. शेतकरीवर्ग शेतसाऱ्याच्या ओझ्याखाली दबलेला होता. दुष्काळांमुळे त्याच्या दुर्दशेत भर पडत होती. भांडवलदारांकडून कामगार वर्गाचे शोषण होत होते. यामुळे सर्वांच्याच मनात असंतोष खदखदत होता.

काही भारतीयांनी आर्थिक शोषणाविरुद्ध ग्रंथरूपाने आपले विचार मांडले. उदाहरणार्थ, दादाभाई नौरोजी यांनी ब्रिटिशांच्या धोरणांमुळे भारतीयांचे आर्थिक शोषण होत असल्याचे व भारतीय संपत्ती इंग्लंडमध्ये नेली जात असल्याचे दाखवून दिले.

**पाश्चात्त्य शिक्षणाचा प्रभाव :** इंग्रजांनी भारतात पाश्चात्त्य शिक्षण सुरू केले. या शिक्षणातून भारतीय तरुणांनी बुद्धिनिष्ठा, मानवता, समता, स्वातंत्र्य, विज्ञाननिष्ठा, लोकशाही, राष्ट्रवाद इत्यादी मूल्ये आत्मसात केली. या मूल्यांच्या आधारे आपल्या देशाची उन्नती करावी, अशी भावना सुशिक्षितांच्या मनात रुजू लागली. अशा रीतीने पाश्चात्त्य शिक्षणातून भारतीयांच्या राष्ट्रीय भावनेला आधुनिक स्वरूप प्राप्त झाले.


**प्राच्यविद्येचा अभ्यास :** अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात काही पाश्चात्त्य विद्वानांनी प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृती यांसंबंधी संशोधन सुरू केले होते. कोलकता येथील एशियाटिक सोसायटीने संस्कृत, फारसी आणि अन्य भारतीय भाषांमधील शेकडो हस्तलिखिते संपादित करून प्रसिद्ध केली. डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. रा. गो. भांडारकर अशा काही भारतीय तज्ज्ञांनीसुद्धा भारतीय इतिहास व संस्कृतीच्या अभ्यासाला चालना देणारे संशोधन केले. त्यामुळे पौर्वात्य संस्कृतीच्या अभ्यासात म्हणजेच प्राच्यविद्येत मोलाची भर पडली. आपल्याला प्राचीन समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे, हे समजल्याने भारतीयांची अस्मिता जागृत झाली.

**वृत्तपत्रे, नियतकालिके व साहित्य :** एकोणिसाव्या शतकात भारतात मुद्रण व्यवसाय झपाट्याने वाढला. प्रादेशिक भाषांतून तसेच इंग्रजी भाषेतून वृत्तपत्रे व नियतकालिके प्रकाशित होऊ लागली. त्यांतून

देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीसंबंधी लेख प्रसिद्ध होऊ लागले. दर्पण, प्रभाकर, हिंदू पेट्रिअट, अमृत बझार पत्रिका, केसरी, मराठा इत्यादी वृत्तपत्रांनी राजकीय जागृतीचे बहुमोल कार्य केले. या नियतकालिकांमधून सरकारच्या धोरणावर टीका होऊ लागली व देशाच्या प्रगतीसाठी उपाय सुचवले जाऊ लागले. तसेच बंगालमध्ये बंकिमचंद्र चटर्जी, महाराष्ट्रात विष्णुशास्त्री चिपळूणकर इत्यादींनी आपल्या लिखाणाने राजकीय जागृती केली.

पाश्चात्त्य शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गाने लोकशाहीचे तत्त्वज्ञान आत्मसात केले. राज्यकारभारात प्रजेला सहभाग मिळाला पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. ब्रिटिश शासकांची वंशश्रेष्ठत्वाची भावना, प्रशासनात भारतीयांना दिले जाणारे दुय्यम स्थान यांसारख्या गोष्टींची त्यांना चीड आली. आपली गाऱ्हाणी आणि असंतोष सरकारपुढे मांडण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज आहे, हे त्यांनी ओळखले. या जाणिवेतूनच प्रांतिक संघटनांचा उदय झाला.

**राष्ट्रीय सभेच्या स्थापनेची पार्श्वभूमी :** ब्रिटिशांच्या अन्यायी धोरणाविरुद्ध आपण राजकीयदृष्ट्या संघटित व्हावे अशी सुशिक्षित भारतीयांची भावना झाली. सनदशीर मार्गाने न्याय मिळवावा, जनजागृती करावी, जनतेच्या मागण्या सरकारपर्यंत पोचवाव्या ही त्यांची उद्दिष्टे होती. त्यासाठी देशाच्या वेगवेगळ्या भागांत प्रादेशिक संघटना स्थापन झाल्या. बंगाल प्रांतातील 'इंडियन असोसिएशन' ही संस्था अखिल भारतीय चळवळीचे केंद्र बनावी, अशी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांची इच्छा होती. त्यांनी १८८३ मध्ये कोलकत्याला अखिल



सुरेंद्रनाथ बॅनर्जी

भारतीय स्तरावर राष्ट्रीय परिषद भरवली. देशाच्या निरनिराळ्या भागांतून सुमारे शंभर प्रतिनिधी या अधिवेशनाला उपस्थित होते. एक देशव्यापी संघटना स्थापण्याच्या दिशेने भारतीयांनी टाकलेले हे पहिले पाऊल होते.



व्योमेशचंद्र बॅनर्जी

**राष्ट्रीय सभेची स्थापना :** २८ डिसेंबर १८८५ रोजी मुंबईतील गोकुळदास तेजपाल संस्कृत पाठशाळेत राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन भरवण्यात आले. व्योमेशचंद्र बॅनर्जी हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. देशाच्या निरनिराळ्या भागांतून ७२ प्रतिनिधी अधिवेशनासाठी आले होते.



राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन

या सर्वांनी मिळून याच अधिवेशनात 'भारतीय राष्ट्रीय सभेची' (इंडियन नॅशनल काँग्रेस) स्थापना केली. ॲलन ऑक्टेव्हिअन ह्यूम या ब्रिटिश अधिकाऱ्यानेही राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत पुढाकार घेतला.

या अधिवेशनात विविध स्वरूपाच्या राष्ट्रीय समस्यांवर चर्चा झाली. भारतीयांना देशाच्या प्रशासनात स्थान दिले जावे, लष्करी खर्चात कपात करावी इत्यादी मागण्या करण्यात आल्या. या मागण्यांची निवेदने ब्रिटिश सरकारकडे पाठवण्यात आली. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेमुळे भारताच्या स्वातंत्र्य चळवळीची पायाभरणी झाली.

**राष्ट्रीय सभेची उद्‌दिष्टे :** भारताच्या निरनिराळ्या भागांतील लोकांना एकत्र आणणे, धर्म, वंश, जात इत्यादी भेद बाजूला सारून लोकांमध्ये ऐक्याची भावना निर्माण करणे, परस्परांच्या समस्या व मते जाणून घेण्याची त्यांना संधी देणे, राष्ट्राच्या उन्नतीसाठी आवश्यक त्या उपायांची चर्चा करणे ही राष्ट्रीय सभेची उद्‌दिष्टे होती.

**राष्ट्रीय सभेची वाटचाल :** राष्ट्रीय सभेचे नेते आधुनिक विचारांनी व देशप्रेमाने प्रेरित झालेले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांवर त्यांची निष्ठा होती. त्यांचा सनदशीर मार्गावर विश्वास होता. सनदशीर मार्गाने कार्य केल्यास इंग्रज आपल्या मागण्यांना योग्य तो प्रतिसाद देतील अशी त्यांना आशा वाटत होती.

राष्ट्रीय सभेची अधिवेशने दरवर्षी भरवली जात असत. त्यामुळे लोकांना आपल्या समस्यांची जाणीव होत असे. त्यांची सोडवणूक करण्यासाठी आपण संघटित झाले पाहिजे असे त्यांना वाटे. सरकारची दडपशाही, आर्थिक शोषण, भ्रष्टाचार इत्यादींसंबंधी आवाज उठवून राष्ट्रीय सभेने लोकजागृती घडवून आणली. राष्ट्रीय सभेने भारतीय जनतेला राजकीय हक्क मिळावे, यासाठी आग्रह धरला. दादाभाई नौरोजी यांनी भारताच्या समस्या इंग्लंडमधील जनतेपुढे मांडल्या.

राष्ट्रीय सभेला मिळणारा लोकांचा प्रतिसाद वाढत गेला. इ. स. १८९० मध्ये सरकारने एक आदेश काढून सरकारी नोकरांना राष्ट्रीय

सभेच्या अधिवेशनास हजर राहण्यास बंदी केली, तेव्हा राष्ट्रीय सभेने सरकारच्या अन्यायी धोरणाविरुद्ध लोकमत जागृत केले. त्यामुळे ब्रिटिश सरकारला हा आदेश रद्द करावा लागला, मात्र लवकरच ब्रिटिश सरकारचे धोरण अधिक आक्रमक बनले.

सरकारने भारतीय जनतेत फूट पाडण्यासाठी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला. त्यामुळे भारतीयांचा असंतोषही वाढला आणि स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र होत गेली.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी १८८३ मध्ये ....... अखिल भारतीय स्तरावर राष्ट्रीय परिषद भरवली.
(कोलकत्याला, मुंबईला, दिल्लीला)

(आ) राष्ट्रीय सभेचे पहिले अधिवेशन ....... येथे भरले.
(मुंबई, कोलकता, चेन्नई)

(इ) राष्ट्रीय सभेचे पहिले अध्यक्ष ....... हे होते.
(सुरेंद्रनाथ बॅनर्जी, व्योमेशचंद्र बॅनर्जी, फिरोजशहा मेहता)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) भारतीयांची अस्मिता जागृत का झाली ?

(आ) राष्ट्रीय सभेच्या नेत्यांची कोणत्या तत्त्वांवर निष्ठा होती ?

**३. कारणे लिहा.**

(अ) राष्ट्रीय सभेच्या नेत्यांचा सनदशीर मार्गावर विश्वास होता.

(आ) ब्रिटिश सरकारला १८९० चा आदेश रद्द करावा लागला.

(इ) ब्रिटिश सरकारने 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला.

**४. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना विकसित का झाली ?

(आ) प्रांतिक संघटनांचा उदय कोणत्या जाणिवेतून झाला ?

(इ) राष्ट्रीय सभेच्या पहिल्या अधिवेशनात कोणत्या मागण्या करण्यात आल्या ?

(ई) राष्ट्रीय सभेची उद्दिष्टे कोणती होती ?

## उपक्रम

शिक्षकांच्या मदतीने राष्ट्रीय सभेच्या १ ते ५ अधिवेशनांची खालील मुद्द्यांनुसार माहिती मिळवा व त्याचा तक्ता करा.

| अ.क्र. | ठिकाण | अध्यक्षांचे नाव | ठराव |
|---|---|---|---|
| (१) | | | |
| (२) | | | |
| (३) | | | |
| (४) | | | |
| (५) | | | |




काही वृत्तपत्रे-प्रभाकर, हिंदू पेट्रिअट, अमृत बझार पत्रिका

# ८. स्वराज्याचा लढा

राष्ट्रीय सभेच्या प्रारंभीच्या काळातील सनदशीर चळवळीला ब्रिटिशांकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सनदशीर चळवळीच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. ब्रिटिशांविरुद्धचा संघर्ष अधिक तीव्र केला पाहिजे, अशी भूमिका महाराष्ट्रामध्ये लोकमान्य टिळक, बंगालमध्ये बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष; पंजाबमध्ये लाला लजपतराय अशा जहाल नेत्यांनी मांडली. १९०५ ते १९२० हा कालखंड भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील जहाल मतवादी कालखंड म्हणून ओळखला जातो.

**जहाल मतवादाची वाटचाल :** सुरुवातीच्या काळात जहाल नेत्यांनी भारतीयांमध्ये राजकीय जागृती घडवून आणण्यासाठी वृत्तपत्रे, राष्ट्रीय उत्सव व राष्ट्रीय शिक्षण या माध्यमांचा वापर केला. 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रांच्या जोडीला लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती हे उत्सव आयोजित केले. आपापसातील सर्व भेद विसरून लोकांनी एकत्र यावे, त्यांच्यात राष्ट्रीय जागृती व्हावी हा राष्ट्रीय उत्सवांचा हेतू होता. तत्कालीन गणेशोत्सवातील कार्यक्रमांमधून लोकांमध्ये राजकीय जागृती घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात.


**लोकमान्य टिळक**

लोकांना कृतिशील बनवण्यावर लोकमान्य टिळकांचा भर होता. हा कर्मयोग सांगण्यासाठीच मंडालेच्या कारावासात त्यांनी 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहिला. समाजात राष्ट्रीय वृत्तीची बीजे रुजवावीत यासाठी जहाल

नेत्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. स्वदेशाभिमान जागृत करणे, हा राष्ट्रीय शिक्षणामागील हेतू होता. जहाल मतवादी कालखंडात ही चळवळ अधिक व्यापक झाली. कामगारवर्गातही राजकीय विचार रुजवण्यामध्ये जहाल नेत्यांना यश आले.

**बंगालची फाळणी :** बंगाल हा एक मोठा प्रांत होता. या प्रांताचा कारभार करणे प्रशासकीयदृष्ट्या अवघड होते. त्यामुळे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन याने १९०५ मध्ये बंगाल प्रांताची फाळणी जाहीर केली. त्यानुसार मुस्लिम बहुसंख्याकांचा पूर्व बंगाल आणि हिंदू बहुसंख्याकांचा पश्चिम बंगाल असे विभाजन करण्याचे त्याने ठरवले. बंगाल प्रांताची फाळणी करण्यामागे प्रशासकीय सोय हे कारण दिले होते; परंतु हिंदू व मुस्लिम यांच्यात फूट पाडून स्वातंत्र्य चळवळ दुर्बळ करणे, हा कर्झनचा मुख्य हेतू होता.

**वंगभंग चळवळ :** बंगालमध्ये वंगभंगाबद्‌दल जनमत उफाळून आले. १६ ऑक्टोबर हा फाळणीचा दिवस 'राष्ट्रीय शोकदिन' म्हणून पाळण्यात आला. निषेध सभांद्‌वारे सरकारचा धिक्कार करण्यात आला. 'वंदे मातरम्' हे गीत सर्वत्र गायले जाऊ लागले. ऐक्याचे प्रतीक म्हणून राखीबंधनाचा कार्यक्रम घेण्यात आला. परदेशी मालावर बहिष्कार घालण्यात आला. सरकारी शाळा-महाविद्यालयांवर बहिष्कार टाकून विद्यार्थी मोठ्या संख्येने या चळवळीत सहभागी झाले. राष्ट्रीय भावना जागृत करणाऱ्या शिक्षणसंस्था स्थापन करण्यात आल्या. या वंगभंग चळवळीचे नेतृत्व सुरेंद्रनाथ बॅनर्जी, आनंदमोहन बोस, रवींद्रनाथ टागोर इत्यादींनी केले. वंगभंगविरोधी चळवळीने भारतीय राष्ट्रीय चळवळीची व्याप्ती वाढली. वंगभंगविरोधी चळवळ राष्ट्रव्यापी चळवळ बनली. तिची तीव्रता पाहून पुढे १९११ साली ब्रिटिशांनी बंगालची फाळणी रद्‌द केली.

**भारत सेवक समाज :** १९०५ साली नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी 'भारत सेवक समाजा'ची स्थापना केली. लोकांमध्ये



गोपाळ कृष्ण गोखले

देशभक्ती निर्माण करून स्वार्थत्यागाची शिकवण देणे, धर्म व जाती यांच्यातील विरोध नष्ट करून सलोखा निर्माण करणे, शिक्षणाचा प्रसार करणे या उद्देशांनी त्यांनी ही संस्था स्थापन केली. गोखले यांनी इंग्लंडमध्ये भारताच्या हलाखीचे, दारिद्र्याचे व सरकारच्या दडपशाहीचे चित्र ब्रिटिश जनतेसमोर ठेवले.

**राष्ट्रीय सभेची चतु:सूत्री :** १९०५ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष नामदार गोखले हे होते. त्यांनी वंगभंग आंदोलनाचे समर्थन केले. दादाभाई नौरोजी हे १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. अध्यक्षपदावरून बोलताना 'स्वराज्य' हे राष्ट्रीय सभेचे ध्येय असल्याचे त्यांनी जाहीर केले. 'एकजुटीने राहा, स्वराज्य मिळवा व त्यासाठी अखंड चळवळ करा', असा संदेश त्यांनी भारतीय जनतेला दिला. याच अधिवेशनात स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण ही चतु:सूत्री राष्ट्रीय सभेने एकमताने स्वीकारली.



दादाभाई नौरोजी

**मवाळ व जहाल यांच्यातील मतभेद :** ब्रिटिशांच्या जुलमी व अन्याय्य धोरणाचा सामना कसा करायचा, या मुद्द्यावरून राष्ट्रीय सभेत मतभेद निर्माण होऊ लागले होते. ब्रिटिश सरकारने राष्ट्रीय सभेच्या मागण्या पूर्ण केल्या नसल्या, तरी राष्ट्रीय सभेने सनदशीर मार्गानेच कार्य करावे अशा मताचा एक गट होता. त्याला 'मवाळ' असे म्हणत. याउलट अर्ज-विनंत्यांचा ब्रिटिश राज्यकर्त्यांवर काही परिणाम होणार नाही, राष्ट्रीय चळवळ तीव्र करावी, ती सामान्य जनतेपर्यंत न्यावी, लोकांमध्ये राजकीय जागृती घडवून आणावी, त्यांना राष्ट्रीय चळवळीत सामील करून घ्यावे, लोकमताच्या दडपणाखाली नमण्यास सरकारला भाग पाडावे, असे म्हणणारा दुसरा गट होता. त्याला 'जहाल' असे म्हणत. मवाळांनी स्वातंत्र्य चळवळीचा पाया घातला आणि जहालांनी ही चळवळ पुढे नेली.

**सुरत अधिवेशन :** राष्ट्रीय सभेतील हे मतभेद १९०७ सालच्या सुरत येथे झालेल्या अधिवेशनात विकोपाला गेले. स्वदेशी व बहिष्कार हे ठराव बाजूला सारण्याचा मवाळ नेत्यांचा प्रयत्न होता. तो यशस्वी होऊ नये अशी जहाल गटाची खटपट होती. त्यामुळे अधिवेशनाच्या वेळी तणाव वाढला. तडजोड अशक्य झाली. अखेरीस राष्ट्रीय सभेत फूट पडली.

**ब्रिटिश सरकारची दडपशाही :** वंगभंगानंतर सुरू झालेले प्रभावी जनआंदोलन पाहून सरकार अस्वस्थ झाले. या आंदोलनाला पायबंद घालण्यासाठी सरकारने दडपशाहीचे धोरण स्वीकारले. सार्वजनिक सभांवर कायद्याने बंदी घातली. हा कायदा मोडणाऱ्यांना कठोर शिक्षा केल्या. शाळकरी मुलांनाही फटके मारले. वृत्तपत्रांवर अनेक निर्बंध लादले. सरकारवर टीका केल्याच्या आरोपावरून अनेक छापखाने जप्त केले.



**लाला लजपतराय      लोकमान्य टिळक      बिपिनचंद्र पाल**

लेखकांना व संपादकांना तुरुंगात डांबले. सरकारने जहाल नेत्यांविरुद्ध कडक कारवाई केली. लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना सहा वर्षे मंडालेच्या तुरुंगात पाठवले. बिपिनचंद्र पाल यांना कारावासाची शिक्षा ठोठावली, तर लाला लजपतराय यांना पंजाबमधून हद्दपार केले.

**मुस्लिम लीगची स्थापना :** वंगभंग आंदोलनात राष्ट्रीय सभेला मिळणारा जनतेचा प्रचंड प्रतिसाद पाहून ब्रिटिश सत्ताधीश बेचैन झाले. इंग्रजांनी 'फोडा आणि राज्य करा' या मार्गाचा पुन्हा एकदा अवलंब केला. मुसलमानांचे हितसंबंध जपण्यासाठी मुसलमानांची स्वतंत्र राजकीय संघटना असली पाहिजे, असे अनेक इंग्रज अधिकारी सांगू लागले. ब्रिटिश सरकारच्या या प्रोत्साहनामुळे मुस्लिम समाजातील उच्चवर्गीयांचे एक शिष्टमंडळ आगाखान यांच्या नेतृत्वाखाली गव्हर्नर जनरल लॉर्ड मिंटो यांना भेटले. लॉर्ड मिंटो व अन्य ब्रिटिश अधिकारी यांच्या उत्तेजनाने १९०६ साली 'मुस्लिम लीग' या संघटनेची स्थापना झाली.

लीगच्या संस्थापकांमध्ये आगाखानांसारखे धर्मगुरू व मोहसिन उल् मुल्क, नवाब सलीम उल्ला यांसारखे जमीनदार व सरंजामदार यांचे वर्चस्व होते.

**१९०९ चा कायदा :** सरकारने १९०९ साली एक कायदा केला. या कायद्यास 'मोर्ले-मिंटो सुधारणा कायदा' म्हणतात. या कायद्यान्वये कायदेमंडळातील भारतीय प्रतिनिधींची संख्या वाढवण्यात आली आणि काही निर्वाचित भारतीय प्रतिनिधींचा समावेश कायदेमंडळात करण्याची तरतूद करण्यात आली. तसेच मुस्लिमांसाठी विभक्त मतदारसंघ निर्माण करण्यात आले. ब्रिटिशांच्या या भेदनीतीमुळे भारतात फुटीर वृत्तीची बीजे रोवली गेली.

**भारतीयांची एकजूट :** कारावासाची शिक्षा भोगून लोकमान्य टिळक सन १९१४ मध्ये भारतात परत आले. त्यानंतर जहाल व मवाळ गटांची एकजूट घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. १९१६ साली हे दोन्ही गट राष्ट्रीय सभेत पुन्हा एकत्र आले. याच वर्षी राष्ट्रीय सभा व मुस्लिम लीग यांच्यातही लखनौ येथे तडजोड झाली. याला 'लखनौ करार' असे म्हणतात. या करारानुसार मुस्लिमांच्या विभक्त मतदारसंघांना राष्ट्रीय सभेने मान्यता दिली आणि भारताला राजकीय अधिकार मिळवण्याच्या कामी राष्ट्रीय सभेशी सहकार्य करण्याचे मुस्लिम लीगने मान्य केले.

**होमरूल चळवळ :** १९१४ च्या ऑगस्टमध्ये युरोपात पहिले महायुद्ध सुरू झाले. या युद्धाची झळ भारतालाही लागली. दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे भाव वाढू लागले. सरकारने नागरिकांवर अनेक निर्बंध लादले. यामुळे भारतीयांत असंतोष वाढत गेला. अशा परिस्थितीत डॉ. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी होमरूल चळवळ सुरू केली. होमरूल म्हणजे आपला राज्यकारभार आपण करणे. यालाच 'स्वशासन'

म्हणतात. आयर्लंड या देशात वसाहतवादाविरुद्ध अशी चळवळ झाली होती. त्याच धर्तीवर भारतीय होमरूल चळवळीने स्वशासनाचे अधिकार ब्रिटिश सरकारकडे मागितले. ॲनी बेझंट व लोकमान्य टिळक यांनी देशभर झंझावाती दौरे केले व स्वशासनाची मागणी लोकांपर्यंत पोचवली. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळवणारच', असे टिळकांनी ठामपणे सांगितले. होमरूल चळवळीमुळे राष्ट्रीय आंदोलनात नवे चैतन्य निर्माण झाले.



डॉ. ॲनी बेझंट

**१९१७ ची घोषणा :** भारतातील वाढता असंतोष, होमरूल चळवळीची वाढती लोकप्रियता, युरोपातील युद्धजन्य परिस्थिती या पार्श्वभूमीवर ब्रिटिश सरकारने भारतीयांना काही राजकीय अधिकार देण्याचे ठरवले. ब्रिटिश सरकार भारताला टप्प्याटप्प्याने स्वशासनाचे अधिकार आणि जबाबदार राज्यपद्धती देईल, असे १९१७ साली भारतमंत्री माँटेग्यू यांनी घोषित केले. सरकार जर भारतीयांच्या मागण्यांविषयी सहानुभूती व समजूतदारपणा दाखवणार असेल, तर भारतीय जनतासुद्धा सरकारशी सहकार्य करेल, असे लोकमान्य टिळकांनी जाहीर केले. लोकमान्य टिळकांच्या या धोरणाला 'प्रतियोगी सहकारिता' असे म्हणतात. १९१९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने भारतात घटनात्मक सुधारणा घडवून आणण्यासाठी एक कायदा मंजूर केला. 'माँटेग्यू-चेम्सफर्ड कायदा' म्हणून हा कायदा ओळखला जातो.

**माँटेग्यू-चेम्सफर्ड कायदा :** या कायद्याने प्रांतिक पातळीवर काही बिनमहत्त्वाची खाती भारतीय मंत्र्यांकडे सोपवण्यात आली; परंतु अर्थ, महसूल, गृह यांसारखी महत्त्वाची खाती गव्हर्नरच्या ताब्यात होती. १९१९ च्या कायद्याने भारतात जबाबदार राज्यपद्धतीचा पाया घातला जाईल, अशी सर्वांची अपेक्षा होती; परंतु प्रत्यक्षात या कायद्याने सर्वांचीच निराशा केली. 'हे स्वराज्य नव्हे आणि त्याचा पायाही नव्हे', अशा शब्दांत लोकमान्य टिळकांनी या कायद्यावर टीका केली. सरकारला वठणीवर आणायचे असेल, तर व्यापक राष्ट्रीय आंदोलनाची आवश्यकता आहे, याची सर्व भारतीयांना जाणीव झाली. भारत नव्या आंदोलनास सिद्ध झाला.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) १९०५ मध्ये बंगाल प्रांताची फाळणी ....... या व्हाइसरॉयने जाहीर केली.
(लॉर्ड हेस्टिंग, लॉर्ड कर्झन, लॉर्ड कॉर्नवालिस)

(आ) ॲनी बेझंट व ....... यांनी होमरूल चळवळ सुरू केली.
(गोपाळ कृष्ण गोखले, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय)

(इ) राष्ट्रीय सभेचे अधिवेशन १९०७ साली ....... येथे भरले.
(लखनौ, सुरत, कोलकता)

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) दादाभाई नौरोजींनी १९०६ च्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात कोणता संदेश दिला ?

(आ) होमरूल म्हणजे काय ?

(इ) लोकमान्य टिळकांनी माँटेग्यू-चेम्सफर्ड कायद्यावर कोणत्या शब्दांत टीका केली ?

**३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) राष्ट्रीय उत्सव आयोजित करण्यामागे लोकमान्य टिळकांचा हेतू कोणता होता ?

(आ) कर्झनने बंगालची फाळणी का केली ?

(इ) प्रतियोगी सहकारिता म्हणजे काय ?

**४. कारणे लिहा.**

(अ) १९०६ मध्ये 'मुस्लिम लीग' या संघटनेची स्थापना झाली.

(आ) १९०७ सालच्या सुरत अधिवेशनात राष्ट्रीय सभेत फूट पडली.

**उपक्रम**

(अ) लोकमान्य टिळकांचे चरित्र वाचा.

(आ) पुढील तक्ता पूर्ण करा.

| चतु:सूत्री | अर्थ |
|---|---|
| स्वराज्य | स्वत:चे राज्य |
| स्वदेशी | ........... |
| बहिष्कार | ........... |
| राष्ट्रीय शिक्षण | ........... |

❑❑❑

# ९. असहकार पर्व

इ.स. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर राष्ट्रीय चळवळीची सूत्रे महात्मा गांधींकडे आली. गांधीजींच्या प्रभावी नेतृत्वामुळे राष्ट्रीय चळवळ अधिक व्यापक झाली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे नवे पर्व सुरू झाले.



**महात्मा गांधी**

**दक्षिण आफ्रिकेतील कार्य :** गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेत आपल्या कार्याची सुरुवात केली. तेथील गोऱ्या राजवटीकडून आफ्रिकेतील कृष्णवर्णीय लोकांवर व भारतीय रहिवाशांवर अन्याय व जुलूम केला जात असे. या अन्यायाविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रहाच्या मार्गाने तेथील लोकांना न्याय मिळवून दिला.

**गांधीजींचे भारतात आगमन :** १९१५ मध्ये गांधीजी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतले. त्यांनी भारतभर दौरा केला. येथील शेतकरी व कामगार यांचे प्रश्न त्यांनी हाती घेतले आणि त्यासाठी सत्याग्रहाचा अभिनव मार्ग वापरला.

**सत्याग्रह :** गांधीजींनी भारतात प्रथमच सत्याग्रहाचे अभिनव तंत्र वापरले. जुलूम व अन्याय यांचा अहिंसक मार्गाने प्रतिकार करण्याला या तंत्रात महत्त्व होते. या प्रतिकारासाठी हालअपेष्टा संयमाने सहन करायच्या असतात. अन्याय करणाऱ्या व्यक्तीला सत्य व न्याय यांची जाणीव करून देणे व तिचे मतपरिवर्तन करणे, हे सत्याग्रहाचे उद्दिष्ट

असते. सत्याग्रह करणाऱ्या व्यक्तीने हिंसा व असत्य यांचा वापर करता कामा नये, अशी गांधीजींची शिकवण होती.

सत्याग्रहाचा मार्ग सामान्य माणसालाही अनुसरता येतो. त्यामुळे भारतातील व जगातील जनतेने अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारला. कृष्णवर्णीयांच्या हक्कांसाठी झगडणारे अमेरिकेतील मार्टिन ल्यूथर किंग आणि दक्षिण आफ्रिकेतील नेल्सन मंडेला यांसारख्या नेत्यांवर गांधीजींच्या मार्गाचा प्रभाव पडला.

**चंपारण्य सत्याग्रह :** १९१७ मध्ये बिहारमधील चंपारण्य येथे ब्रिटिश मळे मालकांनी शेतकऱ्यांना नीळ पिकवण्याची सक्ती केली होती. गांधीजींनी या पिळवणुकीविरुद्ध सत्याग्रह केला आणि शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला.

**खेडा सत्याग्रह :** गुजरातमधील खेडा जिल्ह्यात सतत पडलेल्या दुष्काळामुळे पिकांची स्थिती अत्यंत वाईट होती. सरकारकडून सक्तीने शेतसारा वसूल केला जात होता, तेव्हा स्थानिक शेतकऱ्यांनी १९१८ मध्ये खेडा जिल्ह्यात साराबंदीची चळवळ सुरू केली. गांधीजींनी या चळवळीचे नेतृत्व स्वीकारले. अल्पावधीतच सरकारने शेतसारा माफ केला.

**अहमदाबादचा कामगार लढा :** पहिल्या महायुद्धाच्या काळात महागाई प्रचंड प्रमाणात वाढली होती. तरीही गिरणी मालकांनी कामगारांचे वेतन वाढवले नाही. त्यामुळे कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला. गांधीजींनी कामगारांना संप आणि उपोषण करण्यासंबंधी मार्गदर्शन केले. गिरणी मालकांनी माघार घेतली. त्यांनी कामगारांना वेतनवाढ दिली.


**रौलट कायद्याविरुद्ध सत्याग्रह :** भारतातील जनतेत दिवसेंदिवस सरकारच्या विरोधात असंतोष वाढत होता. तो रोखण्यासाठी

ब्रिटिश सरकारने रौलट या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. समितीच्या शिफारशीनुसार सरकारने नवीन कायदा केला. त्याला 'रौलट कायदा' म्हणतात. या कायद्याने कोणत्याही भारतीयाला विनाचौकशी अटक करण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला. या कायद्याने दिलेल्या शिक्षेविरुद्‌ध अपील करण्यास मनाई करण्यात आली. या काळ्या कायद्याविरुद्‌ध देशभर संतापाची लाट उसळली. गांधीजींनी या कायद्याच्या निषेधार्थ सत्याग्रह पुकारला. ६ एप्रिल १९१९ रोजी हरताळ पाळण्याचे आवाहन त्यांनी केले. या आवाहनाला भारतीयांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.

**जालियनवाला बाग हत्याकांड :** रौलट कायद्याविरोधी पुकारलेल्या लढ्याने पंजाब प्रांतात प्रखर स्वरूप धारण केले. सरकारने दडपशाहीचे सत्र सुरू केले. गांधीजींना पंजाब प्रांतात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली. जनरल डायरने अमृतसरमध्ये सभाबंदीचा हुकूम जारी केला. अमृतसर येथे डॉ. सत्यपाल, डॉ. सैफुद्‌दिन किचलु अशा प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. या घटनांच्या निषेधार्थ १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसर येथील जालियनवाला बागेत बैसाखी सणाच्या निमित्ताने सभा आयोजित करण्यात आली होती. सभेसाठी जमलेल्या निःशस्त्र लोकांवर जनरल डायरने बेछूट गोळीबार केला. या हत्याकांडात



**जालियनवाला बागेकडे जाणारा मार्ग**



रवींद्रनाथ टागोर

सुमारे चारशे स्त्री-पुरुष मरण पावले. असंख्य लोक जखमी झाले. या हत्याकांडास पंजाबचा शासक मायकेल ओडवायर हा जबाबदार होता. हत्याकांडाचा निषेध म्हणून रवींद्रनाथ टागोरांनी ब्रिटिश सरकारने त्यांना दिलेल्या 'सर' या किताबाचा त्याग केला. संपूर्ण पंजाबात लष्करी कायदा लागू करण्यात आला. पुढे या हत्याकांडाच्या चौकशीची मागणी भारतीयांनी केली. त्यामुळे सरकारने हंटर कमिशनची नियुक्ती केली. या हत्याकांडाने देशव्यापी असहकार चळवळीस जन्म दिला.

**खिलाफत चळवळ :** तुर्कस्तानचा सुलतान हा जगातील सर्व मुस्लिमांचा खलिफा म्हणजे धर्मप्रमुख होता. पहिल्या महायुद्धानंतर पराभूत गटातील तुर्कस्तानवर अपमानकारक तह लादण्यात आला आणि तुर्की साम्राज्याचे विघटन झाले. त्यामुळे मुस्लिमांमध्ये संतापाची लाट उसळली. खलिफाला पाठिंबा देण्यासाठी भारतीय मुस्लिमांनी जी चळवळ सुरू केली तिला 'खिलाफत चळवळ' असे म्हणतात. या प्रश्नावरून जर हिंदू-मुस्लिम ऐक्यावर आधारित राष्ट्रीय चळवळ सुरू केली, तर सरकार निश्चितच वठणीवर येईल, असे गांधीजींना वाटू लागले. त्यामुळे गांधीजींनी खिलाफत चळवळीला पाठिंबा दिला. सरकारशी असहकार करण्याचा गांधीजींचा प्रस्ताव खिलाफत कमिटीने मान्य केला. १९२० च्या ऑगस्ट महिन्यात असहकाराच्या आंदोलनाला प्रारंभ झाला.

**असहकाराचा राष्ट्रव्यापी लढा :** १९२० सालच्या नागपूरच्या

अधिवेशनात राष्ट्रीय सभेने असहकार चळवळीच्या ठरावाला मंजुरी दिली. असहकाराच्या चळवळीची सर्व सूत्रे महात्मा गांधींकडे सोपवण्यात आली. या ठरावानुसार शासकीय कार्यालये, परदेशी वस्तू, सरकारी शाळा-महाविद्यालये, न्यायालये यांच्यावर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम निश्चित झाला.

**असहकार चळवळीची वाटचाल :** असहकार चळवळीला देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. पं. मोतीलाल नेहरू, चित्तरंजन दास इत्यादी नामांकित वकिलांनी न्यायालयांवर बहिष्कार टाकला. हजारो विद्यार्थी मोठ्या संख्येने असहकार चळवळीत सहभागी झाले. देशभर राष्ट्रीय शिक्षण देणारी शाळा-महाविद्यालये स्थापन करण्यात आली. असहकार आंदोलन सर्वसमावेशक होऊ लागले. ब्रिटिश सरकारने मोठ्या प्रमाणावर दडपशाहीचा अवलंब केला. उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील चौरीचौरा येथे शांततापूर्ण मिरवणुकीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामुळे संतप्त झालेल्या जमावाने पोलीस चौकीला आग लावली. त्यात एका पोलीस अधिकाऱ्यासह २२ पोलीस ठार झाले. या घटनेमुळे गांधीजी व्यथित झाले. १९२२ च्या फेब्रुवारीमध्ये त्यांनी ही चळवळ स्थगित केली. त्यानंतर सरकारने गांधीजींना अटक केली.

गांधीजींवर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरून त्यांना सहा वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली. पुढे १९२४ च्या फेब्रुवारीमध्ये प्रकृतीच्या कारणावरून त्यांची सुटका करण्यात आली. गांधीजींनी असहकार चळवळीबरोबरच विधायक कार्यक्रम हाती घेतला. त्यात प्रामुख्याने स्वदेशीचा प्रसार, हिंदू-मुस्लिम ऐक्य, मद्यपान बंदी, अस्पृश्यता निवारण, खादीचा प्रसार, राष्ट्रीय शिक्षण अशा गोष्टींचा अंतर्भाव होता. या विधायक कार्यक्रमामुळे ग्रामीण भागांत राष्ट्रीय चळवळ जास्त बळकट झाली.

**स्वराज्य पक्ष :** सरकारची अडवणूक करण्यासाठी निवडणुका लढवून कायदेमंडळात प्रवेश करण्याची कल्पना मोतीलाल नेहरू व चित्तरंजन दास यांच्या मनात आली. त्यासाठी राष्ट्रीय सभेच्या अंतर्गत स्वराज्य पक्षाची १९२२ मध्ये त्यांनी स्थापना केली.

१९२३ च्या निवडणुकीत मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांवर स्वराज्य पक्षाचे अनेक उमेदवार निवडून आले. कायदेमंडळांत सरकारच्या अन्याय्य धोरणांना त्यांनी प्रखर विरोध केला. भारतास भावीकाळात जबाबदार राज्यपद्‌धती द्यावी अशी मागणी केली. भारतीयांचे प्रश्न सोडवण्यासाठी गोलमेज परिषद बोलवावी, राजकीय कैद्यांना मुक्त करावे, यासाठी विधिमंडळात ठराव संमत करून घेतले. सरकारने स्वराज्य पक्षाचे बहुतेक ठराव फेटाळून लावले.

**सायमन कमिशन :** १९१९ च्या मॉंटेग्यू-चेम्सफर्ड कायद्याने दिलेल्या सुधारणा असमाधानकारक होत्या. त्यामुळे भारतीय जनतेत असंतोष होता. १९२७ मध्ये सरकारने सायमन कमिशनची नियुक्ती केली. या कमिशनमध्ये एकही भारतीय सदस्य नव्हता, म्हणून भारतातील राजकीय पक्षांनी सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला. ठिकठिकाणी निदर्शने करण्यात आली. ‘सायमन गो बॅक’, ‘सायमन परत जा’ या घोषणा देऊन प्रखर विरोध करण्यात आला. निदर्शकांवर लाठी-हल्ले करण्यात आले. लाहोर येथील पोलिसांच्या लाठीहल्ल्यात लाला लजपतराय जखमी झाले. पुढे काही दिवसांतच त्यांचे निधन झाले.



**लाला लजपतराय**




**सायमन परत जा**

**नेहरू अहवाल :** भारतातील नेते एकमताने राज्यघटना तयार करू शकत नाहीत, अशी टीका भारतमंत्री बर्कनहेड यांनी केली. हे आव्हान स्वीकारून सर्वपक्षीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीचे अध्यक्ष पंडित मोतीलाल नेहरू होते. या समितीने तयार केलेल्या अहवालाला 'नेहरू अहवाल' असे म्हणतात. भारतामध्ये वसाहतीचे स्वराज्य स्थापन करावे, असा प्रस्ताव या अहवालात होता. राष्ट्रीय सभेने अहवालाला मान्यता दिली. त्याचबरोबर १९२९ अखेरपर्यंत सरकारने अहवाल स्वीकारला नाही, तर असहकाराचा लढा सुरू करण्याचा इशाराही दिला. या पार्श्वभूमीवर १९२९ च्या डिसेंबरमध्ये पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली भरलेले लाहोर अधिवेशन ऐतिहासिक ठरले.

**पूर्ण स्वराज्याची मागणी :** वसाहतीचे स्वराज्य हे आतापर्यंतचे राष्ट्रीय सभेचे उद्दिष्ट अनेक तरुण कार्यकर्त्यांना मान्य नव्हते. पं. जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस हे संपूर्ण स्वराज्याची मागणी करणाऱ्या तरुणांचे नेते होते. या तरुण गटाच्या प्रभावामुळे राष्ट्रीय सभेच्या लाहोर अधिवेशनामध्ये संपूर्ण स्वराज्याचा ठराव संमत करण्यात आला. या ठरावाद्वारे राष्ट्रीय सभेने वसाहतींचे स्वराज्य या उद्दिष्टाचा त्याग केला. यापुढे भारताचे संपूर्ण स्वातंत्र्य हे राष्ट्रीय चळवळीचे ध्येय बनले.


**पं. जवाहरलाल नेहरू**

२६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून पाळण्यात यावा, असे ठरवण्यात आले. ब्रिटिश सत्तेपासून भारताला मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्याचा लढा अहिंसक मार्गाने चालवण्याची प्रतिज्ञा २६ जानेवारी १९३० रोजी देशभर करण्यात आली. त्यामुळे देशात सर्वत्र चैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) गांधीजींनी आपल्या कार्याची सुरुवात ······· या देशातून केली.
(इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, भारत)

(आ) शेतकऱ्यांनी १९१८ मध्ये ······· जिल्ह्यात साराबंदीची चळवळ सुरू केली.
(गोरखपूर, खेडा, सोलापूर)

(इ) जालियनवाला बाग हत्याकांडाचा निषेध म्हणून रवींद्रनाथ टागोरांनी सरकारने दिलेल्या ······· या किताबाचा त्याग केला.
(लॉर्ड, सर, रावबहादूर)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सत्याग्रहाचे उद्‌दिष्ट कोणते असते ?

(आ) १९२० सालच्या नागपूर अधिवेशनात राष्ट्रीय सभेने कोणत्या ठरावाला मंजुरी दिली ?

(इ) असहकार चळवळीबरोबरच गांधीजींनी कोणता कार्यक्रम हाती घेतला ?

(ई) नेहरू अहवालात कोणता प्रस्ताव होता ?

**३. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) ब्रिटिश सरकारने ‘रौलट कायदा’ का केला ?

(आ) स्वराज्य पक्षाची स्थापना का करण्यात आली ?

(इ) खिलाफत चळवळ म्हणजे काय ?

(ई) १९२९ च्या लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वराज्याचा ठराव का संमत करण्यात आला ?

**४. कारणे लिहा.**

(अ) अहमदाबाद येथील गिरणी कामगारांमध्ये असंतोष निर्माण झाला.

(आ) गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केली.

(इ) भारतीयांनी सायमन कमिशनवर बहिष्कार घातला.

**उपक्रम**

(अ) ‘सत्याग्रह’ या विषयावर शिक्षकांच्या मदतीने चर्चा आयोजित करा.

(आ) २६ जानेवारी १९३० रोजी घेण्यात आलेल्या स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन आपल्या वर्गात करा.

(इ) गांधीजींच्या विधायक कार्यक्रमाविषयी अधिक माहिती मिळवा.

❑❑❑

# १०. सविनय कायदेभंग


लाहोर अधिवेशनात महात्मा गांधींकडे सविनय कायदेभंग चळवळ सुरू करण्याचे अधिकार देण्यात आले. ही चळवळ सुरू करण्यापूर्वी गांधीजींनी सरकारकडे मिठावरील कर रद्द करावा, मीठ बनवण्याची सरकारची मक्तेदारी रद्द करावी, दारूबंदी करावी इत्यादी मागण्या केल्या होत्या, मात्र सरकारने त्या मागण्या फेटाळल्या. त्यामुळे गांधीजींनी मिठाचा कायदा मोडून देशात सर्वत्र सत्याग्रह करण्याचे ठरवले.

मिठासारख्या जीवनावश्यक नैसर्गिक वस्तूवर कर बसवणे अन्यायकारक होते. मिठाचा सत्याग्रह हा प्रतीकात्मक होता. ब्रिटिश सरकारचे सर्व जुलमी व अन्यायकारक कायदे शांततेच्या मार्गाने मोडणे, हा त्याचा व्यापक अर्थ होता. कायदेभंगाबरोबरच दारूच्या व परदेशी कापडाच्या दुकानांसमोर निरोधने करणे, करबंदीची चळवळ करणे, असे व्यापक स्वरूप सविनय कायदेभंगाच्या चळवळीचे होते.



**दांडीयात्रा**

**दांडीयात्रा :** गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी गुजरातमधील दांडी हे गाव निश्चित केले. १२ मार्च १९३० रोजी ते आपल्या ७८ सहकाऱ्यांसह साबरमती आश्रमातून मिठाच्या सत्याग्रहासाठी निघाले. त्यांच्या समवेत सरोजिनी नायडू, मिठूबेन पेटिट या महिलाही होत्या. साबरमती ते दांडी या ३८५ किलोमीटरच्या वाटचालीत त्यांना असंख्य कार्यकर्ते येऊन मिळाले. ६ एप्रिल रोजी दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून गांधीजींनी मिठाचा कायदा मोडला. देशभर कायदेभंगाची चळवळ सुरू झाली.




The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India. © Government of India copyright 2009.

**पेशावरचा सत्याग्रह :** वायव्य सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफारखान हे गांधीजींचे निष्ठावान अनुयायी होते. त्यांना सरहद्द गांधी म्हणून ओळखले जाते. त्यांनी 'खुदा-इ-खिदमतगार' (परमेश्वराचे सेवक) या संघटनेची स्थापना केली. २३ एप्रिल १९३० रोजी पेशावर येथे त्यांनी सत्याग्रह सुरू केला. सुमारे आठवडाभर पेशावर शहर सत्याग्रहींच्या ताब्यात होते. सरकारने गढवाल पलटणीला सत्याग्रहींवर गोळीबार करण्याचा हुकूम दिला. तथापि, गढवाल पलटणीचे अधिकारी चंद्रसिंग ठाकूर यांनी गोळीबार करण्यास नकार दिला. त्यामुळे त्यांना लष्करी न्यायालयाने जबर शिक्षा दिली.



खान अब्दुल गफारखान

गांधीजींच्या सत्याग्रहामुळे सरकार अडचणीत आले. ४ मे १९३० रोजी गांधीजींना अटक करून सरकारने दडपशाहीचे धोरण सुरू केले. गांधीजींच्या अटकेचा सर्व भारतभर निषेध करण्यात आला.

**सोलापूरचा सत्याग्रह :** सोलापूर येथील सत्याग्रहात गिरणी कामगार आघाडीवर होते. त्यांनी ६ मे १९३० रोजी हरताळ पाळला. पोलीस स्टेशन, न्यायालये, रेल्वे स्टेशन, म्युनिसिपल इमारती इत्यादींवर



मल्लाप्पा धनशेट्टी श्रीकृष्ण सारडा कुर्बान हुसेन जगन्नाथ शिंदे

हल्ले करण्यात आले. सोलापूरमध्ये जनतेचेच राज्य निर्माण झाले होते. शेवटी सरकारने लष्कराला पाचारण केले. तेथे लष्करी कायदा जारी करून सोलापूरमधील चळवळ दडपून टाकली. सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे मल्लाप्पा धनशेट्टी, श्रीकृष्ण सारडा, कुर्बान हुसेन व जगन्नाथ शिंदे यांना फाशी देण्यात आले.

**धारासना सत्याग्रह :** गांधीजींच्या अटकेनंतर गुजरातमधील धारासना येथील सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांच्याकडे आले. या सत्याग्रहात मिठाचा कायदा मोडण्यासाठी निघालेल्या सत्याग्रहींवर पोलीस लाठीमार करत. सत्याग्रही शांतपणे काठ्यांचे प्रहार सहन करत. त्यांना औषधोपचारासाठी घेऊन गेल्यावर दुसरी तुकडी सत्याग्रह करण्यासाठी पुढे येत असे. असे अखंडपणे चालले होते. महाराष्ट्रात वडाळा, मालवण, शिरोडा इत्यादी ठिकाणी मिठाचे सत्याग्रह झाले.




सरोजिनी नायडू

जेथे मिठागरे नव्हती तेथे लोकांनी जंगलविषयक कायदे मोडायला सुरुवात केली. महाराष्ट्रात बिळाशी, संगमनेर, कळवण, चिरनेर, पुसद इत्यादी ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले. आदिवासींनी जंगल सत्याग्रहात मोठ्या संख्येने भाग घेतला.

**बाबू गेनूचे बलिदान :** परदेशी मालाचा ट्रक पुढे घेऊन जाण्यास मुंबईत सत्याग्रहींनी विरोध केला. बाबू गेनू हा कामगार त्यामध्ये आघाडीवर होता. ट्रक अडवण्यासाठी तो ट्रकसमोर आडवा पडला. पोलिसांनी धमकी देऊनही तो जागचा हालला नाही. अखेरीस ट्रक

त्याच्या अंगावरून गेला. बाबू गेनूचे हे बलिदान राष्ट्रीय चळवळीला प्रेरणादायी ठरले.

**स्त्रियांचा सहभाग :** सत्याग्रह लढ्यात स्त्रियांचा सहभाग मोठ्या



स्त्रियांचा सहभाग

प्रमाणावर होता. परदेशी मालाच्या दुकानांसमोर व दारूच्या दुकानांसमोर निरोधने करण्यात त्या पुढे होत्या. शेकडो स्त्रियांनी तुरुंगवास पत्करला. पोलिसांच्या अत्याचारांना त्या धैर्याने सामोऱ्या गेल्या. कस्तुरबा गांधी, कमलादेवी चट्टोपाध्याय, अवंतिकाबाई गोखले, लीलावती मुन्शी, हंसाबेन मेहता अशा कितीतरी स्त्रियांनी सत्याग्रहात पुढाकार घेतला होता.



कस्तुरबा गांधी

**पहिली गोलमेज परिषद :** ब्रिटिश प्रधानमंत्री रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी इ. स. १९३० मध्ये भारताशी संबंधित घटनात्मक प्रश्नांचा विचार

करण्यासाठी लंडनमध्ये एक परिषद आयोजित केली. तिला 'गोलमेज परिषद' म्हणतात. या परिषदेस विविध राजकीय पक्ष व संस्थानिकांनी आपले प्रतिनिधी पाठवले, मात्र राष्ट्रीय सभेने या परिषदेत सहभाग घेतला नाही. राष्ट्रीय सभा ही देशाची प्रातिनिधिक संस्था होती. तिच्याशिवाय गोलमेज परिषदेमधील चर्चा अर्थहीन ठरली. चर्चेच्या दुसऱ्या फेरीत राष्ट्रीय सभा सामील होईल, अशी आशा ब्रिटिश प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केली. प्रधानमंत्र्यांचे आवाहन लक्षात घेऊन व्हाइसरॉयने गांधीजी व अन्य नेत्यांना तुरुंगातून मुक्त केले. राष्ट्रीय सभेला मोकळेपणाने चर्चा करता यावी, यासाठी पोषक वातावरण निर्माण केले.


**गांधी-आयर्विन करार :** महात्मा गांधी व व्हाइसरॉय आयर्विन यांच्यात समझोता झाला. तो 'गांधी-आयर्विन करार' म्हणून प्रसिद्ध आहे. या करारानुसार सरकारने भारताच्या प्रस्तावित राज्यघटनेमध्ये जबाबदार राज्यपद्धतीचा स्वीकार करण्याची हमी दिली. राष्ट्रीय सभेने सविनय कायदेभंगाची चळवळ मागे घेतली आणि दुसऱ्या गोलमेज परिषदेमधील चर्चेत सहभागी होण्याची तयारी दर्शवली.

**दुसरी गोलमेज परिषद :** १९३१ साली दुसरी गोलमेज परिषद भरली. राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी म्हणून गांधीजी या परिषदेस हजर राहिले. राष्ट्रीय सभेबरोबरच सरकारने निरनिराळ्या जाती-जमातींच्या, पक्षांच्या व संस्थानिकांच्या प्रतिनिधींनाही पाचारण केले होते. गोलमेज परिषदेमध्ये सरकारने अल्पसंख्याकांचा प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नावर प्रतिनिधींमध्ये मतभेद झाले, तसेच संघराज्याच्या घटनेच्या स्वरूपाबाबतही मतभेद झाले. गांधीजींनी मतैक्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले, परंतु ते असफल झाले. त्यामुळे निराश होऊन गांधीजी भारतात परत आले.

**तिसरी गोलमेज परिषद :** १९३२ च्या नोव्हेंबरमध्ये तिसरी

गोलमेज परिषद भरली होती, मात्र राष्ट्रीय सभेने या परिषदेवर बहिष्कार टाकला. त्यामुळे ही परिषदही अर्थहीन ठरली.

**पुणे करार :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदांमध्ये दलितांचे प्रतिनिधित्व केले. तेथे त्यांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली होती. दुसऱ्या गोलमेज परिषदेनंतर ब्रिटिश प्रधानमंत्री रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला. त्यानुसार दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघ जाहीर करण्यात आले. जातीय निवाड्याने केलेली हिंदू समाजाची विभागणी गांधीजींना मान्य नव्हती, म्हणून त्यांनी या निवाड्याविरुद्ध येरवड्याच्या तुरुंगात आमरण उपोषण सुरू केले. राष्ट्रीय सभेच्या नेत्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या मागणीचा पुनर्विचार करण्याची विनंती केली. राष्ट्रहित लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही विनंती मान्य केली. महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात १९३२ मध्ये पुणे येथे एक करार झाला. त्याला 'पुणे करार' असे म्हणतात. या करारानुसार स्वतंत्र मतदारसंघाऐवजी दलितांना विधिमंडळात १४८ राखीव जागा द्याव्या असे ठरले. नंतर या योजनेला ब्रिटिश सरकारने मान्यता दिली.


**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

**सविनय कायदेभंगाची दुसरी फेरी :** दुसऱ्या गोलमेज परिषदेहून भारतात परत आल्यावर गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. गांधीजींना सरकारने ताबडतोब अटक

केली. त्यामुळे जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला.

सरकारने या चळवळीला अमानुष दडपशाहीने उत्तर दिले. सर्वत्र नागरी हक्कांची गळचेपी केली. राष्ट्रीय सभा व तिच्या सहयोगी संघटना बेकायदेशीर घोषित केल्या. त्यांची कार्यालये व निधी ताब्यात घेतले. राष्ट्रीय वर्तमानपत्रे व साहित्य यांच्यावर सरकारने करडी नजर ठेवली. १९३४ च्या एप्रिलमध्ये गांधीजींनी चळवळ मागे घेतली आणि सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचे ऐतिहासिक पर्व संपले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) गांधीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी गुजरातमधील ....... हे गाव निश्चित केले.
(साबरमती, दांडी, धारासना)

(आ) खान अब्दुल गफारखान यांनी ....... या संघटनेची स्थापना केली.
(मुस्लिम लीग, खुदा-इ-खिदमतगार, इंडियन असोसिएशन)

(इ) महाराष्ट्रात ......., संगमनेर, कळवण इत्यादी ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले.
(बिळाशी, वडाळा, शिरोडा)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) पेशावर | (१) बाबू गेनूने बलिदान केले. |
| (आ) धारासना | (२) म. गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यात करार झाला. |
| (इ) मुंबई | (३) आदिवासींनी जंगल सत्याग्रह केला. |
| (ई) पुणे | (४) सरोजिनी नायडू यांनी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. |
| | (५) चंद्रसिंग ठाकूर यांनी गोळीबार करण्यास नकार दिला. |

३. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) महाराष्ट्रात कोणत्या ठिकाणी मिठाचे सत्याग्रह झाले ?

(आ) सत्याग्रह लढ्यात भाग घेतलेल्या दोन स्त्रियांची नावे लिहा.

(इ) गांधी-आयर्विन करारानुसार सरकारने कोणती हमी दिली ?

## उपक्रम

(अ) महात्मा गांधींसंबंधी महत्त्वाच्या घटना, प्रसंगांची चित्रे संग्रहित करून त्यांचे प्रदर्शन भरवा. उदा., मिठाचा सत्याग्रह, खेडा सत्याग्रह इत्यादी.

(आ) महात्मा गांधींचे 'माझे सत्याचे प्रयोग' पुस्तक मिळवा व वाचा.





स्त्रियांचा सहभाग

# ११. छोडो भारत पर्व

सविनय कायदेभंगाची चळवळ १९३४ साली संपुष्टात आली. इंग्लंडच्या पार्लमेंटने भारतीयांना वैधानिक अधिकार देणारा कायदा १९३५ साली पास केला. या कायद्याने भारतीयांना अधिक कायदेशीर अधिकार मिळणार होते.

**१९३५ चा कायदा :** या कायद्याने भारतात ब्रिटिशशासित प्रांत व संस्थाने यांचे मिळून संघराज्य स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली. यानुसार ब्रिटिशशासित प्रदेशांचा कारभार भारतीय प्रतिनिधींच्या हाती सोपवण्यात येणार होता. संस्थानांना संघराज्यात सामील झाल्यास स्वायत्तता राहणार नव्हती, म्हणून संस्थानिकांनी संघराज्यात सामील होण्यास नकार दिला. त्यामुळे या कायद्यातील संघराज्याची योजना अमलात आली नाही.

**प्रांतिक निवडणुका :** १९३५ च्या कायद्याने राष्ट्रीय सभेचे समाधान झाले नाही, तरी या कायद्यानुसार होणाऱ्या प्रांतिक निवडणुकांमध्ये भाग घेण्याचे राष्ट्रीय सभेने ठरवले. १९३७ मध्ये देशातील अकरा प्रांतांमध्ये निवडणुका झाल्या. त्यांपैकी आठ प्रांतांमध्ये राष्ट्रीय सभेची मंत्रिमंडळे अधिकारावर आली. उरलेल्या तीन प्रांतांमध्ये कोणत्याही एका पक्षाला बहुमत मिळाले नाही. त्यामुळे तेथे संमिश्र मंत्रिमंडळे बनवण्यात आली.

राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळांनी लोकोपयोगी व विधायक कामे केली. त्यांनी राजबंद्यांची तुरुंगातून मुक्तता केली. मूलोद्योग शिक्षण सुरू केले. दलित समाजाच्या सुधारणेसाठी उपाय केले. दारूबंदी केली. शेतकऱ्यांसाठी कर्जनिवारण कायदा केला.

**दुसरे महायुद्ध आणि राष्ट्रीय सभा :** १९३९ मध्ये युरोपात दुसरे महायुद्ध सुरू झाले. तत्कालीन व्हाइसरॉय लिनलिथगो यांनी इंग्लंडच्या बाजूने भारत युद्धात सामील झाल्याची घोषणा केली. युरोपात लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आपण लढत आहोत, असा दावा इंग्लंडने केला होता. तो दावा खरा असल्यास इंग्लंडने भारताला ताबडतोब स्वातंत्र्य द्यावे, अशी मागणी राष्ट्रीय सभेने केली. ही मागणी ताबडतोब पूर्ण करण्यास इंग्लंडने नकार दिला, म्हणून १९३९ च्या नोव्हेंबरमध्ये राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले.

**वैयक्तिक सत्याग्रह :** राष्ट्रीय सभेच्या मागण्यांकडे ब्रिटिश सरकार सातत्याने दुर्लक्ष करत आहे, असे दिसून आल्यामुळे राष्ट्रीय सभेने युद्धविरोधी प्रचार करण्याचे ठरवले. त्यासाठी एकेका व्यक्तीने कायदेभंग करावा असा निर्णय घेण्यात आला. याला 'वैयक्तिक सत्याग्रह' असे म्हणतात. त्यातील पहिले सत्याग्रही आचार्य विनोबा भावे हे होते. त्यांच्यानंतर सुमारे पंचवीस हजार कार्यकर्त्यांनी सत्याग्रह केला.



**आचार्य विनोबा भावे**

**क्रिप्स योजना :** दुसऱ्या महायुद्धात इंग्लंडने जपानच्या विरोधात अमेरिकेचा पक्ष घेतला. जपानी फौजा भारताच्या पूर्व सीमेनजीक येऊन थडकल्या. जपानने भारतावर आक्रमण केल्यास त्याला प्रतिकार करण्यासाठी भारतीयांचे सहकार्य इंग्लंडला आवश्यक वाटू लागले, म्हणून इंग्लंडचे प्रधानमंत्री चर्चिल यांनी स्टॅफर्ड क्रिप्स यांना भारतात पाठवले.

मार्च १९४२ मध्ये क्रिप्स भारतात आले. त्यांनी भारताविषयीची एक योजना भारतीयांपुढे मांडली. या योजनेने भारतातील कोणत्याही राजकीय पक्षाचे समाधान झाले नाही. पूर्ण स्वातंत्र्याच्या मागणीचा स्पष्ट उल्लेख या योजनेत नव्हता, म्हणून राष्ट्रीय सभेने ती योजना नामंजूर केली. क्रिप्स योजनेत पाकिस्तान निर्मितीचा समावेश नव्हता, म्हणून मुस्लिम लीगनेही ही योजना फेटाळली.

**छोडो भारत चळवळ :** क्रिप्स योजनेनंतर स्वातंत्र्यासाठी प्रखर चळवळ करण्याचा निर्धार राष्ट्रीय सभेने केला. वर्धा येथे १४ जुलै १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने भारतातील ब्रिटिश सत्ता ताबडतोब संपुष्टात आणून भारताला स्वातंत्र्य देण्याची मागणी करणारा ठराव संमत केला. ही मागणी मान्य न झाल्यास राष्ट्रीय सभा भारताच्या स्वातंत्र्यासाठी अहिंसक चळवळ सुरू करेल, असा इशाराही देण्यात आला.

**छोडो भारत ठराव :** ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर (क्रांती मैदान) राष्ट्रीय सभेचे अधिवेशन सुरू झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद हे होते. ब्रिटिशांनी भारत सोडून जावे, या राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने वर्धा येथे मंजूर केलेल्या ठरावावर मुंबई येथील अधिवेशनात शिक्कामोर्तब होणार होते. ८ ऑगस्ट रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडलेला हा 'छोडो भारत' ठराव प्रचंड बहुमताने मंजूर झाला. गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी अहिंसक आंदोलन सुरू करण्याचाही निर्णय




**मौलाना आझाद**

घेण्यात आला. गांधीजी म्हणाले, ‘‘या क्षणापासून तुमच्यापैकी प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपण स्वतंत्र झालो आहोत, असे समजले पाहिजे आणि स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून वागले पाहिजे ... आपण भारताला स्वतंत्र तरी करू किंवा हे भगीरथ प्रयत्न करत असताना मरून तरी जाऊ.’’ गांधीजींनी जनतेला ‘करेंगे या मरेंगे’ या भावनेने बलिदानास सिद्ध होण्याचे स्फूर्तिदायक आवाहन केले.

**जनआंदोलनाची सुरुवात :** आंदोलन सुरू होण्यापूर्वीच ते चिरडून टाकण्याचा प्रयत्न सरकारने केला. ९ ऑगस्टच्या पहाटे गांधीजी, मौलाना आझाद, जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल इत्यादी प्रमुख नेत्यांना अटक करण्यात आली. नेत्यांच्या अटकेची बातमी देशभर वणव्यासारखी पसरली. जनतेचा संताप अनावर झाला. लोकांनी जागोजागी मिरवणुका काढल्या. पोलिसांनी आंदोलकांवर लाठीहल्ले आणि गोळीबार केला, तरी लोक घाबरले नाहीत.

अनेक ठिकाणी लोकांनी सरकारी कचेऱ्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीचे प्रतीक असणारे तुरुंग, पोलीस ठाणी, रेल्वे स्टेशन या ठिकाणांवर लोकांनी हल्ले केले. पोलिसांनी लोकांवर गोळीबार केला. नंदुरबार येथे शाळेतील विद्यार्थ्यांनी तिरंगी झेंडा घेऊन मिरवणूक काढली. ‘वंदे मातरम्’च्या घोषणा दिल्या. पोलिसांनी चिडून छोट्या मुलांवरही गोळीबार केला. शिरीषकुमार हा विद्यार्थी या गोळीबारात हुतात्मा झाला. महाराष्ट्रात चिमूर, आष्टी, यावली, महाड, गारगोटी इत्यादी अनेक गावांतून आबालवृद्धांनी नेटाने आणि असीम धैर्याने दिलेले लढे अविस्मरणीय ठरले.

**भूमिगत चळवळ :** १९४२ सालच्या अखेरीस या जनआंदोलनाला नवे वळण लागले. आंदोलनाचे नेतृत्व भूमिगत झालेल्या




जयप्रकाश नारायण　　अच्युतराव पटवर्धन　　अरुणा असफअली

तरुण समाजवादी कार्यकर्त्यांकडे आले. जयप्रकाश नारायण, डॉ. राममनोहर लोहिया, छोटूभाई पुराणिक, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, युसूफ मेहेरअली, सुचेता कृपलानी, एस. एम. जोशी, शिरूभाऊ लिमये, ना.ग. गोरे, यशवंतराव चव्हाण, मगनलाल बागडी इत्यादी नेते या कार्यात आघाडीवर होते. रेल्वेमार्गांची मोडतोड करणे, टेलिफोनच्या तारा तोडणे, पूल उदध्वस्त करणे अशी कामे करून आंदोलकांनी दळणवळण व सरकारी यंत्रणा विस्कळीत केली.


सध्याच्या रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यामधील भाई कोतवाल यांचा 'आझाद दस्ता', नागपूरच्या जनरल आवारी यांची 'लाल-सेना' अशा गटांनी कित्येक महिने सरकारला सळो की पळो करून सोडले. मुंबईला विठ्ठल जव्हेरी, उषा मेहता व त्यांच्या साथीदारांनी एक गुप्त प्रक्षेपण केंद्र स्थापन केले. त्याला 'आझाद रेडिओ' म्हणत. त्यावर राष्ट्रभक्तीची गीते गायली जात. देशातील आंदोलनाच्या बातम्या प्रसारित केल्या जात. देशभक्तिपर भाषणे प्रक्षेपित केली जात. यामुळे आंदोलन चालवण्यास जनतेला प्रोत्साहन मिळे. अशी प्रक्षेपण केंद्रे कोलकता, दिल्ली व पुणे येथे काही काळ चालली.

**प्रतिसरकारांची स्थापना :** बंगालमधील मिदनापूर, उत्तर प्रदेशातील बालिया व आझमगड, बिहारमधील भागलपूर व पूर्णिया या जिल्ह्यांत लोकांनी ब्रिटिश अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली आणि तेथे 'प्रतिसरकारे' स्थापन केली.

सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी १९४२ मध्ये प्रतिसरकार स्थापन केले. ते तेथील जनतेचे प्रेरणास्थान होते. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी तेथील ब्रिटिश शासन संपुष्टात आणले आणि जनतेचे सरकार स्थापन केले. कर गोळा करणे, कायदा व सुव्यवस्था टिकवणे, गुन्हेगारांना शिक्षा करणे इत्यादी कामे या सरकारतर्फे केली जात. या सरकारने नेमलेल्या, लोकन्यायालयाद्वारे न्यायनिवाडा केला जात असे. तो लोक स्वीकारत असत. तसेच मुलांच्या मनावर राष्ट्रभक्तीचा संस्कार करण्यासाठी राष्ट्र सेवादल, आझाद सेना, तुफान सेना इत्यादी संघटना उभारल्या. सावकारशाहीला विरोध, दारूबंदी, साक्षरता प्रसार, जातिभेदाला विरोध अशी अनेक विधायक कामेही हे सरकार करत असे. त्यामुळे या प्रतिसरकारला जनतेचा भरघोस पाठिंबा मिळाला.



**क्रांतिसिंह नाना पाटील**



**राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज**

**ऑगस्ट क्रांतीचे स्वरूप :** १९४२ च्या जनआंदोलनाचा वणवा देशभर पेटला होता. स्वातंत्र्यप्राप्तीचे उद्‌दिष्ट पूर्ण

करण्यासाठी लक्षावधी भारतीयांनी असीम त्याग केला. अनेकांनी आत्मबलिदान केले. आंदोलकांची संख्या इतकी प्रचंड होती, की त्यांना डांबून ठेवायला देशातील तुरुंगही अपुरे पडले. सानेगुरुजी, राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज इत्यादींच्या राष्ट्रभक्तिपर गीतांनी आंदोलकांचा उत्साह वाढवला. या राष्ट्रव्यापी आंदोलनाला 'ऑगस्ट क्रांती' असेही म्हटले जाते.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) १९३७ मध्ये देशातील ....... प्रांतांमध्ये निवडणुका झाल्या.
(सात, नऊ, अकरा)

(आ) वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही ....... हे होते.
(पं. जवाहरलाल नेहरू, आचार्य विनोबा भावे, मौलाना आझाद)

(इ) सातारा जिल्ह्यात ....... यांनी प्रतिसरकारची स्थापना केली.
(क्रांतिसिंह नाना पाटील, ना. ग. गोरे, एस. एम. जोशी)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) भाई कोतवाल | (१) आझाद रेडिओ |
| (आ) जनरल आवारी | (२) प्रतिसरकार |
| (इ) उषा मेहता | (३) आझाद दस्ता |
| | (४) लालसेना |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) १४ जुलै १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने कोणता ठराव संमत केला ?

(आ) महात्मा गांधींनी जनतेला कोणते आवाहन केले ?

(इ) भूमिगत चळवळीतील दोन नेत्यांची नावे लिहा.

४. **दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) राष्ट्रीय सभेच्या प्रांतिक मंत्रिमंडळांनी कोणती कामे केली ?
(आ) राष्ट्रीय सभेने क्रिप्स योजना का फेटाळली ?
(इ) साताऱ्याच्या प्रतिसरकारने कोणती कामे केली ?


५. **कारणे लिहा.**

(अ) संस्थानिकांनी संघराज्यात सामील होण्यास नकार दिला.
(आ) १९३९ मध्ये राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले.

## उपक्रम

(अ) १९४२ मधील भूमिगत चळवळीतील नेत्यांची चित्रे मिळवून त्याखाली त्यांची माहिती लिहा.
(आ) सानेगुरुजी व राष्ट्रसंत तुकडोजीमहाराज यांच्या राष्ट्रभक्तिपर गीतांचा संग्रह करा. शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात त्यातील गीते साभिनय सादर करा.

❑❑❑



स्कूल से १०० लड़के निकाले गये

राष्ट्रीयझण्डा फहराने के कारण : स्कूलपर पिकेटिंग

[ निज सम्वाददाता का तार ]

आजमगढ़, १६ सित० यहांके वेसली हाईस्कूल की इमारत पर झण्डा फहराने के कारण स्कूल से १०० लड़के निकाल दिये गये हैं। इन लड़कों में एक लड़का सिर्फ पांच वर्ष का है। इस पर कांग्रेस की ओर से स्कूल के अधिकारियों से कहा गया कि निकाले हुए लड़कों को फिर दाखिल कर लिया जाय, पर अधिकारी इस बात पर राजी नहीं हुए। इसलिए स्कूल पर कांग्रेस की ओर से पिकेटिंग बैठा दी गयी। बहुत कम लड़के स्कूल गये। पुलीस भी बुलायी गयी, किन्तु उसने कोई दस्तन्दाजी नहीं की। पिकेटिंग कल भी बड़े जोरों से होगी।



*National Herald*, 17 October 1940

India's Last Fight Starts Today

Vinoba to Begin Satyagraha

Wardha Village – The Scene Of Action

GOVERNMENT TO WATCH DEVELOPMENTS

WILL MAHATMA GANDHI BE ARRESTED?

"TIME OF GREATEST TRIAL"

NEHRU'S CALL TO U. P. CONGRESSMEN

TO MAHATMA GANDHI

# १२. सशस्त्र क्रांतिकारी चळवळ

ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध भारतात विविध मार्गांनी आंदोलने झाली. त्यांतील एक मार्ग सशस्त्र क्रांतीचा होता. त्याची ओळख आपण या पाठात करून घेणार आहोत.

सन १८५७ पूर्वी इंग्रजी सत्तेविरुद्ध झालेले उठाव आणि १८५७ चा राष्ट्रीय उठाव यांचा अभ्यास आपण केला आहे. त्यानंतरच्या काळात रामसिंह कुका यांनी पंजाबमध्ये सरकारविरोधी उठावाचे आयोजन केले होते. महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडके यांनी रामोश्यांना संघटित करून इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव केला होता. सन १८९७ साली पुण्यात प्लेगचा बंदोबस्त करताना प्लेग कमिशनर रँड याने जुलूम-जबरदस्ती केली. त्याचा बदला म्हणून चाफेकर बंधूंनी रँडचा वध केला. याच सुमारास बिहारमधील मुंडा आदिवासींनी सरकारविरुद्ध फार मोठा उठाव केला.

बंगालच्या फाळणीनंतर ब्रिटिशविरोधी प्रक्षोभ अधिकच तीव्र झाला. स्थानिक उठावांच्या जागी व्यापक अशा क्रांतिकारी चळवळीचा राष्ट्रीय पातळीवर उदय होऊ लागला. देशातील विविध भागांत क्रांतिकारी विचारांनी भारावलेले तरुण आपल्या गुप्त संघटना स्थापन करू लागले. ब्रिटिश अधिकाऱ्यांना जरब बसवणे, ब्रिटिश शासनयंत्रणा खिळखिळी करणे, ब्रिटिश सरकारचा लोकांना वाटणारा दरारा नाहीसा करणे, ब्रिटिशांची सत्ता उलथून टाकणे ही त्यांची प्रमुख उद्दिष्टे होती. मुंबई व बंगाल या प्रांतांमध्ये क्रांतिकारकांच्या संघटना विशेष कार्यरत होत्या.

**अभिनव भारत :** सन १९०० मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी नाशिक येथे 'मित्रमेळा' ही क्रांतिकारकांची गुप्त संघटना स्थापन केली. १९०४ साली याच संघटनेला 'अभिनव भारत'



स्वातंत्र्यवीर सावरकर

असे नाव देण्यात आले. उच्च शिक्षण घेण्याच्या निमित्ताने स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंडला गेले. तेथून त्यांनी अभिनव भारत संघटनेच्या भारतातील सदस्यांना क्रांतिकारी वाङ्मय, पिस्तुले इत्यादी साहित्य पाठवण्यास सुरुवात केली. त्यांनी जोसेफ मॅझिनी या प्रसिद्‌ध इटालियन क्रांतिकारकाचे स्फूर्तिदायी चरित्र लिहिले. १८५७ चा उठाव हे पहिले भारतीय स्वातंत्र्ययुद्‌ध होते, असे प्रतिपादन करणारा '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ त्यांनी लिहिला.

सरकारला अभिनव भारत संघटनेच्या कार्याचा सुगावा लागला. सरकारने बाबाराव सावरकर यांना अटक केली. त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. या शिक्षेचा बदला घेण्यासाठी अनंत लक्ष्मण कान्हेरे या युवकाने नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध केला. सरकारने अभिनव भारत संघटनेशी संबंधित असलेल्या लोकांना अटक करण्यास सुरुवात केली. जॅक्सनच्या वधाचा संबंध सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकरांशी जोडला आणि त्यांना अटक करून त्यांच्यावर खटला भरला. न्यायालयाने त्यांना पन्नास वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा फर्मावली.

**बंगालमधील क्रांतिकारी चळवळ :** बंगालमध्ये 'अनुशीलन समिती' ही क्रांतिकारी संघटना कार्यरत होती. अनुशीलन समितीच्या पाचशेच्या वर शाखा होत्या. अरविंद घोष यांचे बंधू बारींद्रकुमार घोष हे या संघटनेचे प्रमुख होते. अरविंद घोष यांचा सल्ला व मार्गदर्शन या संघटनेला लाभत असे. कोलकत्याजवळील माणिकताळा येथे या समितीचे बाँब तयार करण्याचे केंद्र होते.

१९०८ साली खुदीराम बोस व प्रफुल्ल चाकी या अनुशीलन समितीच्या सदस्यांनी किंग्जफोर्ड या न्यायाधीशाला ठार करण्याची योजना आखली; परंतु ज्या गाडीवर त्यांनी बॉंब टाकला ती गाडी किंग्जफोर्डची नव्हती. या हल्ल्यात गाडीतील दोन इंग्लिश स्त्रिया मृत्युमुखी पडल्या. प्रफुल्ल चाकी यांनी स्वतःवर गोळी झाडून घेतली. खुदीराम बोस पोलिसांच्या हाती लागले. त्यांना फाशी देण्यात आले. या प्रकरणाचा तपास करत असताना अनुशीलन समितीच्या कार्याची माहिती पोलिसांना झाली. त्यांनी या संघटनेच्या सदस्यांची धरपकड सुरू केली. अरविंद घोष यांनाही अटक करण्यात आली. अरविंदबाबूंचा संबंध बॉंब तयार करण्याशी जोडण्यात सरकारला अपयश आल्याने त्यांना न्यायालयाने निर्दोष सोडले. अन्य सदस्यांना दीर्घ मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.

रासबिहारी बोस व सचिंद्रनाथ संन्याल यांनी क्रांतिकारी संघटनांचे जाळे बंगालबाहेर विस्तारले. पंजाब, दिल्ली, उत्तर प्रदेश येथे क्रांतिकार्याची केंद्रे उभारली. व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंग्जवर बॉंब फेकण्याचे धाडसी कृत्य रासबिहारी बोस व त्यांच्या सहकाऱ्याने केले, पण या हल्ल्यातून लॉर्ड हार्डिंग्ज बचावला.

मद्रास प्रांतातही क्रांतिकार्य चालू होते. वांची अय्यर या क्रांतिकारकाने ॲश या ब्रिटिश अधिकाऱ्याला ठार केले. त्यानंतर त्याने स्वतःवर गोळी झाडून आत्माहुती दिली.

**इंडिया हाउस :** भारतातील क्रांतिकार्याला परदेशातील भारतीय क्रांतिकारकांकडून साहाय्य मिळत असे. लंडन येथील इंडिया हाउस हे अशा साहाय्याचे महत्त्वाचे केंद्र होते. पं. श्यामजी कृष्ण वर्मा या भारतीय देशभक्ताने इंडिया हाउसची स्थापना केली होती. या संस्थेमार्फत भारतीय तरुणांना इंग्लंडमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्त्या दिल्या



पं. श्यामजी कृष्ण वर्मा



मादाम कामा

जात. स्वातंत्र्यवीर सावरकरांना अशी शिष्यवृत्ती मिळाली होती. मादाम कामा यांनी जर्मनीत स्टुटगार्ट येथे भरलेल्या जागतिक समाजवादी परिषदेत भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न उपस्थित केला. याच परिषदेत त्यांनी भारताचा ध्वज फडकावला होता. इंडिया हाउसशी निगडित असलेला दुसरा क्रांतिकारी म्हणजे मदनलाल धिंग्रा हा तरुण होय. त्यांनी कर्झन वायली या इंग्रज अधिकाऱ्याला ठार केले. त्याबद्दल धिंग्रा यांना फाशी देण्यात आले.

**गदर चळवळ :** पहिल्या महायुद्धाच्या काळात ब्रिटिशविरोधी क्रांतिकारी कार्याला गती मिळाली. ब्रिटिशांच्या शत्रूंची मदत घेऊन भारतामध्ये सत्तांतर घडवून आणता येईल, भारतीय सैनिकांची या प्रयत्नात साथ घेता येईल, असे क्रांतिकारकांना वाटत होते. या संधीचा लाभ घेण्यासाठी क्रांतिकारक संघटना स्थापन झाल्या. 'गदर' ही त्यांतील एक प्रमुख संघटना होती.

अमेरिका व कॅनडा येथील भारतीयांनी 'गदर' या संघटनेची स्थापना केली होती. लाला हरदयाळ, भाई परमानंद, डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे इत्यादी क्रांतिकारक या संघटनेचे प्रमुख नेते होते. 'गदर' म्हणजे

विद्रोह. 'गदर' हे या संघटनेच्या मुखपत्राचे नाव होते. या मुखपत्रातून ब्रिटिश राजवटीचे भारतावरील दुष्परिणाम विशद करण्यात येत. भारतीय क्रांतिकारकांच्या साहसी कृत्यांची माहिती सांगितली जाई. राष्ट्रप्रेम व सशस्त्र क्रांती यांचा संदेश 'गदर' या मुखपत्राने भारतीयांना दिला.

ब्रिटिशविरोधी उठाव करण्यासाठी 'गदर' संघटनेच्या नेत्यांनी युद्‌धजन्य परिस्थितीचा फायदा घेण्याचे ठरवले. त्यांनी पंजाबमध्ये ब्रिटिशांविरुद्‌ध उठाव करण्यासाठी योजना आखली. लष्करामधील भारतीय सैनिकांना उठावात सामील होण्यासाठी उद्युक्त केले. रासबिहारी बोस आणि विष्णु गणेश पिंगळे यांनी उठावाचे नेतृत्व करावे असे ठरले, पण फितुरीमुळे ब्रिटिशांना या योजनेचा सुगावा लागला. पिंगळे पोलिसांच्या हाती सापडले. त्यांना फाशी देण्यात आले. रासबिहारी बोस मात्र निसटून जाण्यात यशस्वी झाले. जपानमध्ये जाऊन त्यांनी आपले क्रांतिकार्य सुरू ठेवले.

युद्‌धकाळात परदेशात अन्यत्रही क्रांतिकारी चळवळ कार्यरत होती. बर्लिनमध्ये वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय, भूपेन दत्त आणि हरदयाळ यांनी जर्मन परराष्ट्र खात्याच्या सहकार्याने ब्रिटिशविरोधी योजना आखल्या. सन १९१५ मध्ये महेंद्रप्रताप, बरकतुल्ला व ओबीदुल्ला सिंधी यांनी काबूलमध्ये स्वतंत्र भारताच्या हंगामी सरकारची स्थापना केली होती.

**काकोरी कट :** सरकारच्या दडपशाहीने क्रांतिकारी चळवळ संपुष्टात आली नाही. गांधीजींनी असहकार चळवळ स्थगित केल्यावर अनेक तरुण क्रांतिमार्गाकडे वळले. चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, योगेश चटर्जी, सचिंद्रनाथ संन्याल इत्यादी क्रांतिकारक एकत्र आले. क्रांतिकार्याला लागणारा पैसा जमवण्यासाठी त्यांनी रेल्वेतून नेला जाणारा सरकारी खजिना ९ ऑगस्ट १९२५ रोजी काकोरी या उत्तर

प्रदेशातील रेल्वे स्टेशनजवळ लुटला. यालाच 'काकोरी कट' म्हटले जाते. सरकारने तत्काळ कारवाई करून क्रांतिकारकांना अटकेत टाकले. त्यांच्यावर खटले चालवण्यात आले. अशफाक उल्ला, रामप्रसाद बिस्मिल, रोशन सिंग, राजेंद्र लाहिरी यांना फाशी देण्यात आले. चंद्रशेखर आझाद मात्र पोलिसांच्या हाती सापडले नाहीत.




**चंद्रशेखर आझाद**

**हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन :** समाजवादी विचारांनी प्रभावित झालेल्या तरुणांनी देशव्यापी क्रांतिकारी संघटना उभी करण्याचे ठरवले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव इत्यादी तरुण यांमध्ये प्रमुख होते. हे सर्व क्रांतिकारक धर्मनिरपेक्ष विचारसरणीचे होते. १९२८ साली दिल्लीच्या फिरोजशहा कोटला मैदानावर झालेल्या बैठकीमध्ये या तरुणांनी 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' या संघटनेची स्थापना केली. भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून मुक्त करणे, हे या संघटनेचे उद्‌दिष्ट होते. त्याचबरोबर तिला शेतकरी-कामगारांचे शोषण करणारी अन्याय्य सामाजिक-आर्थिक व्यवस्थाही उलथून टाकायची होती. सामाजिक न्यायावर व समतेवर आधारित समाज निर्माण करण्याला भगतसिंग यांनी महत्त्व दिले.



**भगतसिंग**

शस्त्रे गोळा करणे आणि कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे, ही



राजगुरू



सुखदेव

कामे या संघटनेच्या एका स्वतंत्र विभागाकडे सोपवली होती. या विभागाचे नाव होते 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मी' आणि तिचे प्रमुख होते चंद्रशेखर आझाद.

या संघटनेच्या सदस्यांनी अनेक क्रांतिकारक कृत्ये केली. भगतसिंग व राजगुरू यांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी सॉंडर्स या अधिकाऱ्याला गोळ्या घालून ठार केले.

नागरी हक्कांची पायमल्ली करणारी दोन विधेयके या वेळी सरकारने मध्यवर्ती विधिमंडळात दाखल केली होती. त्यांचा निषेध करण्यासाठी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती विधिमंडळात बॉंब फेकले.

सरकारने तत्काळ हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीच्या केंद्रांवर धाडी घातल्या. त्यातून सॉंडर्सच्या हत्येचे धागेदोरेही पोलिसांच्या हाती लागले. सरकारने क्रांतिकारकांची धरपकड सुरू केली. त्यांच्यावर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटले भरले. भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरुंगात फाशी देण्यात आले.

काहींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. इतरांना दीर्घ मुदतीच्या कारावासाच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या.


चंद्रशेखर आझाद मात्र शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती सापडले नाहीत. पुढे अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांशी झालेल्या चकमकीत ते ठार झाले. चंद्रशेखर आझाद यांच्या मृत्यूनंतर पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार या प्रांतांमधील क्रांतिकारी चळवळीला ओहोटी लागली.

**चितगाव शस्त्रागारावरील हल्ला :** सूर्य सेन हे बंगालमधील चितगाव येथील क्रांतिकारी गटाचे प्रमुख होते. त्यांनी आपल्याभोवती अनंत सिंग, गणेश घोष, कल्पना दत्त, प्रीतिलता वड्डेदार अशांसारख्या निष्ठावान क्रांतिकारकांची फौज गोळा केली. त्यांच्या साहाय्याने चितगाव येथील शस्त्रागारावरील हल्ल्याची योजना सूर्य सेन यांनी आखली. योजनेप्रमाणे १८ एप्रिल १९३० रोजी क्रांतिकारकांनी चितगावमधील दोन शस्त्रागारांतील शस्त्रास्त्रे ताब्यात घेतली. टेलिफोन व टेलिग्राफ यंत्रणा त्यांनी तोडून टाकली आणि संदेशवहन यंत्रणा ठप्प करण्यात यश मिळवले. त्यानंतर त्यांनी ब्रिटिश फौजांशी रोमहर्षक लढत दिली.




सूर्य सेन

१६ फेब्रुवारी १९३३ रोजी सूर्य सेन व त्यांचे काही सहकारी पोलिसांच्या हाती सापडले. सूर्य सेन व त्यांच्या बारा सहकाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. कल्पना दत्त यांना जन्मठेप झाली. प्रीतिलता वड्डेदारने पोलिसांच्या हाती न लागता आत्माहुती दिली.



कल्पना दत्त



प्रीतिलता वड्डेदार

चितगाव उठावामुळे क्रांतिकारी चळवळीला गती मिळाली. शांती घोष व सुनीती चौधरी या दोन शाळकरी मुलींनी जिल्हा न्यायाधीशाला ठार केले, तर बीना दास या युवतीने कोलकता विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात गव्हर्नरवर गोळ्या झाडल्या. अशा अनेक क्रांतिकारी घटना या काळात घडल्या.

सरदार उधमसिंग यांनी इंग्लंडमध्ये १९४० मध्ये मायकेल ओडवायर याचा वध केला.

भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये क्रांतिकारी चळवळीने महत्त्वाचे योगदान दिले आहे. क्रांतिकारकांनी ब्रिटिश सत्तेशी लढताना साहस व निर्धाराचे दर्शन घडवले. त्यांचे राष्ट्रप्रेम व समर्पणवृत्ती केवळ अजोड होती. त्यांचे बलिदान भारतीयांना स्फूर्तिदायी ठरले आहे.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) ‘१८५७ चे स्वातंत्र्यसमर’ हा ग्रंथ ....... यांनी लिहिला.
(स्वातंत्र्यवीर सावरकर, अरविंद घोष, भूपेंद्रनाथ दत्त)

(आ) लंडन येथे ······· यांनी ‘इंडिया हाउस’ची स्थापना केली.
(डॉ. खानखोजे, लाला हरदयाळ, पं. श्यामजी कृष्ण वर्मा)

(इ) बंगालमधील चितगाव येथील क्रांतिकारी गटाचे ····· हे प्रमुख होते.
(सूर्य सेन, चंद्रशेखर आझाद, भगतसिंग)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) चाफेकर बंधूंनी रँडचा वध का केला ?

(आ) गदर म्हणजे काय ?

(इ) भगतसिंग व राजगुरू यांनी सॉंडर्स या अधिकाऱ्याला ठार का केले ?

**३. चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) क्रांतिकारकांची प्रमुख उद्‌दिष्टे कोणती होती ?

(आ) इंग्लंडमधील ‘इंडिया हाउस’च्या कार्याची माहिती लिहा.

(इ) चितगाव शस्त्रागारावरील हल्ल्याच्या योजनेची माहिती लिहा.

**४. कारणे लिहा.**

(अ) भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती विधिमंडळात बॉंब फेकले.

(आ) मदनलाल धिंग्रा यांना फाशी देण्यात आले.

(इ) क्रांतिकारकांनी काकोरी रेल्वे स्टेशनजवळ रेल्वे खजिना लुटला.

**उपक्रम**


(अ) राष्ट्रभक्तिपर गीते मिळवा व त्यांचा संग्रह करा.

(आ) कवी कुसुमाग्रजांच्या ‘क्रांतीचा जयजयकार’ या गीताचे समूहगान करा.

❑❑❑

# १३. आझाद हिंद सेना

'छोडो भारत' आंदोलन ऐन भरात होते. त्याच सुमारास भारताच्या पूर्व सीमेनजीक हजारो भारतीय सैनिक ब्रिटिशांविरुद्ध युद्ध करण्यास उभे राहिले. हे सैनिक आझाद हिंद सेनेचे सदस्य होते. नेताजी सुभाषचंद्र बोस हे त्यांचे नेते होते.




नेताजी सुभाषचंद्र बोस

सुभाषचंद्र बोस हे राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष म्हणून दोन वेळा निवडून आले होते. 'इंग्लंड दुसऱ्या महायुद्धात गुंतलेले आहे. त्याचा फायदा घेऊन भारतात आंदोलन तीव्र करावे. त्यासाठी इंग्लंडच्या शत्रूचीही मदत घ्यावी', असे त्यांचे मत होते; परंतु राष्ट्रीय सभेतील ज्येष्ठ नेत्यांशी त्यांचे मतभेद झाले. त्यामुळे सुभाषबाबूंनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपले विचार जनतेपुढे मांडण्यासाठी त्यांनी 'फॉरवर्ड ब्लॉक' हा पक्ष स्थापन केला.


सुभाषचंद्र बोस आपल्या भाषणांतून ब्रिटिशांविरुद्ध उठाव करण्याचे आवाहन भारतीयांना करू लागले. त्यामुळे ब्रिटिश सरकारने त्यांना नजरकैदेत ठेवले. तेथून त्यांनी वेशांतर करून सुटका करून घेतली. १९४१ च्या एप्रिलमध्ये ते जर्मनीला पोहोचले. तेथे त्यांनी 'फ्री इंडिया सेंटर'ची स्थापना केली. जर्मनीच्या बर्लिन रेडिओ केंद्रावरून भारताच्या स्वातंत्र्यासाठी भारतीय जनतेला सशस्त्र लढ्यात भाग घेण्याचे आवाहन केले. जर्मनीकडून अपेक्षित मदत त्यांना मिळाली नाही. त्याचवेळी रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांना जपानला येण्याची विनंती केली.

**आझाद हिंद सेनेची स्थापना :** रासबिहारी बोस हे १९१५ पासून जपानमध्ये राहत होते. आग्नेय आशियातील राष्ट्रांमध्ये वास्तव्य करणाऱ्या देशप्रेमी भारतीयांना संघटित करून त्यांनी 'इंडियन इंडिपेंडन्स लीग' नावाची संघटना स्थापन केली होती.



**रासबिहारी बोस**

जपानने १९४२ च्या पूर्वार्धात आग्नेय आशियातील ब्रिटिशांच्या ताब्यातील प्रदेश जिंकले. त्या वेळी तेथील ब्रिटिश सैन्यातील हजारो भारतीय सैनिक व अधिकारी जपानच्या हाती आले. युद्धबंदी झालेल्या भारतीय सैनिकांची एक पलटण कॅप्टन मोहनसिंग यांच्या मदतीने रासबिहारी बोस यांनी तयार केली. तिला 'आझाद हिंद सेना' असे नाव दिले गेले. या सेनेचे नेतृत्व करण्याची विनंती सुभाषचंद्र बोस यांना करण्यात आली.



**झाशीची राणी पथक**

सिंगापूर येथे नेताजींनी १९४३ च्या ऑक्टोबरमध्ये आझाद हिंद सरकार स्थापन केले. शहानवाझ खान, जगन्नाथ भोसले, डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन, गुरुबक्षसिंग धिल्लाँ, प्रेमकुमार सेहगल इत्यादी त्यांचे प्रमुख सहकारी होते. कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन या 'झाशीची राणी' महिला पथकाच्या प्रमुख होत्या. 'तिरंगी ध्वज' हे आझाद हिंद सेनेचे निशाण होते. 'जयहिंद' हे अभिवादनाचे शब्द, 'चलो दिल्ली' हे घोषवाक्य, तर 'कदम कदम बढाए जा' हे समरगीत होते. त्यांनी भारतीयांना 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूँगा' असे आवाहन केले.

**आझाद हिंद सेनेचा पराक्रम :** १९४३ च्या अखेरीस अंदमान व निकोबार बेटे जिंकून ती जपानने आझाद हिंद सरकारच्या स्वाधीन केली. नेताजींनी त्यांचे अनुक्रमे 'शहीद' व 'स्वराज्य' असे नामकरण केले. १९४४ मध्ये म्यानमारमधील आराकानचा प्रदेश मिळवला. तसेच आसामच्या पूर्व सीमेवरील ठाणी जिंकली, मात्र इम्फाळची मोहीम अर्धवटच राहिली, कारण आझाद हिंद सेनेला जपानकडून मिळणारी मदत बंद झाली. या वेळी ब्रिटिशांना अमेरिकन लष्कराची मदत मिळाली, म्हणून ब्रिटिशांचे लष्करी सामर्थ्य वाढले. अशा प्रतिकूल परिस्थितीतही आझाद हिंद सेनेचे सैनिक नेटाने लढतच होते.

जपानमधील हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर १९४५ च्या ऑगस्टमध्ये अमेरिकेने अणुबाँब टाकले. त्यामुळे जपानने शरणागती पत्करली. याच सुमारास १८ ऑगस्ट १९४५ रोजी झालेल्या विमान अपघातात नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन झाले. या पार्श्वभूमीवर आझाद हिंद सेनेला शस्त्रे खाली ठेवावी लागली. अशा रीतीने आझाद हिंद सेनेच्या लढ्याचे पर्व संपले.

**आझाद हिंद सेनेच्या अधिकाऱ्यांवर खटला :** आझाद हिंद

सेनेच्या अधिकाऱ्यांवर ब्रिटिश सरकारने राजद्रोहाचा आरोप ठेवला. दिल्लीच्या लाल किल्ल्यात लष्करी न्यायालयापुढे त्यांच्या खटल्याचे काम सुरू झाले. या अधिकाऱ्यांच्या वतीने पं. जवाहरलाल नेहरू, भुलाभाई देसाई, तेजबहादूर सप्रू इत्यादी निष्णात कायदेपंडितांनी त्यांच्या बचावाचे काम केले. लष्करी न्यायालयाने या अधिकाऱ्यांना दोषी ठरवून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. आझाद हिंद सेनेविषयी भारतीयांना सहानुभूती व अभिमान वाटत होता. ब्रिटिश सरकारने अधिकाऱ्यांना दिलेल्या शिक्षेमुळे भारतीय जनतेत ब्रिटिश शासनाविरुद्ध प्रखर असंतोष निर्माण झाला. त्यामुळे लष्करी न्यायालयाने दिलेल्या शिक्षा ब्रिटिश सरकारला रद्द कराव्या लागल्या.

**भारतीय नौदल व विमान दलातील उठाव :** आझाद हिंद सेनेच्या प्रेरणेतून नौसैनिकांमध्ये व वायुसैनिकांमध्ये ब्रिटिश सत्तेविरुद्ध असंतोष निर्माण झाला. त्याचा उद्रेक १८ फेब्रुवारी १९४६ रोजी मुंबई



**नौदलाचा उठाव, मुंबई**

येथील 'तलवार' या ब्रिटिश युद्‌धनौकेवर झाला. सैनिकांनी युद्‌धनौकेवर तिरंगी ध्वज फडकवला. ब्रिटिश सत्तेविरुद्‌ध घोषणा दिल्या. ब्रिटिश सरकारने लष्कर पाठवून नौसैनिकांवर गोळीबार केला. त्याला उठावकऱ्यांनी गोळीबारानेच उत्तर दिले. मुंबईतील कामगार आणि सामान्य लोकांनी नौसैनिकांना पाठिंबा दिला. अखेरीस सरदार वल्लभभाई पटेल यांच्या मध्यस्थीने नौसैनिकांनी शस्त्रे खाली ठेवली.

मुंबईतील नौसैनिकांच्या उठावाला पाठिंबा देण्यासाठी दिल्ली, लाहोर, कराची, अंबाला, मेरठ इत्यादी ठिकाणच्या हवाईदलातील अधिकाऱ्यांनीही संप पुकारला. हे उठाव राज्यकर्त्यांविरोधी असंतोषाची भावना शिगेला पोहोचल्याचे निदर्शक होते. अशा प्रकारे १९४२ ते १९४६ या काळात भारतातील ब्रिटिश सत्तेचा पाया खिळखिळा झाला. 'छोडो भारत' आंदोलनातून भारतीय जनतेचा प्रखर ब्रिटिशविरोध व्यक्त झाला. लष्कर, नौदल व विमानदल हे ब्रिटिश सत्तेचे आधारस्तंभ होते. तेही आता ब्रिटिशविरोधी बनू लागले. या सर्व घटनांमुळे भारतावरील आपली सत्ता फार काळ टिकवता येणार नाही, याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) आपले विचार जनतेपुढे मांडण्यासाठी सुभाषबाबूंनी ······· हा पक्ष स्थापन केला.
(गदर, फॉरवर्ड ब्लॉक, इंडियन इंडिपेंडन्स लीग)

(आ) रासबिहारी बोस यांनी सुभाषचंद्र बोस यांना ······· येण्याची विनंती केली.
(इंग्लंडला, जपानला, सिंगापूरला)

(इ) सिंगापूर येथे नेताजींनी ऑक्टोबर १९४३ मध्ये ...... स्थापन केले.
(फ्री इंडिया सेंटर, आझाद हिंद सेना, आझाद हिंद सरकार)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सुभाषबाबूंनी भारतीयांना कोणते आवाहन केले ?
(आ) सुभाषचंद्र बोस यांच्या प्रमुख सहकाऱ्यांची नावे लिहा.
(इ) आझाद हिंद सेनेचे समरगीत कोणते होते ?

**३. कारणे लिहा.**

(अ) सुभाषबाबूंनी राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला.
(आ) ब्रिटिश सरकारने सुभाषचंद्र बोस यांना नजरकैदेत ठेवले.
(इ) जपानने शरणागती पत्करली.

**उपक्रम**

(अ) ‘कदम कदम बढाए जा’ हे गीत शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.
(आ) नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे चरित्र वाचा.

❑❑❑



# १४. समतेचा लढा

आधुनिक भारताच्या वाटचालीत राजकीय स्वातंत्र्याचा लढा महत्त्वाचा होता. हा लढा मानवमुक्तीच्या व्यापक तत्त्वज्ञानावर आधारलेला होता. त्यामुळे या लढ्याच्या ओघात राजकीय पारतंत्र्याबरोबरच सरंजामशाही, सामाजिक विषमता, आर्थिक शोषण यांसारख्या गोष्टींनाही विरोध होऊ लागला. स्वातंत्र्याप्रमाणेच समतेचे तत्त्वही फार महत्त्वाचे आहे. त्या दृष्टीने शेतकरी, कामगार, स्त्रिया, दलित इत्यादी समाजघटकांनी उभारलेल्या चळवळी आणि समतेला महत्त्व देणारा समाजवादाचा प्रवाह यांचे योगदान मोलाचे ठरले. त्याचे भान ठेवल्याशिवाय आधुनिक भारताची जडणघडण समजू शकणार नाही, म्हणून आपण अशा काही चळवळींचा अभ्यास करूया.

**शेतकरी चळवळ :** ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाचे दुष्परिणाम भारतीय शेतकऱ्यांना भोगावे लागत. जमीनदार, सावकार यांना ब्रिटिश सरकार संरक्षण देत असे. ते शेतकऱ्यांवर अन्याय करत. या अन्यायाविरुद्ध शेतकऱ्यांनी अनेक उठाव केले. बंगालमधील शेतकऱ्यांनी नीळ उत्पादनाच्या सक्तीविरुद्ध कृषी संघटना स्थापून उठाव केला. दीनबंधू मित्र यांच्या 'नीलदर्पण' या नाटकाने नीळ उत्पादक शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती सर्व समाजाच्या नजरेस आणली. १८७५ साली महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी जमीनदार व सावकार यांच्या अत्याचारांविरुद्ध मोठा उठाव केला. बाबा रामचंद्र यांच्या पुढाकाराने १९१८ साली उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांनी 'किसान सभा' ही संघटना स्थापन केली. केरळमध्ये मोपला शेतकऱ्यांनी मोठा उठाव केला. तो ब्रिटिश सरकारने चिरडून टाकला.

१९३६ साली प्रा. एन. जी. रंगा यांच्या पुढाकाराने 'अखिल भारतीय किसान सभा' स्थापन झाली. स्वामी सहजानंद सरस्वती हे या सभेचे अध्यक्ष होते. या सभेने शेतकऱ्यांच्या हक्कांचा जाहीरनामा राष्ट्रीय सभेला सादर केला. १९३६ साली महाराष्ट्रातील फैजपूर येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनास हजारो शेतकरी उपस्थित होते. राष्ट्रीय सभेने या अधिवेशनात किसान सभेचा कार्यक्रम स्वीकारला.



प्रा. एन. जी. रंगा



सानेगुरुजी

१९३८ साली पूर्व खानदेशात अतिवृष्टी होऊन पीक बुडाले. शेतकऱ्यांची स्थिती हलाखीची झाली. शेतसारा माफ करून घेण्यासाठी सानेगुरुजींनी जागोजागी सभा-मिरवणुका घेतल्या. कलेक्टर कचेरीवर मोर्चे काढले. १९४२ च्या क्रांतिपर्वात शेतकरी मोठ्या संख्येने सामील झाले.

**कामगार संघटन :** एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये कापड गिरण्या, रेल्वे कंपन्या यांसारख्या उद्योगांची सुरुवात झाली होती. कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात उदयाला आला नव्हता, तरीही या काळात कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न झाले. शशिपद

बॅनर्जी, नारायण मेघाजी लोखंडे यांनी स्थानिक पातळीवर कामगारांचे संघटन केले. लोखंडे यांचे कामगारविषयक कार्य एवढे मोलाचे होते, की त्यांचे वर्णन 'भारतीय कामगार चळवळीचे जनक' असे केले जाते.



**नारायण मेघाजी लोखंडे**

याच सुमारास आसाममधील चहाच्या मळ्यातील कामगारांच्या दारुण अवस्थेविरुद्ध आंदोलन करण्यात आले. १८९९ मध्ये ग्रेट इंडियन पेनिन्सुलर (जी.आय.पी.) रेल्वेच्या कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संप पुकारला. वंगभंग आंदोलनाच्या काळात स्वदेशीला पाठिंबा देण्यासाठी कामगारांनी वेळोवेळी संप केले; परंतु कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी व्यापक अशी संघटना नव्हती. पहिल्या महायुद्धानंतर भारतात उद्योगीकरणामुळे कामगार वर्गाची वाढ झाली, तेव्हा मात्र राष्ट्रव्यापी कामगार संघटनेची आवश्यकता भासू लागली. या गरजेतून १९२० साली ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसची (आयटक) स्थापना करण्यात आली. ना. म. जोशी यांचा आयटकच्या कार्यात मोठा वाटा होता. लाला लजपतराय हे आयटकच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. कामगारांनी राष्ट्रीय आंदोलनात सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

कामगार वर्गात समाजवादी विचारांचा प्रसार करून त्यांच्या लढाऊ संघटना उभारण्याचे कार्य श्रीपाद अमृत डांगे, मुझफ्फर अहमद इत्यादी समाजवादी नेत्यांनी केले. १९२८ साली मुंबईतील गिरणी कामगार संघाने सहा महिने संप केला. असे अनेक संप रेल्वे कामगार, ताग कामगार इत्यादींनी केले. कामगार चळवळीची वाढती शक्ती पाहून सरकार



श्रीपाद अमृत डांगे

अस्वस्थ झाले. ही चळवळ दडपून टाकण्यासाठी कायदे करण्यात आले. कामगारांचे लढे राष्ट्रीय चळवळीला पूरक ठरले.

**समाजवादी चळवळ :** जनसामान्यांच्या हितरक्षणासाठी ब्रिटिश सरकार उलथून टाकणे आवश्यक आहे, असे राष्ट्रीय सभेतील अनेक तरुण कार्यकर्त्यांना वाटू लागले. त्याचप्रमाणे आर्थिक व सामाजिक समतेच्या तत्त्वावर समाजाची फेररचना झाली पाहिजे, याची त्यांना जाणीव होऊ लागली. या जाणिवेतून समाजवादी विचारसरणीचा उदय आणि विकास झाला.

राष्ट्रीय सभेतील समाजवादी तरुणांनी नाशिकच्या तुरुंगामध्ये असताना राष्ट्रीय सभेच्या अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार १९३४ साली काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना करण्यात आली. त्यांमध्ये आचार्य नरेंद्र देव, जयप्रकाश नारायण, मिनू मसानी, डॉ. राममनोहर लोहिया इत्यादी नेते होते. १९४२ च्या 'छोडो भारत' आंदोलनात समाजवादी तरुण अग्रभागी होते.



आचार्य नरेंद्र देव



डॉ. राममनोहर लोहिया


कार्ल मार्क्स आणि त्याचा साम्यवाद यांचा परिचय भारतीयांना होऊ लागला. लोकमान्य टिळकांनी तर १८८१ मध्येच मार्क्सविषयी लेख लिहिला होता. पहिल्या महायुद्‌धानंतर भारतात साम्यवादाचा प्रभाव जाणवू लागला. मानवेंद्रनाथ रॉय यांचा आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीतसुद्‌धा सहभाग होता.

१९२५ साली भारतात साम्यवादी पक्षाची स्थापना झाली. कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या लढाऊ संघटना उभारण्याचे कार्य साम्यवादी तरुणांनी केले. सरकारला साम्यवादी चळवळीचा धोका वाटू लागला. सरकारने ही चळवळ चिरडण्याचे ठरवले. मुझफ्फर अहमद, श्रीपाद अमृत डांगे, नीळकंठ जोगळेकर इत्यादींना पकडण्यात आले. ब्रिटिश राज्य उलथून टाकण्याचा कट केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. त्यांना वेगवेगळ्या शिक्षा करण्यात आल्या. हा खटला मीरत येथे चालवण्यात आला, म्हणून त्याला 'मीरत कट खटला' असे म्हटले जाते. मीरत खटल्यानंतरही कामगार चळवळीवर साम्यवाद्यांचा प्रभाव कायम राहिला.

**स्त्रियांची चळवळ :** भारतातील समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम स्थान होते. अनेक दुष्ट चालीरीतींमुळे त्यांच्यावर अन्याय होत असे; परंतु आधुनिक युगात याविरुद्‌ध जागृती होऊ लागली. 'भारतीय प्रबोधन' या पाठात आपण त्याबाबतची काही माहिती अभ्यासली आहे. स्त्री-विषयक सुधारणा चळवळीत काही पुरुष सुधारकांनी पुढाकार घेतला; परंतु काळाच्या ओघात स्त्रियांचे नेतृत्व पुढे येऊ लागले. त्यांच्या स्वतंत्र संस्था-संघटनाही स्थापन होऊ लागल्या. पंडिता रमाबाईंनी स्थापन केलेल्या 'आर्य महिला समाज' व 'शारदासदन' या संस्था, तसेच रमाबाई रानडे यांनी स्थापन केलेली 'सेवासदन' संस्था ही त्याची उदाहरणे



पंडिता रमाबाई



रमाबाई रानडे


आहेत. 'भारत महिला परिषद' (१९०४), 'ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्स' (१९२७) या संस्थांचीही स्थापना झाली. त्यामुळे हे संस्थात्मक कार्य राष्ट्रीय पातळीपर्यंत जाऊन पोहोचले. वारसा हक्क, मतदानाचा हक्क इत्यादी प्रश्नांबाबत या संघटनांच्या माध्यमातून स्त्रिया संघर्ष करू लागल्या. विसाव्या शतकात सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. राष्ट्रीय चळवळीत व क्रांतिकार्यात स्त्रियांचा मोलाचा सहभाग होता. १९३५ च्या कायद्यानंतर प्रांतिक मंत्रिमंडळांमध्येही स्त्रियांचा समावेश झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संविधानात स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व स्पष्टपणे नमूद करण्यात आले.

**दलित चळवळ :** भारतातील समाजरचना विषमतेवर आधारलेली होती. समाजात दलितांना मिळणाऱ्या अन्याय्य वागणुकीविरुद्ध महात्मा जोतीराव फुले, नारायण गुरू यांसारख्या समाजसुधारकांनी जनजागृती केली. महात्मा फुले यांच्या शिकवणीला अनुसरून गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले. 'विटाळ विध्वंसन' या पुस्तकातून वलंगकरांनी अस्पृश्यतेचे खंडन केले. तमिळनाडूमध्ये पेरियार रामस्वामी यांनी अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ उभारली.

राजर्षी शाहूमहाराजांनी कोल्हापूर संस्थानात जातिभेद निर्मूलनासाठी भरीव कार्य केले. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी दलितांच्या



राजर्षी शाहूमहाराज




महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

प्रगतीसाठी 'डिप्रेस्ड क्लासेस मिशन' ही संस्था सुरू केली. दक्षिण भारतात जस्टिस पक्षाने मोलाचे कार्य केले. महात्मा गांधींनीसुद्धा अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न हाती घेऊन दलितांवरील अन्याय दूर करण्यासाठी प्रयत्न केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलितांच्या संघर्षाला व्यापक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले.

स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांवर समाजाची उभारणी करण्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय होते. जातिसंस्था समूळ नष्ट झाल्याशिवाय दलितांवरील अन्यायाचा आणि विषमतेचा शेवट होणार नाही, अशी त्यांची खात्री होती. सामाजिक समता हा दलितांचा हक्क आहे, अशी त्यांची धारणा होती. स्वाभिमानावर आधारलेली चळवळ करणे त्यांना अभिप्रेत होते. या भूमिकेतून त्यांनी १९२४ च्या जुलैमध्ये 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची स्थापना केली. त्यांनी आपल्या अनुयायांना 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा स्फूर्तिदायक संदेश दिला.

बाबासाहेब बोले यांनी मुंबई प्रांताच्या विधिमंडळामध्ये, सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यांना खुले करण्याचे विधेयक संमत करून घेतले होते. तरीही प्रत्यक्षात दलितांना पाणवठे खुले झाले नाहीत, म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या अनुयायांनी महाड येथे चवदार तळ्यावर सत्याग्रह केला. त्यांनी विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या 'मनुस्मृती'चे दहन केले. नाशिकच्या काळाराम मंदिरामध्ये दलितांना प्रवेश मिळावा, यासाठी १९३० मध्ये सत्याग्रह सुरू केला. या सत्याग्रहाचे नेतृत्व कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनी केले होते. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी आणि दुःखांना वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता', 'समता' अशी वृत्तपत्रे सुरू केली. गोलमेज परिषदा आणि पुणे करार या संदर्भातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामगिरीचा अभ्यास आपण यापूर्वी केलेलाच आहे.



**महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजुरांचे प्रश्न सोडवण्यासाठी 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. कामगारांना अहितकारक असणाऱ्या कायद्यांना विधिमंडळात विरोध केला. दलितांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी त्यांनी १९४२ साली 'शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन'ची स्थापना केली. आधुनिक भारतात समतेवर आधारलेली समाजरचना निर्माण करण्याच्या कार्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाद्वारे महत्त्वाचे योगदान दिले. १९५६ मध्ये नागपूर येथे आपल्या असंख्य अनुयायांसह मानवतेचा व समतेचा पुरस्कार करणाऱ्या बौद्ध धर्माचा त्यांनी स्वीकार केला.

भारतीय समाजातील शोषित घटकांच्या जागृतीमुळे राष्ट्रीय चळवळीला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले. तसेच भारतीय समाज व्यवस्थेतील वैगुण्ये दूर होण्यास अनुकूल वातावरण निर्माण होऊ लागले.

या सर्व चळवळींनी भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या काळात मोलाचे योगदान दिले.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) १९३६ साली महाराष्ट्रातील ....... येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले होते.
(फैजपूर, पुणे, मुंबई)

(आ) आयटकच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष ....... हे होते.
(लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल)

(इ) कोल्हापूर संस्थानात ....... यांनी जातिभेद निर्मूलनासाठी भरीव कार्य केले.
(डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहूमहाराज)

**२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (अ) प्रा. एन. जी. रंगा | (१) स्वतंत्र मजूर पक्ष |
| (आ) नारायण मेघाजी लोखंडे | (२) अखिल भारतीय किसान सभा |
| (इ) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे | (३) कामगारांचे स्थानिक पातळीवर संघटन |
| (ई) डॉ. बाबासाहेब आंबेडकर | (४) आयटक |
| | (५) डिप्रेस्ड क्लासेस मिशन |

**३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लाला लजपतराय यांनी आयटकच्या पहिल्या अधिवेशनात कामगारांना कोणता संदेश दिला ?

(आ) पंडिता रमाबाई यांनी कोणत्या संस्था स्थापन केल्या ?

(इ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांना कोणता संदेश दिला ?

**४. कारणे लिहा.**

(अ) पूर्व खानदेशात सानेगुरुजींनी जागोजागी सभा-मिरवणुका घेतल्या.

(आ) भारतामध्ये राष्ट्रव्यापी कामगार संघटनेची आवश्यकता भासू लागली.

**५. चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) शेतकरी चळवळीची माहिती लिहा.

(आ) कामगार चळवळीची माहिती लिहा.

(इ) मीरत कट खटला याविषयी माहिती लिहा.

**उपक्रम**

राजर्षी शाहूमहाराज, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याची माहिती मिळवा.

❑❑❑

# १५. स्वातंत्र्यप्राप्ती

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतीय स्वातंत्र्यलढा व्यापक झाला होता. भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीचा जोर वाढत होता. त्याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे, याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांना झाली. त्या दृष्टीने भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी ब्रिटिश सरकार विविध योजना तयार करू लागले.

राष्ट्रीय सभेची उभारणी धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर झालेली होती. राष्ट्रीय आंदोलनात सर्व जाती-धर्मांचे लोक सामील झालेले होते. ही चळवळ कमकुवत करण्यासाठी ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' या नीतीचा अवलंब केला. त्याचा परिणाम 'मुस्लिम लीग'ची स्थापना होण्यात झाला. या पार्श्वभूमीवर हिंदू महासभा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांसारख्या हिंदुत्ववादी संघटनाही स्थापन झाल्या.

१९३० साली डॉ. मुहम्मद इक्बाल या प्रसिद्ध कवीने स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राचा विचार मांडला. पुढे चौधरी रहमत अली यांनी पाकिस्तानची कल्पना मांडली. बॅरिस्टर महम्मद अली जीना यांनी द्विराष्ट्र सिद्धान्त मांडून पाकिस्तान या स्वतंत्र मुस्लिम राष्ट्राची मागणी केली. राष्ट्रीय सभा ही केवळ हिंदूंची संघटना आहे, तिच्यापासून मुसलमानांचा काहीही फायदा होणार नाही, असा प्रचार बॅ. जीना आणि मुस्लिम लीग यांनी सुरू केला.

**वेव्हेल योजना :** भारताचे व्हाइसरॉय वेव्हेल यांनी १९४५ च्या जूनमध्ये एक योजना तयार केली. केंद्रीय व प्रांतिक विधिमंडळात मुस्लिम, दलित व अल्पसंख्याकांना योग्य ते प्रतिनिधित्व देण्यात येईल; तसेच व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात हिंदू-मुस्लिम सदस्यांची संख्या

समान राहील, अशा काही प्रमुख तरतुदींचा या योजनेत अंतर्भाव होता. या योजनेवर विचार करण्यासाठी भारतातील प्रमुख राजकीय पक्षांची बैठक सिमला येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत एकमत झाले नाही. व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळातील मुस्लिम प्रतिनिधींची नावे सुचवण्याचा अधिकार केवळ मुस्लिम लीगलाच असावा, असा आग्रह बॅरिस्टर जीना यांनी धरला. त्यामुळे राष्ट्रीय सभेने त्यास विरोध केला. ही योजना यशस्वी होऊ शकली नाही.

**त्रिमंत्री योजना :** दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर भारताला स्वातंत्र्य देण्यास ब्रिटिश राज्यकर्ते अनुकूल बनले. ब्रिटिश प्रधानमंत्री ॲटली यांनी पार्लमेंटमध्ये भारताविषयीचे धोरण स्पष्ट केले. त्यानुसार भारतीय जनतेचा भारतीय संविधान तयार करण्याचा अधिकार मान्य करण्यात आला. अल्पसंख्याकांचे प्रश्न भारतीय स्वातंत्र्याच्या आड येणार नाहीत हेही स्पष्ट करण्यात आले. तसेच भारतीयांशी वाटाघाटी करण्यासाठी ब्रिटिश मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ भारतात पाठवत असल्याचेही प्रधानमंत्र्याने जाहीर केले.

१९४६ च्या मार्चमध्ये पॅथिक लॉरेन्स, स्टॅफर्ड क्रिप्स आणि ए. व्ही. अलेक्झांडर या ब्रिटिश मंत्र्यांचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यांनी भारताच्या संदर्भातील इंग्लंडची योजना भारतीय नेत्यांसमोर मांडली. तिला 'त्रिमंत्री योजना' म्हणतात. ब्रिटिशांच्या शासनाखालील प्रांत व संस्थाने यांचे मिळून भारतीय संघराज्य स्थापन केले जावे, या संघराज्याचे संविधान भारतीयांनीच तयार करावे, हे संविधान तयार होईपर्यंत भारताचा राज्यकारभार व्हाइसरॉयच्या सल्ल्याने भारतीयांच्या हंगामी सरकारने करावा, असे या योजनेचे स्वरूप होते.


या योजनेतील काही तरतुदी राष्ट्रीय सभेला मान्य नव्हत्या. तसेच

मुस्लिमांचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची तरतूद या योजनेत नाही, म्हणून मुस्लिम लीगही असंतुष्ट होती. यामुळे त्रिमंत्री योजना पूर्णतः मान्य झाली नाही.

**प्रत्यक्ष कृतिदिन :** त्रिमंत्री योजनेनुसार संविधान सभा स्थापन करण्यासाठी झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीय सभेला प्रचंड बहुमत मिळाले. संविधान सभेत सहभागी होण्यास मुस्लिम लीगने नकार दिला. भारताच्या फाळणीची जोरदार मागणी केली. पाकिस्तान निर्मितीचा प्रत्यक्ष कृतिदिन १६ ऑगस्ट १९४६ हा असल्याचे घोषित केले. मुस्लिम लीगच्या अनुयायांनी हिंसक मार्गाचा अवलंब केला. देशभर हिंदू-मुस्लिम दंगली उसळल्या. बंगाल प्रांतातील नोआखाली या भागात भीषण कत्तली झाल्या. हा हिंसाचार थांबवण्यासाठी गांधीजी आपल्या प्राणाची पर्वा न करता तेथे गेले. तेथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

**हंगामी सरकारची स्थापना :** अशा अराजकाच्या परिस्थितीत गव्हर्नर जनरल वेव्हेल यांनी भारतीय प्रतिनिधींचे हंगामी सरकार स्थापन केले. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाने राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली. सुरुवातीला मुस्लिम लीगने हंगामी सरकारमध्ये सहभाग घेण्यास नकार दिला. नंतर तो निर्णय बदलून मुस्लिम लीगचे सदस्य हंगामी सरकारमध्ये सहभागी झाले. मुस्लिम लीगच्या अडवणुकीच्या धोरणामुळे हंगामी सरकारचा कारभार सुरळीत चालू शकला नाही. भारतावरील आपला ताबा इंग्लंड १९४८ च्या जून पूर्वी सोडून देईल, अशी घोषणा ब्रिटिश प्रधानमंत्री ॲटली यांनी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये केली. भारताच्या राज्यकारभाराची सूत्रे भारतीयांच्या हाती लवकर सोपवण्यासाठी, भारताचे नवे गव्हर्नर जनरल म्हणून माउंटबॅटन यांची नेमणूक केल्याचेही त्यांनी घोषित केले.

**माउंटबॅटन योजना :** भारताची फाळणी अटळ झाल्यामुळे माउंटबॅटन यांनी फाळणीचा निर्णय घेतला. त्यानुसार भारतातील प्रमुख नेत्यांशी चर्चा केली. त्यानंतर भारताची फाळणी करून भारत व पाकिस्तान या दोन स्वतंत्र राष्ट्रांच्या निर्मितीची योजना त्यांनी तयार केली. राष्ट्रीय सभेचा फाळणीला विरोध होता. देशाचे ऐक्य हा तर राष्ट्रीय सभेच्या भूमिकेचा मूळ आधार होता; परंतु मुस्लिम लीगने पाकिस्तानच्या निर्मितीचा अट्टहास धरला. त्यामुळे फाळणीशिवाय दुसरा पर्याय उरला नव्हता. राष्ट्रीय सभेने अत्यंत नाइलाजाने फाळणीच्या निर्णयाला मान्यता दिली.





The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.
Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India.

© Government of India copyright 2009

**भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा :** माउंटबॅटन योजनेच्या आधारे भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा १८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश पार्लमेंटने मंजूर केला. या कायद्यानुसार अशी तरतूद करण्यात आली, की भारताची फाळणी होऊन १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत व पाकिस्तान ही दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात येतील. त्यानंतर त्यांच्यावर ब्रिटिश पार्लमेंटचा कोणताच अधिकार राहणार नाही. संस्थानांवरील ब्रिटिशांचे सार्वभौमत्व संपुष्टात येईल. त्यांना भारत अथवा पाकिस्तानात सामील होता येईल किंवा त्यांना स्वतंत्र राहता येईल.

**स्वातंत्र्यप्राप्ती :** भारतीय स्वातंत्र्याच्या कायद्यानुसार भारताला स्वातंत्र्य मिळाले. १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री दिल्ली येथील संसद भवनाच्या सभागृहात भारताच्या संविधान सभेची बैठक सुरू होती. मध्यरात्री बाराचे ठोके पडले आणि भारताचे पारतंत्र्य संपले. भारत स्वतंत्र झाला. ब्रिटिशांचा युनियन जॅक खाली उतरवण्यात आला. त्याच्या जागी भारताचा तिरंगी ध्वज फडकवण्यात आला. वर्षानुवर्षांच्या गुलामगिरीच्या



**पंतप्रधान पं. नेहरू : शपथविधी**



लाल किल्ल्यावरील ध्वजारोहण सोहळा - १६ ऑगस्ट १९४७

शृंखला गळून पडल्या. ब्रिटिश सत्तेने भारतात पाय रोवल्यापासून ज्या लक्षावधी भारतीयांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी असीम त्याग केला होता, अनेकांनी आपले प्राण वेचले होते, त्यांच्या महान त्यागाची ही फलश्रुती होती. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी या ऐतिहासिक क्षणाचे महत्त्व आपल्या प्रभावी भाषणातून उलगडून दाखवले. 'या मंगल क्षणी केवळ भारतीयांच्याच नव्हे, तर सर्व मानवजातीच्या सेवेला वाहून घेण्याची शपथ घ्यावी', असे त्यांनी आवाहन केले. लक्षावधी भारतीयांनी स्वातंत्र्याचा सोहळा अभूतपूर्व उत्साहाने साजरा केला.

स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद निर्भेळ नव्हता. देशाची फाळणी आणि त्या वेळी झालेल्या भयानक हिंसाचारामुळे भारतीय जनता दुःखी होती. स्वातंत्र्य सोहळ्यात सहभागी न होता गांधीजी बंगालमध्ये शांतता व जातीय सलोखा टिकवण्यासाठी जिवाचे रान करत होते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अवघ्या सहा महिन्यांत ३० जानेवारी १९४८ रोजी नथुराम गोडसे याने गांधीजींची निर्घृण हत्या केली. हिंदू-मुस्लिम ऐक्य टिकवण्यासाठी गांधीजी अहर्निश झटले आणि त्यासाठीच त्यांनी आपल्या प्राणाचे मोल दिले.

**भारत प्रजासत्ताक राष्ट्र बनले :** संविधान सभेने भारताचे संविधान तयार करण्याचे काम १९४६ साली सुरू केले. संविधान समितीत डॉ. राजेंद्रप्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद, सरोजिनी नायडू, जे. बी. कृपलानी, राजकुमारी अमृत कौर, दुर्गाबाई देशमुख, हंसाबेन मेहता असे अनेक मान्यवर सदस्य होते. संविधानाचा मसुदा तयार करण्यासाठी या सभेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या

अध्यक्षतेखाली मसुदा समिती नियुक्त केली. स्वतंत्र भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'भारतीय संविधानाचे शिल्पकार' आहेत. ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध लढताना स्वातंत्र्य, समता, बंधुता व लोकशाही या मूल्यांवरील निष्ठा भारतीयांनी उराशी बाळगल्या होत्या. या मूल्यांच्या पायावरच आपल्या संविधानाची उभारणी झाली आहे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) १९४६ च्या मार्चमध्ये पॅथिक लॉरेन्स,....... आणि ए. व्ही. अलेक्झांडर या ब्रिटिश मंत्र्यांचे शिष्टमंडळ भारतात आले.
(ॲटली, स्टॅफर्ड क्रिप्स, मॉंटेग्यू)

(आ) स्वतंत्र भारताचे संविधान ....... रोजी अमलात आले.
(१५ ऑगस्ट १९४७, २६ जानेवारी १९५०, १६ ऑगस्ट १९५०)

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) हंगामी सरकारचा कारभार सुरळीत का चालू शकला नाही ?

(आ) ब्रिटिश प्रधानमंत्री ॲटली यांनी इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये कोणती घोषणा केली ?

(इ) आपल्या संविधानाची उभारणी कोणत्या मूल्यांच्या पायावर झाली आहे ?

३. **दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) वेव्हेल योजनेत कोणत्या प्रमुख तरतुदींचा अंतर्भाव होता ?

(आ) त्रिमंत्री योजनेच्या तरतुदी कोणत्या होत्या ?

(इ) भारताच्या स्वातंत्र्याच्या कायद्यात कोणत्या तरतुदी होत्या ?

**उपक्रम**

(अ) 'विजयी विश्व तिरंगा प्यारा' हे गीत मिळवून त्याचे समूहगान करा.

(आ) 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा' हे गीत सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.

# १६. स्वातंत्र्यलढ्याची परिपूर्ती

भारत स्वतंत्र झाला तरी स्वातंत्र्यलढा अद्याप संपलेला नव्हता. भारतात अनेक संस्थाने होती. संस्थानांना भारतात सामील होण्याचा किंवा स्वतंत्र राहण्याचा हक्क मिळालेला होता. त्यामुळे अखंड भारताचे राष्ट्रीय सभेचे स्वप्न अपुरे राहिले होते. संस्थाने स्वतंत्र राहिल्यामुळे भारताचे अनेक तुकडे पडणार होते. पोर्तुगीज आणि फ्रेंच सत्तांनी भारतातील काही भागांवरील सत्ता सोडून दिलेली नव्हती, पण हे प्रश्न भारताने खंबीरपणे सोडवले. त्याची माहिती आपण या पाठात घेऊ.

**संस्थानांचे भारतात विलीनीकरण :** भारतात लहान-मोठी अशी सहाशेच्यावर संस्थाने होती. असहकार आंदोलनाच्या प्रभावामुळे संस्थानांमध्ये राजकीय जागृतीला सुरुवात झाली. संस्थानांमध्ये प्रजामंडळे स्थापन होऊ लागली. प्रजामंडळे म्हणजे संस्थानांतील प्रजेच्या हितासाठी व त्यांना राजकीय अधिकार मिळावे यासाठी काम करणाऱ्या जनसंघटना होत्या. १९२७ मध्ये अशा प्रजामंडळांची मिळून एक अखिल भारतीय प्रजा परिषद स्थापन करण्यात आली. त्यामुळे संस्थानांमधील चळवळीला चालना मिळाली. भारत स्वतंत्र झाल्यावर या संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सोडवण्यासाठी भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी अतिशय मुत्सद्दीपणे मार्ग काढला. त्यांनी संस्थानिकांना विश्वासात घेऊन सर्वांना



सरदार वल्लभभाई पटेल

मान्य होईल असा 'सामीलनामा' तयार केला. त्यानुसार संस्थानिकांना असे आश्वासन दिले, की भारत सरकारशी करार करून, फक्त परराष्ट्रीय संबंध, दळणवळण आणि संरक्षण या बाबी भारत सरकारकडे द्याव्या. इतर सर्व खाती संस्थानांकडेच राहावी.

भारतात सामील होणे संस्थानिकांच्या कसे हिताचे आहे, हे सरदार पटेलांनी संस्थानिकांना पटवून दिले. त्यांच्या या आवाहनाला संस्थानिकांनी चांगला प्रतिसाद दिला. जुनागड, हैदराबाद व काश्मीर या संस्थानांचा अपवाद वगळता सर्व संस्थाने भारतात विलीन झाली. या तीन संस्थानांच्या विलीनीकरणाचा प्रश्न सरदार पटेलांनी कणखर भूमिका घेऊन सोडवला.

**जुनागडचे विलीनीकरण :** जुनागड हे सौराष्ट्रातील एक संस्थान होते. तेथील प्रजेला भारतात सामील व्हायचे होते. जुनागडचा नवाब मात्र पाकिस्तानात सामील होण्याच्या विचारात होता. त्याच्या या निर्णयाला प्रजेने कसून विरोध केला, तेव्हा नवाब पाकिस्तानात निघून गेला. त्यानंतर १९४८ च्या फेब्रुवारीमध्ये जुनागड भारतात विलीन झाले.

**हैदराबाद मुक्तिसंग्राम :** हैदराबाद हे भारतातील सर्वांत मोठे संस्थान होते. त्यामध्ये तेलुगु, कन्नड, मराठी भाषक प्रांत होते. त्या ठिकाणी निजामाची एकतंत्री राजवट होती. तेथे नागरी व राजकीय हक्कांचा अभाव होता. आपले हक्क मिळवण्यासाठी हैदराबाद संस्थानातील जनतेने तेलंगण भागात आंध्र परिषद, मराठवाडा भागात महाराष्ट्र परिषद व कर्नाटक भागात कर्नाटक परिषद या संस्था स्थापन केल्या. १९३८ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना केली. त्यांना नारायण रेड्डी, सिराझ-उल्-हसन तिरमिजी यांची साथ लाभली. निजामाने या संघटनेवर बंदी घातली. हैदराबाद स्टेट



**स्वामी रामानंद तीर्थ**

काँग्रेसला मान्यता मिळवण्यासाठी व लोकशाही हक्कांसाठी लढा सुरू झाला. या लढ्याचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ या झुंजार सेनानीने केले.

१९४७ च्या जुलैमध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करावे असा ठराव केला, मात्र निजामाने भारतविरोधी धोरण स्वीकारले. तो हैदराबाद संस्थान पाकिस्तानात विलीन करण्याच्या हालचाली करू लागला. संस्थानातील प्रजेची भारतात विलीन होण्याची मागणी धुडकावून लावण्यासाठी कासीम रझवी याने निजामाच्या पाठिंब्याने 'रझाकार' नावाची संघटना स्थापन केली. कासीम रझवी व त्याच्या साथीदारांनी हिंदूंवरच नव्हे, तर लोकशाहीवादी चळवळीला पाठिंबा देणाऱ्या मुस्लिमांवरही अत्याचार केले. त्यामुळे सर्वत्र लोकमत भडकू लागले. निजामाशी सामोपचाराने बोलणी करण्याचा प्रयत्न भारत सरकार करत होते, परंतु निजाम दाद देत नव्हता. अखेरीस भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाविरुद्‌ध पोलीस कारवाई सुरू केली. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजाम शरण आला. हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले. संस्थानी प्रजेचा लढा यशस्वी झाला.

**हैदराबाद मुक्तिसंग्रामातील मराठवाड्याचे योगदान :** या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, बाबासाहेब परांजपे, दिगंबरराव बिंदू, आ. कृ. वाघमारे, नारायणराव चव्हाण, अनंत भालेराव, स. कृ. वैशंपायन, पुरुषोत्तम चपळगावकर, रामलिंग स्वामी, देवीसिंह चौहान, शामराव बोधनकर, मकुंदराव पेडगावकर, श्रीनिवासराव बोरीकर, राघवेंद्र दिवाण, फुलचंद गांधी, माणिकचंद पहाडे इत्यादींनी मौलिक योगदान दिले.

हैदराबाद मुक्तिसंग्रामात आशाताई वाघमारे, दगडाबाई शेळके, करुणाबेन चौधरी, पानकुंवर कोटेचा, गीताबाई चारठाणकर, सुशीलाबाई दिवाण, कावेरीबाई बोधनकर इत्यादी महिलांचा सक्रिय सहभाग होता.

'वंदे मातरम्' चळवळीद्वारे विद्यार्थी हैदराबाद मुक्तिलढ्यात सहभागी झाले. या ऐतिहासिक लढ्यात वेदप्रकाश, श्यामलाल, गोविंद पानसरे, बहिर्जी शिंदे, श्रीधर वर्तक, जनार्दन मामा इत्यादींनी हौतात्म्य पत्करले. त्यांचे बलिदान भारतीयांना प्रेरणादायी ठरले आहे. यावरून हैदराबादच्या मुक्तिलढ्यात मराठवाड्यातील नेत्यांचा व जनतेचा सिंहाचा वाटा होता, हे लक्षात येते.

१७ सप्टेंबर हा हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा दिवस मराठवाड्यात 'मराठवाडा मुक्तिदिन' म्हणून साजरा केला जातो. हैदराबाद संस्थानात मराठवाड्यातील औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, परभणी आणि नांदेड हे जिल्हे होते. त्यात १९८२ नंतर जालना, लातूर आणि हिंगोली हे नवीन जिल्हे समाविष्ट झाले आहेत. स्वतंत्र भारतात मराठवाड्याचा समावेश १५ ऑगस्ट १९४७ मध्ये झालेला नव्हता. हा प्रदेश १९४८ मध्ये जनतेच्या स्फूर्तिदायी लढ्यानंतर स्वतंत्र भारतात विलीन करण्यात आला. हा अभूतपूर्व लढा देशातील जनतेला प्रेरक ठरला आहे.

**काश्मीरची समस्या :** काश्मीर संस्थानाचा राजा हरिसिंग याने स्वतंत्र राहण्याचे ठरवले होते. काश्मीर पाकिस्तानात सामील करून घेण्याचा पाकिस्तानचा मानस होता. यासाठी पाकिस्तान हरिसिंगावर दडपण आणू लागले. १९४७ च्या ऑक्टोबरमध्ये पाकिस्तानच्या चिथावणीने सशस्त्र घुसखोरांनी काश्मीरवर हल्ला केला, तेव्हा भारतात सामील होण्याच्या करारावर हरिसिंगाने स्वाक्षरी केली. अशा प्रकारे काश्मीर भारतात विलीन झाल्यानंतर भारतीय लष्कर काश्मीरच्या रक्षणासाठी पाठवले गेले. लष्कराने काश्मीरचा मोठा भाग घुसखोरांच्या

हातून परत मिळवला. काही भाग मात्र पाकिस्तानच्या ताब्यात राहिला.

**फ्रेंच वसाहतींचे विलीनीकरण :** भारत स्वतंत्र झाल्यानंतरही चंद्रनगर, पुदुच्चेरी, कारिकल, माहे व याणम या प्रदेशांवर फ्रान्सचे आधिपत्य होते. तेथील भारतीय रहिवासी भारतात सामील होण्यास उत्सुक होते. हे प्रदेश भारताचे घटक असल्यामुळे ते भारताच्या स्वाधीन करावे, अशी मागणी भारत सरकारने केली.

फ्रान्सने १९४९ साली चंद्रनगरमध्ये सार्वमत घेतले. तेथील जनतेने भारताच्या बाजूने कौल दिला. चंद्रनगर भारताच्या स्वाधीन करण्यात आले. त्यानंतर फ्रान्सने भारताचे इतरही प्रदेश भारत सरकारच्या हाती सोपवले.



डॉ. टी. बी. कुन्हा

**गोवामुक्ती लढा :** पोर्तुगालने मात्र आपल्या ताब्यातील भारतीय प्रदेश भारताच्या स्वाधीन करण्यास नकार दिला. तो प्रदेश मिळवण्यासाठी भारतीयांना लढा द्यावा लागला. या लढ्यात डॉ. टी. बी. कुन्हा हे आघाडीवर होते. त्यांनी पोर्तुगीज सरकारविरुद्ध जनतेत जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. त्यांनी पोर्तुगिजांच्या विरुद्ध लढा उभारण्याच्या उद्देशाने गोवा काँग्रेस समिती स्थापन केली. पुढे १९४५ मध्ये डॉ. कुन्हा यांनी 'गोवा यूथ लीग' ही संघटना मुंबईत स्थापन केली. १९४६ मध्ये त्यांनी गोव्यात जाऊन भाषणबंदीचा हुकूम मोडला. त्याबद्दल डॉ. कुन्हांना आठ वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली. इ. स. १९४६ मध्येच

डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोवामुक्तीसाठी सत्याग्रहाचा लढा सुरू केला. त्यांनी बंदीहुकूम मोडून गोव्यात मडगाव येथे भाषण केले. त्याबद्‌दल त्यांना पोर्तुगीज सरकारने हद्‌दपार केले.

याच सुमारास गुजरातमधल्या दादरा आणि नगर हवेली येथील पोर्तुगीज वसाहती मुक्त करण्यासाठी 'आझाद गोमंतक' दलाची उभारणी करण्यात आली. २ ऑगस्ट १९५४ रोजी या दलाच्या तरुणांनी सशस्त्र हल्ला करून दादरा आणि नगर हवेलीचा प्रदेश पोर्तुगीज सत्तेपासून मुक्त केला. या हल्ल्यात विश्वनाथ लवंदे, राजाभाऊ वाकणकर, सुधीर फडके, नानासाहेब काजरेकर इत्यादींनी भाग घेतला होता. १९५४ मध्ये गोवामुक्ती समिती स्थापन करण्यात आली. या समितीने महाराष्ट्रातून सत्याग्रहींच्या अनेक तुकड्या गोव्यात पाठवल्या. त्यांत ना. ग. गोरे, सुधीर फडके, सेनापती बापट, पीटर अल्वारिस, महादेवशास्त्री जोशी व त्यांच्या पत्नी सुधाताई इत्यादींचा सहभाग होता. मोहन रानडे हे गोवामुक्ती आंदोलनातील एक धडाडीचे नेते होते. सत्याग्रहींवर पोर्तुगीज सत्तेने अमर्याद जुलूम-अत्याचार केले. काहींना पोर्तुगिजांच्या क्रौर्यापुढे हौतात्म्य पत्करावे लागले. यामुळे भारतातील जनमत अधिकच प्रक्षुब्ध झाले. गोव्यातील स्वातंत्र्यलढ्याने उग्र स्वरूप धारण केले. भारत सरकार पोर्तुगीज सरकारशी सामोपचाराने वाटाघाटी करत होते, मात्र त्याला दाद मिळत नव्हती. शेवटी भारत सरकारने नाइलाजाने लष्करी बळाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. १९६१ च्या डिसेंबरमध्ये भारतीय सैन्याने गोव्यात प्रवेश केला. अल्पावधीतच पोर्तुगीज लष्कराने शरणागती पत्करली. १९ डिसेंबर १९६१ रोजी गोवा पोर्तुगिजांच्या वर्चस्वातून मुक्त झाला. भारताच्या भूमीवरून साम्राज्यवादाचे पूर्णपणे उच्चाटन झाले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची खऱ्या अर्थाने परिपूर्ती झाली.

भारताने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, विषमता

इत्यादी अनेक कठीण समस्यांना तोंड देत विकासाच्या दिशेने वाटचाल केली. जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये प्रगतीला चालना मिळाली. भारत हे जगातले मोठे लोकशाही राष्ट्र ठरले. आज एकविसाव्या शतकात जगातील एक महासत्ता होण्याच्या दिशेने भारताची वाटचाल चालू आहे.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी कंसातील योग्य पर्याय लिहा.**

(अ) १९३८ मध्ये ······· यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना केली.
(स्वामी रामानंद तीर्थ, डॉ. राममनोहर लोहिया, विश्वनाथ लवंदे)

(आ) १९४५ मध्ये ······· यांनी 'गोवा यूथ लीग' ही संघटना मुंबईत स्थापन केली.
(डॉ. राममनोहर लोहिया, ना. ग. गोरे, डॉ. टी. बी. कुन्हा)

(इ) १९ डिसेंबर १९६१रोजी ····· पोर्तुगिजांच्या वर्चस्वातून मुक्त झाला.
(हैदराबाद, गोवा, जुनागड)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) प्रजामंडळे म्हणजे काय ?

(आ) १९४७ च्या जुलैमध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसने कोणता ठराव केला ?

(इ) मराठवाडा मुक्तिदिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो ?

(ई) डॉ. राममनोहर लोहिया यांना पोर्तुगीज सरकारने हद्दपार का केले ?

**३. चार-पाच वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) सरदार पटेल यांनी संस्थानिकांना कोणते आश्वासन दिले ?

(आ) काश्मीरचा राजा हरिसिंग याने भारतात सामील होण्याच्या करारावर स्वाक्षरी का केली ?

(इ) डॉ. टी. बी. कुन्हा यांनी गोवामुक्तीसाठी कोणते प्रयत्न केले ?

### उपक्रम

हैदराबाद मुक्तिसंग्राम व गोवामुक्ती लढा यांतील नेत्यांची चित्रे मिळवून त्यांची माहिती लिहा.

❑❑❑

## जीवन-कौशल्ये शिक्षण (Life-skills Education)

जीवन जास्तीत जास्त कार्यक्षमतेने व यशस्वीपणे जगता यावे, यासाठी विद्यार्थ्यांची अंगभूत कौशल्ये विकसित करण्याचा सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे 'जीवन-कौशल्ये शिक्षण' होय. हे साध्य होण्यासाठी जीवनाच्या प्राथमिक टप्प्यात विद्यार्थ्यांना संधी पुरवणे नितान्त गरजेचे आहे. याखेरीज या शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भौतिक व मानसिक क्षमतांच्या जास्तीत जास्त उपयोगातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवणे हेही एक उद्दिष्ट आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) यासाठी पुढीलप्रमाणे दहा जीवनकौशल्ये पुरस्कृत केली आहेत.

(१) **स्वजागृती** (Self awareness): स्वतःच्या क्षमता, मर्यादा, आवडीनिवडी, आकांक्षा ओळखण्याचे कौशल्य.

(२) **समानुभूती** (Empathy) : दुसऱ्याच्या भूमिकेत शिरून विचार करण्याचे कौशल्य.

(३) **समस्या निराकरण** (Problem solving) : उपलब्ध पर्यायांतून योग्य व संभाव्य पर्याय निवडून कार्यवाही करण्याचे कौशल्य.

(४) **निर्णय घेणे** (Decision making) : समस्या सोडवण्याच्या प्रक्रियेत अनेक पर्याय शोधून त्यातील योग्य पर्याय स्वीकारण्याचे कौशल्य.

(५) **प्रभावी संप्रेषण** (Effective communication) : आपले विचार शाब्दिक किंवा अशाब्दिक माध्यमांतून प्रभावीपणे व्यक्त करण्याचे कौशल्य.

(६) **चिकित्सक विचारप्रक्रिया** (Critical thinking) : उपलब्ध माहितीचे विश्लेषण व परीक्षण वस्तुनिष्ठपणे करण्याचे कौशल्य.

(७) **सर्जनशील विचारप्रक्रिया** (Creative thinking) : पारंपरिक व पुनरावृत्तीने आढळणाऱ्या पद्धतीपेक्षा वेगळ्या व अभिनव पद्धतीने एखाद्या समस्येबद्दल किंवा परिस्थितीबद्दल विचार करण्याचे कौशल्य.

(८) **आंतरव्यक्ती संबंध** (Interpersonal relations) : दैनंदिन जीवनात सतत संपर्कात असलेल्यांबरोबरचे संबंध ओळखून निर्भेळ व स्नेहपूर्ण संबंध राखण्याचे कौशल्य.


(९) **भावनांचे समायोजन** (Coping with emotions) : आपल्या व इतरांच्या भावना, तसेच त्यांचे परिणाम ओळखून त्यांवर नियंत्रण ठेवण्याचे कौशल्य.

(१०) **ताणतणावांचे समायोजन** (Coping with stress) : ताणतणावांची कारणे शोधून त्यांचे होणारे शारीरिक व मानसिक परिणाम लक्षात घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याचे कौशल्य.

वर नमूद केलेली जीवन-कौशल्ये वर्गाध्यापनाच्या माध्यमातून साध्य करणे अपेक्षित आहे. इतिहास अध्यापनाची उद्दिष्टे व ही जीवन-कौशल्ये यांची योग्य सांगड घातल्यास वरीलपैकी बऱ्याच जीवन-कौशल्यांचा परिपोष विद्यार्थ्यांमध्ये करणे शक्य होईल.



संविधान सभेला राष्ट्रध्वज सादर करताना पंडित जवाहरलाल नेहरू



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे-४११००४.

इतिहास इयत्ता ८वी (मराठी माध्यम)